म. ग्रं. सं. ठाणे.
विषय ..... निबंध
सं. क्र. 3242

INTRODUCTION

THE preamble of the Constitution of India runs as under :

Preamble.

WE, THE PEOPLE OF INDIA, having solemnly resolved to constitute India into a SOVEREIGN SOCIALIST SECULAR DEMOCRATIC REPUBLIC and to secure to all its citizens

JUSTICE : Social, economic and political ;

LIBERTY of thought, expression, belief, faith and worship ;

EQUALITY of status and of opportunity ;

and to promote among them all.

FRATERNITY assuring the dignity of the individual and the unity and integrity of the Nation;

IN OUR CONSTITUENT ASSEMBLY, this twenty-sixth day of November, 1949, do HEREBY ADOPT, ENACT AND GIVE TO OURSELVES THIS CONSTITUTION.

The Constitution is a balanced document embodying the traditions and aspirations of the Indian nation. It is not a rigid but a flexible Constitution which provides for its amendment after following a specified procedure, In this connection following extract from the Resolution of All-India Congress Committee will pay perusal :

"Our Constitution as originally adopted was a balanced document embodying the traditions and aspirations of our people. The framers of our Constitution were, however, acutely aware that a Constitution to be a living document has to be more than a manifesto and provide the legal ins... for translating ideals into practice in a changing society. The Constitution had to ... to problems inherited from the past, those inherent in the present and thos... They knew that things which were still and rigid were mor... been seen to happen rigid Constitutions ... bility and responsi... makers clearly fores... but was also capat... the democratic eg... Jawaharlal Nehru ... very swift perio... morroow'. It w... Parliament after ...

Almost ... amendment ... from the pr... amendment ... sh...

REFBK-0025563

3.

4.

5

पंडित

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :–खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

29 MAY 1988

12 JUN 1988

23 AUG 1989

-6 DEC 1995

(क्र. मा. पहा)
५०००–११–८६

निबंध र सामाजिक
३२५२
२५५६३
रटागत

धर्म, शासन आणि समाज

धर्म, शासन आणि समाज

नलिनी पंडित


REFBK-0025563



प्रकाशक जयंत गडकरी,
डी. डी. कोसंबी एज्युकेशनल ट्रस्ट
१०, वीर नरिमन रोड, मुंबई ४०० ०२३
© नलिनी पंडित, बांबुळी निवास, लेडी जमशेटजी रोड,
माहिम, मुंबई ४०० ०१६
पहिली आवृत्ती २५ डिसेंबर १९८७
फोटोटाइप सेटिंग–अनामिका ट्रेडींग कं. दादर

छंपाई अमित ऑफसेट, ७६/३२
हिरा हाऊस, भाऊ दाजी रोड,
माटुंगा, मुंबई ४०० ०१९
मुखपृष्ठ प्रभाकर पाटील
मांडणी उमेश जोशी
मूल्य .१८ रु.
वितरण ग्रंथाली वाचक चळवळ,
इंडियन एज्यु. सोसायटीची मुलींची शाळा क्र. १,
बाबेकर मार्ग, ऑफ गोखले रोड (उ),
दादर, मुंबई ४०० ०२८
(प्रत्यक्ष संपर्क दुपारी २ ते रात्री ८)

लेखिकेचे निवेदन

भारत स्वतंत्र झाल्यानंतर धर्मनिरपेक्ष शासन आणि लोकशाही या दोन तत्वांवर आपल्या राष्ट्राची राज्यघटना करण्यात आली. मात्र धर्मनिरपेक्ष शासनाची मूलतत्त्वे लोकांच्या मनात रुजविण्यासाठी कोणतेही प्रयत्न करण्यात आले नाहीत. मराठीत या विषयावर पुरेसे वाङमयही उपलब्ध नाही ; या विषयावर आपण लेखन करावे असे मला वाटत होते. म्हणून मराठवाडा विद्यापीठाने गांधी स्मारक व्याख्यान मालेत तीन व्याख्याने देण्यासाठी मला निमंत्रण केले तेव्हा धर्म, शासन आणि समाज हा विषय मी निवडला. या विषयावरील माझे विचार सुजाण श्रोत्यांसमोर मांडण्याची या विद्यापीठाने मला जी संधी दिली त्याबद्दल मी कुलगुरू व इतर सदस्य यांची मनःपूर्वक आभारी आहे. धर्म, शासन आणि समाज या विषयाचे हे समग्र विवेचन नाही. तीन व्याख्यानांच्या मर्यादेत हा अत्यंत गुंतागुंतीचा विषय सांगोपांग चर्चिला जाऊ शकत नाही याची मला जाणीव आहे. या विषयातील मला महत्वाच्या वाटणाऱ्या काही मुद्यांचा मी येथे थोडक्यात ऊहापोह केलेला आहे.

या विषयावर माझी व्याख्याने झाली हे ऐकल्यावर, आपण ती प्रकाशित करावी अशी कौसंबी प्रतिष्ठानचे कार्यकारी विश्वस्त श्री. जयंत गडकरी यांनी सूचना केली व इतर विश्वस्तांनी ती ताबडतोब मान्य केली याबद्दल मी सर्व विश्वस्तांचे आभार मानते. पुस्तकाची छपाई सुबक व निर्दोष व्हावी म्हणून अनामिका ट्रेडींग कंपनी आणि अमित ऑफसेटच्या सेवकवर्गाने जे काम केले त्याबद्दल त्यांचीही मी आभारी आहे. माझे स्नेही श्री. दिनकर गांगल यांनी थोड्या कालावधीत हे पुस्तक प्रसिध्द व्हावे यासाठी खूप परिश्रम घेतले. त्यांचीही मी ऋणी आहे.

– नलिनी पंडित

प्रस्तावना

प्रा. नलिनी पंडित ह्यांचा, 'धर्म, शासन व समाज' हा छोटासा ग्रंथ आपल्या हाती देताना आम्हास आनंद होत आहे. प्रा. दामोदर धर्मानंद कोसंबी हे भारतीय समाजाच्या इतिहासाचा वास्तवतावादी व सामाजिक दृष्टिकोनातून वेध घेणारे आणि मानवतावादी मूल्यांचा पुरस्कार करणारे विचारवंत होते.

मानवी समाज आता एकविसाव्या शतकात पदार्पण करीत आहे. भारतीय समाजाने धर्मनिरपेक्ष, लोकशाहीवादी व समाजवादी भारत निर्माण करण्याचा निश्चय आपल्या राज्यघटनेद्वारे केला आहे. त्या वाटचालीला धर्मवादी, वर्णवादी, जातीयवादी शक्ती अडथळा आणण्याचा निकराचा प्रयत्न करीत आहेत. भारतात प्रगतीशील विचारप्रबोधन करण्याच्या क्षेत्रांत महाराष्ट्राने मौलिक योगदान केले आहे. ती परंपरा चालू ठेवण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत.

धर्म, शासन आणि समाज ह्यांचे परस्परसंबंध कोणते असावेत; आधुनिक युगाच्या नव्या समाजात धर्माचे स्थान कोणते, शासनाची भूमिका कोणती असावी, सामाजिक विकासाचे मार्ग कोणते, इत्यादि प्रश्नांवर विचारमंथन होणे अत्यंत आवश्यक आहे. त्या दृष्टीने प्रा. नलिनी पंडित ह्यांनी मराठवाडा विद्यापीठातर्फे झालेल्या म. गांधी स्मारक व्याख्यानमालेमध्ये दिलेली तीन व्याख्याने आम्ही ग्रंथरूपात प्रसिध्द करीत आहोत.

प्रा. नलिनी पंडित ह्या दामोदर कोसंबी प्रतिष्ठानच्या एक विश्वस्त आहेत. ह्या ग्रंथाच्या पहिल्या आवृत्तीच्या मानधनाची रक्कम प्रतिष्ठानकडेच जमा करावी, असे त्यांनी आम्हाला कळविले आहे. ह्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

– जयंत गडकरी
कार्यकारी विश्वस्त, दामोदर धर्मानंद कोसंबी प्रतिष्ठान

धर्म आणि इहवाद

धर्म हे भारतातील लोकांच्या जीवनाचे एक प्रभावी अंग आहे. पृथ्वीच्या पाठीवरील निरनिराळ्या देशांत आतापर्यंत ज्या संस्कृती होऊन गेल्या त्यांपैकी बहुतेक संस्कृतींना धर्माचे अधिष्ठान होते. आजही जगातील बहुसंख्य लोकांच्या मनावर धर्माचा जबरदस्त पगडा आहे. आधुनिक पाश्चात्य संस्कृतीचा उदय झाल्यावर समाज व्यवहारातील धर्माचे महत्त्व हळुहळू कमी होत गेले. सामाजिक जीवनाला वळण देऊ पाहाणाऱ्या बुद्धिवाद, उदारमतवाद, समाजवाद अशा नव्या सामाजिक तत्त्वज्ञानांचा उदय झाला. पाश्चात्य संस्कृतीशी संपर्क आल्यावर भारतातील काही प्रगमनशील सुशिक्षित लोकांच्या मनांवरही या नव्या मूल्यांचा प्रभाव पडला; आणि त्यांच्या आधारे समाज जीवनात बदल घडवून आणण्याची त्यांनी खटपट केली. त्यांच्याच प्रयत्नाने भारतातील निरनिराळ्या धर्मांच्या व जातींच्या लोकांना एकाच व्यासपीठावर एकत्र आणणाऱ्या इंडियन नॅशनल काँग्रेसची स्थापना झाली. इंग्रजांशी लढण्याच्या निमित्ताने निरनिराळ्या धर्माचे लोक एकत्र आल्यावर भारताच्या भावी शासनाचे स्वरूप कोणते राहील याची चर्चा होणे स्वाभाविक होते. या चर्चेमधून धर्मनिरपेक्ष शासनाच्या कल्पनेचा हळुहळू विकास झाला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर धर्मनिरपेक्ष शासन, व्यक्तीची प्रतिष्ठा, सामाजिक न्याय, समता आणि बंधुभाव यांवर आधारलेली लोकसत्ताक राज्याची घटना येथे मंजूर करण्यात आली.

भारतात धर्मनिरपेक्ष लोकसत्ताक राज्याची स्थापना व्हावी या दृष्टीने ज्यांनी प्रयत्न केले ते गांधी, नेहरू, आझाद, पटेल, राजेंद्रप्रसाद इत्यादी नेते

धर्मविरोधी नव्हते. नेहरूंचा एक अपवाद वगळता बाकीच्यांची धर्मावर दृढ श्रद्धा होती. गांधीजी स्वत:ला सनातनी हिंदू म्हणवून घेत. तरीही स्वयंशासित मानव आणि न्याय व समता यांवर आधारलेला दंडसत्ताविहीन असा समाज भारतात निर्माण करणे हेच त्यांनी जीवनाचे अंतीम उद्दिष्ट मानले होते. फाळणीचा मोठा धक्का बसल्यानंतरही आपले राष्ट्रीय नेते आपल्या ध्येयापासून विचलित झाले नाहीत. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर अवघ्या दोन अडीच वर्षांच्या काळातच त्यांनी धर्मनिरपेक्ष लोकशाहीवर आधारित राज्यघटना तयार केली. भारताच्या भोवतालची इतर अप्रगत राष्ट्रे एकामागोमाग एक अशी लष्करी हुकूमशाहीच्या टाचेखाली जात असताना गेली चाळीस वर्षे येथे लोकशाही शासनयंत्रणेची चौकट तत्त्वत: तरी अबाधित राहिली आहे ही गोष्ट आपल्याला निश्चितच अभिमानास्पद आहे. मात्र आंधळी धर्मनिष्ठा आणि धर्माधिष्ठित जमातवाद यांमधून अलीकडील काळांत या लोकशाहीला फार मोठा धोका निर्माण होऊ पाहात आहे. आक्रमक जमातवाद्यांपुढे इहवादी शक्तींचे बळ कमी पडताना दिसत आहे. आपले एकराष्ट्रीयत्तव व लोकशाही टिकवून धरण्याची ज्यांना इच्छा असेल त्यांना या जमातवादी शक्तींशी निकराचा झगडा करावा लागेल. तेव्हा धर्म व राष्ट्र यांचा संबंध काय? धर्मनिरपेक्ष शासनामागील भूमिका कोणती? धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वाचा स्वीकार केल्यामुळे भारतातील विशिष्ट परिस्थितीत आपणापुढे नेमके कोणते प्रश्न उभे राहत आहेत? आजच्या जमातवादाचे स्वरूप नेमके कसे आहे? त्याच्याशी मुकाबला करण्याचा मार्ग कोणता? यांचा ऊहापोह करण्याचा मी या व्याख्यानांत अल्पसा प्रयत्न करणार आहे. या विषयाची व्याप्ती खूप मोठी आहे तीन व्याख्यानांमध्ये त्यांचे सांगोपांग विवेचन करणे शक्य होणार नाही. तरीही त्याच्या मुख्य पैलूंचे थोडक्यात दिग्दर्शन करण्याचे मी योजिले आहे.

धर्माचा उदय

या दृश्य सृष्टीतील वस्तुमात्रात एक वा अनेक गूढ व अदृश्य अशा चैतन्यशक्ती आहेत. विविध मार्गांनी माणसाला या चैतन्य शक्तींशी संपर्क साधता येतो, त्यांना तो वश करून घेऊ शकतो, आणि त्यांच्या द्वारे त्याला आपले इप्सित साध्य करून घेता येते अशी श्रद्धा म्हणजे धर्म होय. या चैतन्यशक्तीचे स्वरूप आणि तिला वश करून घेण्याचे मार्ग यांबाबत निरनिराळ्या धर्मांमध्ये अनेक साम्यभेद आढळतात. ज्यांना प्रगत धर्म मानण्यात येते त्यांपैकी प्रत्येकात स्थूलमानाने कर्मकांड, उपासनापद्धती, तत्त्वज्ञान आणि नीती या धर्माच्या सर्व अंगांचा समावेश होतो. यांतील कर्मकांडाचा उगम आदिम समाजातील

यातुविधीमध्ये आहे. हजारो वर्षांपूर्वी मानव जातीच्या बाल्यावस्थेत टोळीने राहाणाऱ्या आदिवासी मानवांना विश्वातील नियमबद्धतेचा पहिला साक्षात्कार झाला. ढगांचा गडगडाट झाला की वीज चमकते, नंतर पावसाच्या धारा वाहातात, रात्रीनंतर दिवस उगवतो, साप चावला की माणूस मरतो हे त्यांच्या निदर्शनास आले. माणसातील चैतन्याप्रमाणे पृथ्वीवरील प्रत्येक वस्तू, वृक्ष प्राणी यांच्यामध्ये अव्यक्त व अनाकलनीय असे चैतन्य तत्त्व आहे अशी त्यांची कल्पना झाली. विशिष्ट क्रिया, विधी आणि मंत्रपठण यांमधून या चैतन्यशक्तींवर आपणांस ताबा मिळविता येतो; आणि त्यांच्याद्वारे आपल्या गरजा, कामना, आशाआकांक्षा पुऱ्या करून घेता येतात अशा समजुतीतून यातुक्रियेचा जन्म झाला. हे यातुविधी अनुकरणावर आधारित असतात. पावसाचे नृत्य केले, ढगांचा गडगडाट, वीजेचे चमकणे, पावसाच्या धारा यांचे नाटक केले की पाऊस पडणारच अशी आदिवासींची धारणा असते. आपल्या शत्रूला नामोहरम करण्याकरिता मंत्रोच्चारासहित लिंबू कापण्याची 'करणी' आजही बऱ्याच भाविक लोकांकडून करण्यात येते. मंत्रोच्चाराने सापाचे विष उतरते असे खेड्यातील बहुतेक लोक मानतात. या सर्व समजुती पिढ्यानपिढ्या चालत आल्या असल्या तरी त्यांचा उगम आदिवासी लोकांच्या यातुक्रियेमध्येच आहे. वैदिक आर्यांचा यज्ञ हाही एक यातुविधीच होता. यज्ञक्रियेतून एक अपूर्व शक्ती निर्माण होते आणि ती यजमानाला इष्ट फलाची प्राप्ती करून देते. मंत्रोच्चारा-सहित यातु विधी काटेकोरपणे पार पाडला तर फलसिद्धी होणारच अशी वैदिक आर्यांची दृढ श्रद्धा होती. यातुविधी करणारा मनुष्य कोणत्याही देवतेला शरण जात नाही. याचकवृत्ती स्वीकारून दीनवाणीपणाने तिच्यापुढे पदर पसरत नाही. मंत्रशक्ती आणि ठराविक विधी यांच्याद्वारा तो यातुत्त्वावर नियंत्रण मिळवितो. एखाद्या विज्ञानोपासकाप्रमाणे विश्वव्यापारातील कार्यकारणभावावर त्याचा अढळ विश्वास असतो. या दृष्टीने पाहता देवतेची कृपा आणि कोप यांच्यावर विश्वास ठेवणाऱ्या धर्मोपासकापेक्षा त्याची समजूत विज्ञानाच्या अधिक जवळ आहे. मात्र तो मानीत असलेला कार्यकारणभाव खऱ्या प्रयोगसिद्ध ज्ञानावर अधिष्ठित नसून केवळ एक लोकभ्रम असतो. त्यामुळे प्रत्यक्षात त्यातून फलसिद्धी होत नाही. कालांतराने या यातुविधींभोवती शकून, अपशकून यांच्या कल्पना, अंधश्रद्धा यांचे कोंडाळे जमते. पुढे उच्चतर धर्मकल्पनांचा प्रसार झाल्यावर समाजजीवनांतील यातुविधींचे प्रस्थ पुष्कळच कमी झाले. तरीही अंगात देव येणे, देवाला मनुष्य अथवा पशु बळी देणे, मुलींचा त्याच्याशी विवाह लावणे, करणी, भानामती अशा प्रकारांवरील श्रद्धा समाजजीवनातील निरनिराळ्या थरांत

अद्याप तग धरून आहेत. या यातुविधींमधील मध्यस्थ म्हणून तांत्रिक, भगत इत्यादिकांचा एक वेगळा वर्ग अस्तित्त्वात आलेला दिसून येतो.

ईश्वरोपासना

यातुशक्ती नेहमी आपल्या आधीन राहात नाहीत याची जाणीव झाल्यावर देवतांच्या कल्पनेचा उगम झाला. यातुविधीतील नियमाधीनतेची कल्पना मागे पडली. देवतांना शरण जाऊन पूजाअर्चा केल्याने त्या प्रसन्न होतात आणि आपले मनोरथ पुरे करतात अशी भाविकांची श्रद्धा असते. पृथ्वी, आकाश, नदी, पर्वत, वृक्ष, नाग अशा अनेक देवता मानल्या गेल्या; आणि कोंबडा, बकरे, घोडे, गायी किंवा माणूस बळी देऊन त्यांना प्रसन्न करण्याचा प्रयत्न सुरू झाला. जुन्या यातुविधींचा आता परमेश्वराच्या पूजेसाठी करावयाच्या विधींमध्ये समावेश झाला. मूर्तिपूजेला विरोध करणाऱ्या मुसलमान व ख्रिस्ती धर्माचे अनुयायीही यातुविधी व अंधश्रद्धा यांतून मुक्त नाहीत. ईदला बळी दिलेला बकरा आपल्या पाठीवरून यजमानाला स्वर्गात घेऊन जातो अशी येथील मुसलमानांची श्रद्धा आहे. या विधीपैकी काही विधी अत्यंत क्रूर व समाजातील दुर्बल घटकांना अमानुष वागणूक देणारे असतात. समाजसुधारकांनी त्यांच्याविरूद्ध झगडा करून लोकांच्या समजुतीत सुधारणा घडवून आणण्याची अद्यापही गरज आहे.

मानवाचा विकास झाल्यावर धर्माबद्धलची त्याची कल्पनाही विकास पावत गेली. यज्ञातील पशुहिंसेचा निषेध करून गौतम बुद्धाने अहिंसेची शिकवण दिली. त्यानंतर जिवंत प्राण्यांऐवजी पान, पुष्प, फल, तोय अशा वस्तू अर्पण करून देवतांची पूजा करण्याची प्रथा रूढ झाली. अनेक क्षुद्र देवतांऐवजी एकाच जगन्नियंत्या परमेश्वराची कल्पना पुढे आली. अनेक छोटया आदिवासी जमाती एकत्र येऊन प्रादेशिक राज्यांची स्थापना झाली. राजा जसा प्रजेचा नियंता असतो तसा परमेश्वरही सर्व विश्वाचा नियंता आहे ही कल्पना लोकांच्या मनांत रूजू लागली. आदिवासींचे देव क्रूर व भीतीदायक होते. आता परमेश्वर क्रूर नाही. तो न्यायी, दयाळू व दीनदुबळयांचा वाली आहे असे मानण्याची प्रवृत्ती झाली. ज्यू, ख्रिस्ती, मुसलमान हे धर्म तर प्रारंभापासूनच एकेश्वरवादी होते. हिंदू धर्मात अनेक दैवते असली तरी राम व कृष्ण हे विष्णूचेच अवतार मानलेले आहेत. जोतिबा, खंडोबा इत्यादी स्थानिक देव शंकर, किंवा विष्णु यांचीच रूपे समजली जातात आणि हरि व हर हे अंतीम दृष्टचा एकच आहेत असे अनेक तत्त्ववेत्त्यांनी व साधुसंतांनी प्रतिपादन केले आहे.

धर्माचा संबंध ऐहिक जीवनाशी नसून पारलौकिकाशी आहे असे मानले जाते. मृत्यूनंतरचे आपले जीवन सुखी व्हावे अशी प्रबळ इच्छा धार्मिक श्रद्धेमागे

असते यांत शंका नाही. परंतु बहुसंख्य माणसे ऐहिक जीवनातील इच्छापूर्ती-साठीच परमेश्वराला शरण जातात. वैदिक आर्यांच्या प्रार्थनेतही वंशवृद्धी व धनधान्यसमृद्धी यांची परमेश्वरापाशी मागणी केलेली आढळते. आजही बहुसंख्य भाविकांचे नवस पुत्रप्राप्ती, रोगमुक्ती, संकट निवारण यांसाठीच केले जातात. परमेश्वर सदैव आपल्या पाठीशी आहे या श्रद्धेमुळे त्यांचा सुरक्षितता वाटते. त्यांच्या दु:खामध्ये त्यांना दिलासा मिळतो. संकटांनी ती खचून जात नाहीत. भविष्याविषयी त्यांच्या मनात आशा निर्माण होते. माणसांच्या भावनिक गरजा भागविण्याच्या या क्षमतेमुळेच विद्येची वाढ होऊनही धर्म अद्याप टिकून राहिला आहे.

तत्त्वज्ञान

यातुविधी आणि कर्मकांड यांचा अतिरेक झाल्यावर प्राचीन काळातही त्यांच्याविरुद्ध विचारी माणसांची प्रतिक्रिया होणे स्वाभाविक होते. हिंदू धर्मपरंपरेत कर्माबरोबर ज्ञान, योग आणि भक्ती हे ही परमेश्वरप्राप्तीचे मार्ग म्हणून मान्यता पावले आहेत. उपनिषद्कालीन ऋषी आणि गौतमबुद्ध व महावीर यांनी कर्मकांडाचा निषेध करून माणसाच्या अंतर्मुखतेवर भर दिला. उच्चतर धार्मिक जीवन जगण्यासाठी शरीरसुखाचा त्याग करण्याची आवश्यकता त्यांनी प्रतिपादन केली. चिंतन, वैराग्य, तप यांना त्यांनी अधिक महत्त्व दिले. अदृश्याचे चिंतन करणाऱ्या ऋषींमध्ये सृष्टीचे गूढ उकलण्याची जिज्ञासा निर्माण झाली. हा जन्म मिळण्यापूर्वी आपली स्थिती कोणती होती? मरणानंतर माणसाचे काय होते? देहाची माती झाली म्हणून चैतन्य लोप पावते का? ही सृष्टी कोणी निर्माण केली? ईश्वर, मानव व सृष्टी यांचा संबंध काय? ईश्वराचे स्वरूप कसे आहे? मानवी जीविताचे साफल्य कोणत्या गोष्टीत आहे? असे नाना प्रश्न त्यांच्या मनांत उभे राहिले. जगातील इतर देशांतील तत्त्वचिंतकांनाही अशाच प्रश्नांचा विचार करणे भाग पडले. निरनिराळ्या धर्मातील तत्त्वचिंतकांनी या प्रश्नांना निरनिराळी उत्तरे दिलेली आहेत. ईश्वर, सृष्टी व मानव यांच्या-विषयींच्या कल्पनांमध्ये परस्पर सुसंगती साधण्याच्या प्रयत्नांमधून अनेक धर्म विषयक तत्त्वज्ञाने अस्तित्वात आली. धर्माने माणसाला जीवनाकडे पाहाण्याचा एक समग्र दृष्टिकोन दिला.

वैयक्तिक आणि सामाजिक नीती

धर्म हे सामाजिक जीवनाचे एक अंग असल्याने ईश्वर, सृष्टी व मानव यांच्यामधील संबंधाप्रमाणे मानवांमधील संबंधांचाही त्यात विचार केला गेला आहे. आदिवासी जमातीत सामाजिक जीवनातील सहकार्य व स्थैर्य यांना पोषक

असे सामाजिक संकेत स्वाभाविक रीत्याच निर्माण झालेले होते. पुढे प्रादेशिक समाजांची स्थापना झाल्यावर माणसामाणसांमधील संबंधातील मूल्यांची प्रत्येक व्यक्तीला जाणीव करून देण्याचे कार्य धर्माने पार पाडले. माणसाने खरे बोलावे, दुसऱ्यांची निंदानालस्ती करू नये, चोरी व हिंसा करू नये, अंमली पदार्थांच्या आहारी जाऊ नये, विवाहबाह्य संबंध ठेवू नयेत अशा प्रकारचे सामूहिक जीवन जगण्यासाठी आवश्यक असे नीतिनियम सर्वच धर्मांमध्ये आपणांस आढळून येतात.

वैयक्तिक आचरणाप्रमाणे समाजातील निरनिराळ्या वर्गांच्या परस्पर-संबंधाबाबतचे नियमही धर्माने ठरवून दिलेले आहेत. ज्याने समाजाची धारणा होते तो धर्म अशी हिंदू धर्मशास्त्रांनी धर्माची व्याख्या केली आहे. टिळकांसारख्या आधुनिक काळातील तत्त्ववेत्त्यांनीही तीच प्रमाण मानली आहे. भारतीय जनजीवनाची जशी उन्नती होत गेली तशी स्वाभाविक रीत्याच एक श्रम विभागणी येथे अस्तित्त्वात आली. कुटुंब, जाती ग्राम व शासन अशा निरनिराळ्या संस्था उभ्या राहिल्या. या संस्था ईश्वरनिर्मित किंवा सनातन व अपरिवर्तनीय आहेत, त्यांच्यातील श्रमविभागणीप्रमाणे आपल्या वाटचाला आलेले विहितकर्म फलाची कोणतीही आशा न बाळगता केवळ कर्तव्यकर्म म्हणून करत राहाणे हीच नीती होय असा जीवनादर्श लोकांसमोर ठेवण्यात आला. ख्रिस्ती किंवा मुसलमान धर्मांमध्ये धर्माची आर्थिक व्यवसायाशी अशी सांगड घालण्यात आलेली नाही. तरीही त्या त्या प्रदेशातील विशिष्ट काळातील सामाजिक व्यवहारांच्या नियमांना त्या त्या धर्मशास्त्रांची मान्यता मिळाली आणि धार्मिक आचारांत त्यांचा समावेश करण्यात आला.

मात्र जगातील सर्व धर्मांनी ऐहिक जीवन हे एक साधन मानले. कालाचा अखंड प्रवाह ध्यानात घेता मानवाचे इहलोकातील वास्तव्य केवळ क्षणभंगूर असते. तेथेही त्याला दुःखाचाच नित्य प्रत्यय येतो. म्हणून ऐहिक सुरवात मग्न न होता मरणोत्तर सद्गती, स्वर्ग अथवा मोक्ष मिळविण्याच्या दृष्टीनेच त्याने आपल्या जीवनाची आखणी करावी अशी सर्व धर्मांची शिकवण होती.

धर्माचा विस्तार झाल्यावर धर्मविधींमध्ये लोकांना साहच करणाऱ्या पुरोहितांचा आणि धर्म ग्रंथांचा अर्थ लावणाऱ्या शास्त्रीपंडितांचा, मुल्लामौलवींचा म्हणजेच धर्मगुरुंचा वर्ग प्रत्येक धर्मात उदयास आला. आपले समाजातील स्थान कायम राहावे म्हणूने हे धर्मगुरू कळतनकळत बाहच आचारांचे महत्त्व वाढवितात. त्यांच्यामध्ये बदल घडवून आणण्यास त्यांचा नेहमीच विरोध असतो.

प्रस्थापित समाजसंस्थांचे ते समर्थन करीत असल्याने सत्ताधारी वर्गाचा त्यांना पाठिंबा मिळतो. आर्थिक साहचासाठी धर्मगुरु राजाश्रयावर अवलंबून राहातात. आणि राजा हा ईश्वरी अंश आहे किंवा विष्णूचाच अवतार आहे असे प्रतिपादन करून धर्मगुरू लोकांच्या मनावर राजनिष्ठेचे संस्कार करतात. परस्परांच्या साहचांनेच या दोन्ही संस्था मध्ययुगाच्या अखेरीपर्यंत टिकून राहिल्या होत्या.

प्रादेशिक भक्तिपंथ

धर्म जसा सनातन आहे तसाच तो सतत बदलणाराही आहे. जगातील प्रत्येक धर्मात सनातनी आणि सुधारक अशा दोन्ही परंपरा सातत्याने चालत आलेल्या आहेत. सनातन्यांनी प्राचीन भाषा, शास्त्र प्रामाण्य, धर्मगुरुंचे श्रेष्ठत्त्व, आचारधर्मातील काटेकोरपणा यांचा आग्रह धरला. उलट धर्मसुधारकांनी भक्तिभाव, चित्तशुद्धी, सदाचार, परोपकार ह्यांच्या मधूनच परमेश्वर प्रसन्न होतो अशी भूमिका घेतली. जुन्या काळातील नवे सामाजिक विचारही धर्माच्या माध्यमातूनच प्रगट झाले. धर्माचे अत्यंत विकसित असे स्वरूप यांपैकी काही धर्मपंथांमध्ये आपणास पहावयास सापडते.

महाराष्ट्रातील वारकरी पंथही असाच एक सुधारणावादी पंथ होता. वैदिक परंपरेने ज्ञानार्जनाचा अधिकार फक्त त्रैवर्णिकांपुरताच मर्यादित ठेवला होता. भागवतधर्माने आध्यात्मिक ज्ञानाची कवाडे सर्व जातींच्या स्त्रीपुरुषांना खुली केली. भगवग्दीतेवर मराठीत टीका लिहून ज्ञानेश्वरांनी सामान्य लोकासाठी ब्रह्मविद्येचा सुकाळ करून सोडला. मध्ययुगामध्ये भारताच्या निरनिराळ्या प्रदेशात जे भक्तिपंथ उदयास आले त्यांनी क्षुद्र देवताभक्तीचा निषेध करून एकेश्वरवादाचा प्रसार केला. बहुजनसमाजामध्ये धार्मिक जागृती घडून आल्यावर निरनिराळ्या जातींमधून अनेक संतकवी उदयास आले. स्त्रियाही स्वयंस्फूर्तीने काव्यरचना करू लागल्या. या संतांच्या साहित्यामधून भारतातील लोकभाषांचे भांडार समृद्ध झाले.

ज्ञान, योग आणि कर्म हे मार्ग समाजातील काही मोजक्या लोकांच्याच आवाक्यातील होते. म्हणून समाजातील तळच्या थरातील माणसालाही सहज-साध्य अशा भक्तिमार्गाचा संतांनी पुरस्कार केला. परमेश्वर भावाचा भुकेला आहे. तो भक्ताशी बोलतो, त्याला सोबत करतो, संकटात त्याच्या साह्याला धावून येतो. परमेश्वराशी ज्याचे असे नाते जुळले असेल त्याचे अंतःकरण दुःखाने विचलीत होत नाही. संकटांनी त्याचै धैर्य खचत नाही. परमेश्वराच्या सान्निध्याने त्याचे जीवन अंतर्बाह्य उजळून निघते. क्षुद्र विचार त्याच्या मनाला स्पर्श करू

शकत नाहीत. त्याची स्वाभाविक वर्तणूक हीच नीती बनते. विश्वाच्या एकात्मभावाचा आपल्या जीवनात त्याला प्रत्यय येतो. स्वर्गनरकाचे त्याला आकर्षण राहात नाही. भोग आणि मोक्ष यांच्यापासून पराङ्मुख होऊन तो याची देही यांचि डोळा मुक्तीचा सोहळा भोगतो. ऐहिक जीवनात राहून आत्म-साक्षात्काराचा हा आनंद मिळविण्यातच मानवी जीविताचे साफल्य आहे असा संतांच्या शिकवणुकीचा इत्यर्थ आहे.

संतांचा हा जीवनादर्श प्रत्यक्षात आणण्यासाठी फार मोठ्या कष्टाची अथवा त्यागाची आवश्यकता नाही. योगामधून निरनिराळ्या सिद्धी प्राप्त करून घेऊन चमत्काराच्या साह्याने आपले धार्मिक श्रेष्ठत्त्व सिद्ध करू पाहाणाऱ्या योग्याचा अहंकार खऱ्या धर्मनिष्ठेला बाधक असतो असेच त्यांचे मत होते. मूर्तिपूजेला त्यांचा विरोध नव्हता. परंतु पूजाविधी आणि आणि व्रतेवैकल्ये यांत रमून जाणारी माणसे पुष्कळदा आतून कोरडी राहातात अशी त्यांची तक्रार होती. ज्ञानाचे महत्त्व यांना मान्य होते. पण मायेच्या पाशातून मुक्त होण्यासाठी शंकराचार्यांनी उपदेशिलेला संन्यास मार्ग त्यांना पसंत नव्हता. संन्यासी झाला तरी त्याला देहधर्म सुटत नाहीत. तेव्हा भिक्षापात्र अवलंबिण्यापेक्षा जाति-व्यवस्थेने ठरवून दिलेला आपला व्यवसाय करून स्वतःचा व आपल्या कुटुंबाचा निर्वाह चालविणे केव्हाही श्रेयस्कर होय असे संतांनी आवर्जून सांगितले आहे. भोगवाद व संन्यास या दोघांनाही दूर सारून संसारात आपल्या वाटचाला आलेली सुखदुःखे शांत व समदृष्टीने स्वीकारण्याचा त्यांनी आपल्या अनुयायांना उपदेश केला. त्यामुळे त्यांचा भक्तिमार्ग सामाजिक प्रगतीला उपकारक ठरला.

ज्ञानेश्वरादि संतांनी विश्वाच्या मूलभूत ऐक्यावर सतत भर दिला आहे. आत्मतत्त्व एकच आहे आणि ते सर्वत्र भरून राहिले आहे. म्हणून परमार्थाच्या क्षेत्रात कुल, जाती, वर्ण यांवर आधारलेला उच्चनीचभाव आणि जन्मसिद्ध अधिकारभेद यांना थारा नाही. माणसाची योग्यता ठरविताना ह्या बाह्य गोष्टींऐवजी त्याच्या अंतःकरणाची शुद्धता, सत्यनिष्ठा, सदाचार, परोपकारबुद्धी इत्यादी गुणांचा विचार केला पाहिजे असे त्यांचे म्हणणे होते. सामाजिक जीवनातील धर्मशास्त्रे आणि रूढी यांच्या प्रामाण्यावर त्यांनी हल्ला चढविला नाही. परंतु जातीचे श्रेष्ठत्त्व आणि कुळाची प्रतिष्ठा यांऐवजी वैयक्तिक सद्गुणांना महत्त्व देऊन सामाजिक विषमतेची धार त्यांनी कमी केली. धार्मिक क्षेत्रापुरता का होईना पण सर्व मानवांच्या समानतेच्या तत्त्वाचा त्यांनी आग्रह धरला.

मुसलमानी धर्मातील सुफी पंथाचे या भक्तिपंथांशी पुष्कळच साम्य आहे. न्या. रानडे यांनी वारकरी संप्रदायाची ख्रिस्ती धर्मातील प्रॉटेस्टंट पंथाशी तुलना करून त्यांना हिंदू प्रॉटेस्टंट नावाने संबोधिले आहे. निरनिराळ्या धर्मांमधील या प्रगत धर्मकल्पनेची विज्ञानाशी सांगड घालण्याच्या प्रयत्नातून एकोणिसाव्या शतकातील आधुनिक धर्मकल्पनेचा विकास झाला आहे.

आधुनिक युगाचा प्रारंभ

पंधराव्या शतकानंतर युरोपात एका मोठ्या सामाजिक स्थित्यंतराला सुरवात झाली. ग्रीक विद्येचे पुनरुज्जीवन, प्रॉटेस्टंट धर्मसुधारणेची चळवळ विज्ञानाचा उदय आणि विकास, अठराव्या शतकातील फ्रेंच राज्यक्रान्ती आणि एकोणिसाव्या शतकातील औद्योगिक क्रान्ती हे या स्थित्यंतरातील महत्त्वाचे टप्पे मानले जातात. या स्थित्यंतरानंतर विज्ञानाधिष्ठित, उद्योगप्रधान अशी एक नवी संस्कृती पाश्चात्य देशांत उदयास आली. दळणवळणाच्या साधनांचा विकास, बाजार पेठांचा विस्तार, युरोपीय लोकांनी उभारलेली साम्राज्ये आणि आधुनिक शिक्षणाचा प्रसार यांमधून पृथ्वीवरील निरनिराळ्या देशांत या आधुनिक संस्कृतीचा प्रसार झाला. भौतिक जीवनातील या स्थित्यंतराचा लोकांच्या विचारांवर परिणाम होणे स्वाभाविक होते. त्यामुळे औद्योगिक परिवर्तनाच्या या काळात एका मोठ्या विचारमंथनालाही प्रारंभ झाला.

युरोपमधील या सामाजिक व आर्थिक क्रांतीला कारणीभूत झालेली सर्वात मोठी घटना म्हणजे विज्ञानाचा उदय व विकास ही होय. विज्ञानपूर्वकाळातील ज्ञान हे बव्हंशी शब्दप्रामाण्यावर आधारित होते. धर्मग्रंथांमधून ईश्वराचा संदेश ग्रथित झाला असल्याने हे ज्ञान त्रिकालाबाधित व संपूर्ण आहे. त्यात उणिवा व चुका असण्याची शक्यता नाही अशी पूर्वीच्या लोकांची कल्पना होती. ध्यान आणि चिंतन हाही ज्ञानप्राप्तीचा दुसरा मार्ग समजला जात होता. आपल्या मनोवृत्तींवर पूर्ण ताबा मिळवून चिंतनात मग्न झालेल्या योग्याला कोणे एके क्षणी ईश्वराचा साक्षात्कार होतो. त्याला भूत, वर्तमान आणि भविष्य अशा सर्व काळांतील सर्व घटनांचे ज्ञान होऊ शकते असा लोकांचा विश्वास होता. विज्ञानातील ज्ञानाची संकल्पना या पूर्वीच्या संकल्पनांहून अगदी वेगळी आहे. मानवाचा इंद्रीयजन्य अनुभव हा विज्ञानाचा पाया आहे. पंच ज्ञानेंद्रियांमार्फत माणूस निरनिराळ्या अनुभवांचे संकलन करतो. आणि बुद्धीच्या योगाने त्यांचे विश्लेषण करून त्यांना एका सूत्रात जोडणारे सामान्य तत्त्व तो शोधून काढतो. पुन्हा अधिक अनुभवांच्या द्वारे या अभ्युपगमाला कसोटी लावली जाते. अनुभवांचे

संकलन, गृहीतकांची तपासणी आणि नव्या अभ्युपगमांचा शोध यांमधून विज्ञानाची प्रगती होत जाते. हे ज्ञान मानवी प्रयत्नांनी प्राप्त होते. ते अपूर्ण आहे हे सर्व जण मान्य करतात. विज्ञानात पूर्ण ज्ञानाची, त्रिकालज्ञ पुरुषाची कल्पना नाही. शिवाय या ज्ञानाचे विषय सृष्टी, मानव, समाज असे ऐहिक आहेत.

विज्ञानाचा प्रभाव

आर्थिक उत्पादनाच्या गरजेतून फार प्राचीन काळातच तंत्रविद्येचा उगम झालेला होता. परंतु विज्ञानपूर्वकाळात तिचा विकास केवळ अनुभवाशी निगडीत होता. सोपपत्तिक ज्ञानाची तिला जोड मिळाली नव्हती. विज्ञानातील शोधांचा तंत्रविद्येत वापर होऊ लागल्यावर परस्परसाह्याने दोघांचाही विकास झाला. तंत्रविद्येमुळे मानवी श्रमांची उत्पादकता वाढली. दळणवळणाच्या साधनांचा विकास झाला. मोठ्या प्रमाणावर उत्पादन होऊ लागले. निरनिराळ्या रोगांची कारणे शोधून काढण्यात आली. अकालमृत्यूचे प्रमाण घटले. लोकांच्या आयुर्मानात वाढ झाली. वैज्ञानिक ज्ञानाची उपयुक्तता अनुभवास आल्यावर या ज्ञानाला प्रतिष्ठा प्राप्त झाली. विज्ञानातील सिद्धान्तांमुळे जुन्या धर्मग्रंथातील सृष्टीविषयक विधाने खोटी ठरली होती. त्यांच्यावरील लोकांच्या श्रद्धेला धक्का बसला होता. तेव्हा सामान्य लोकांची धर्मावरील श्रद्धा टिकवून धरावयाची असेल तर आपल्या ईश्वरविषयक कल्पनांची विज्ञानाशी सुसंगत अशा नव्या पद्धतीने मांडणी करणे आवश्यक आहे अशी धार्मिक तत्त्ववेत्यांची खात्री पटली. त्यामधून नव्या धार्मिक विचारांना चालना मिळाली.

विज्ञानोत्तर काळात युरोपातील मध्यमवर्गाच्या उत्पन्नात वेगाने वाढ होत होती. लोकांच्या जीवनाच्या कक्षा रुंदावत चालल्या होत्या. औद्योगिक विकासाच्या नव्या संधी त्यांना समोर दिसत होत्या. त्यामुळे मध्यमवर्गियांच्या मनातील बदलाबद्दलची भीती हळूहळू कमी होत गेली. मध्ययुगात प्रस्थापित समाजसंस्था व चालीरीती यांचे संरक्षण करणे हेच आपले कर्तव्य आहे अशी लोकांची भावना होती आता सामाजिक प्रगतीसाठी अपरिहार्य असलेले बदल घडवून आणण्यासाठी त्यांच्या मनाची तयारी होऊ लागली. औद्योगिक क्रांतीनंतर समाजजीवन अत्यंत गुंतागुंतीचे बनत चालले होते. आर्थिक बदलामुळे जे नवे प्रश्न लोकांपुढे उभे राहिले त्यांना जुन्या धर्मग्रंथात उत्तरे नव्हती. नव्या समस्यांना तोंड देण्यास जुन्या परंपरा व जुनी शास्त्रे अपुरी पडत होती. तेव्हा नीती कशाला म्हणावयाचे? धर्म व नीती यांचा सबंध काय? नीतितत्त्वे सनातन असली तरी बदलणाऱ्या समाजव्यवस्थेला ती कशी लागू करावयाची? याचा तत्त्वचिंतकांना

विचार करावा लागला. विज्ञानाच्या उपयुक्ततेचा प्रत्यय आल्यावर त्यातील संशोधनपद्धतीचा वापर करून सामाजिक संस्थांचा अभ्यास करण्यास अनेक लोक प्रवृत्त झाले होते. सृष्टीविज्ञान बव्हंशी मूल्यनिरपेक्ष असते. पण सामाजिक जीवनाची चिकित्सा करणाऱ्यांना मूल्यविचार दृष्टीआड करून चालत नाही. धर्म हा नीतीशी निगडीत असला तरी तो श्रद्धेवर आधारलेला होता. विज्ञानाला प्रतिष्ठा प्राप्त झाल्यावर धार्मिक मूल्यांची बुद्धिनिष्ठ पद्धतीने चिकित्सा सुरू झाली. धर्म आणि विज्ञान यांच्या संघर्षामधून आधुनिक इहवादी सामाजिक तत्त्वज्ञानांचा विकास झाला.

नव्या धर्मविचारांचा उदय

इंग्रजी राजवटीत भारतातही एका मूलभूत सामाजिक परिवर्तनाला प्रारंभ झाला. इंग्रजांची शासनपद्धती कायद्याचे राज्य, संपत्तीची खाजगी मालकी, वैयक्तिक हक्क व जबाबदारी, स्पर्धा आणि करार या तत्त्वांवर अधिष्ठित होती. तिच्या पार्श्वभूमीवर शहरांमधून अत्यंत मर्यादित स्वरूपात का होईना पण एका नंव्या भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा जन्म झाला. इंग्रजांनी काढलेल्या शिक्षणसंस्था सर्व जाती व वर्गांच्या स्त्रीपुरुषांसाठी तत्त्वतः खुल्या होत्या. त्यांच्यामधून धर्म निरपेक्षतेच्या दृष्टिकोनातून सृष्टीविज्ञान व समाजविज्ञान यांचे शिक्षण विद्यार्थ्यांना दिले जात होते. या शिक्षणसंस्थांमधून आधुनिक इहवादी सामाजिक विचारांचा आपल्याकडील सुशिक्षितांना प्रथम परिचय झाला.

इंग्रजी राज्यात ख्रिस्ती धर्माचा प्रसार करण्यासाठी जे धर्मोपदेशक येथे आले त्यांनी भारतातील जुन्या धर्मकल्पनांवर जोराचा हल्ला करून आपल्या धर्माचे श्रेष्ठत्त्व लोकांना समजावून सांगितले. ख्रिस्ती धर्मोपदेशकांचा हल्ला मुख्यतः येथील दुष्ट धार्मिक चालीरीती व अन्याय रूढी यांवर होता. त्यांच्या युक्तिवादाने प्रभावित झालेल्या काही नवशिक्षितांनी हिंदू धर्माचा त्याग करून ख्रिस्ती धर्माची दीक्षा घेतली. तेव्हा त्यांच्याशी मुकाबला करण्याची हिंदू विचारवंतांनाही गरज वाटू लागली ख्रिस्त्यांच्या हल्ल्यांना प्रत्युत्तर देण्याच्या हेतूने येथील काही शास्त्रीपंडितांनी ख्रिस्ती धर्मातील अंधश्रद्धांवर जोराचा प्रतिहल्ला चढविला. परंतु आधुनिक शिक्षण घेतलेल्या सुशिक्षितांचे या उत्तरा प्रत्युत्तराने समाधान झाले नाही. आपल्या परंपरागत धर्माचा त्याग करून दुसरा धर्म स्वीकारण्याची त्यांना मुळीच इच्छा नव्हती. म्हणून अंतर्मुख दृष्टीने हिंदू धर्माची चिकित्सा करून त्याच्यातील दोष काढून टाकण्याचा व त्याला नवीन वळण देण्याचा मार्ग त्यांनी स्वीकारला. युरोपातील अनेक तत्त्ववेत्यांनी

परंपरागत ख्रिस्ती धर्मश्रद्धांचे व चालीरीतींचे विश्लेषण करून नव्या धार्मिक विचारांचा पुरस्कार केला होता. आपल्याकडील विचारवंतांनी या नवीन धार्मिक तत्त्वज्ञानांचा अभ्यास केला आणि त्यांतील मूलतत्त्वांना अनुसरून आपल्या धर्मकल्पनांची नव्याने मांडणी केली. दादोबा पांडुरंग, लोकहितवादी , डॉ. आत्माराम पांडुरंग, महात्मा ज्योतीराव फुले, न्या. रानडे, डॉ. भांडारकर, महर्षि शिंदे हे या क्षेत्रात अग्रभागी होते. त्यांच्या प्रेरणेने परमहंस मंडळी, प्रार्थना समाज, सत्यशोधक समाज अशा संस्था स्थापन झाल्या. विसाव्या शतकात महात्मा गांधी आणि डॉ. आंबेडकर यांनी हीच परंपरा पुढे चालविली. या सर्व धर्मसुधारकांच्या कार्यामधून आपल्या लोकांना नव्या धर्मकल्पनांची ओळख झाली.

धर्म आणि व्यवहार यांची फारकत

इंग्रजपूर्व काळात भारतातील हिंदू समाजात खाणे, पिणे, विवाह, शिक्षण यांवर जातिसंस्थेने घातलेले निर्बंध, व्यावसायिक नीतिनियम, कौटुंबिक चालीरीती, कायदे आणि नीती या सर्वांनाच धर्म मानण्यात येत होते. धर्म हा सनातन व अपरिवर्तनीय आहे अशी लोकांची समजूत होती. म्हणून समाज-सुधारकांना धर्म आणि व्यवहार यांची फारकत करावी लागली. "कालमाहात्म्ये करून हिंदू धर्माची सुधारणा करणे जरूर आहे. त्याशिवाय या लोकांचा परिणाम लागणार नाही ईश्वरसंबंधी धर्म आहे तो मात्र आचल आहे. परंतु शास्त्रातील कायदे जरूर वरचेवर फिरले पाहिजेत."[१] असे मत लोकहितवादींनी स्पष्टपणे मांडले आहे. जोतीराव फुले यांची ईश्वरावर दृढ श्रद्धा होती. परंतु धर्माची व्याप्ती ईश्वरमानव संबंधापुरती मर्यादित ठेवावी. परंपरागत आचारविचार हे धर्म नव्हेत. "घरे बांधणे हा सुताराचा धर्म नव्हे; परंतु हा त्याचा धंदा होय. निर्वाहाकरता पडझड जनावरे खाणे हा मांग, महार यांचा धर्म नव्हे, परंतु हा त्याचा लाचारीपणा व निरुपाय होय. चोर, बंडखोर व धूर्त लबाडांच्या त्रासापासून प्रजेचा व आपला बचाव करण्यापुरती करपट्टी रयतेपासून घेणे हे राजाचे कर्तव्यकर्म होय."[२] असे म्हणून धर्म व व्यवहार यांच्यातील फरक त्यांनी स्पष्ट केला. "आपल्या सर्वांचा निर्माणकर्ता व त्याने निर्माण केलेले मानवप्राणी यांचा संबंध दाखविणारा तो'[३] धर्म होय अशी त्यांनी धर्म शब्दाची व्याख्या केली आहे.

ऐहिक जीवन

मध्ययुगामध्ये जमीन हेच उत्पादनाचे प्रमुख साधन होते. परंतु युरोपप्रमाणे मोठ्या प्रमाणावर जमिनीची खाजगी मालकी येथे अस्तित्त्वात नव्हती. त्यामुळे

अर्थार्जनाला येथे कधीच स्वतंत्र प्रतिष्ठा प्राप्त झाली नाही. सामान्य लोकांच्या मनावर अध्यात्मवादाचे संस्कार होते. पैसा हा माणसाच्या उत्कर्षाचे साधन नसून त्याच्या अधःपातालाच तो कारणीभूत होतो असा त्यांचा समज होता. संतांनी ऐहिक जीवन आणि परमार्थ यांचा समन्वय साधला खरा. पण त्याचा अर्थ आपला परंपरागत जातिव्यवसाय प्रत्येकाने ईश्वरार्पणबुद्धीने व तत्परतेने पार पाडावा इतकाच होता.

यूरोपमधील प्रॉटेस्टंट धर्मसुधारकांनीही परमेश्वरप्राप्तीचे साधन म्हणून प्राप्तकर्माचे महत्त्व वर्णिले आहे. परंतु ख्रिस्ती धर्माने प्रत्येक व्यक्तीचा व्यवसाय जन्माने ठरवून दिला नव्हता. प्रत्येकाला परिस्थितीनुसार प्राप्त झालेल्या संधीचा फायदा घेऊन स्वतःचा व्यवसाय निवडण्याची मुभा होती. हा व्यवसाय सचोटीने करून त्यात यश मिळाले, धनसंपत्ती प्राप्त झाली तर ते परमेश्वराच्या प्रसादाचे चिन्ह समजण्यात यावे. मात्र हा व्यवसाय अत्यंत सचोटीने व दुसऱ्याला न फसविता करण्यात आला पाहिजे आणि त्यातून मिळालेल्या संपत्तीचा विनियोग भोगासाठी न होता उदचोग धंद्याच्या वाढीसाठी व समाजकल्याणासाठी झाला पाहिजे अशा दोन अटी या तत्त्ववेत्यांनी घातल्या होत्या. आर्थिक नफा व पारमार्थिक कल्याण यांची ही युती धर्मवेत्यांनी जाणीवपूर्वक केली होती असे म्हणता येत नाही. परंतु ऐतिहासिक दृष्टचा ती उदचोगधंद्यांच्या वाढीला फार पोषक ठरली; आणि तिच्यामधून प्रोटेस्टंट राष्ट्रांमध्ये आर्थिक विकासाच्या प्रक्रियेला चालना मिळाली असे मॅक्स वेबर या समाजशास्त्रज्ञांनी दाखवून दिले आहे.[४]

आपल्याकडील फुले, रानडे, शिंदे इत्यादी धर्मसुधारकांनी अशाच रीतीने ऐहिक जीवनाला प्राधान्य देण्याची आवश्यकता प्रतिपादन केली आहे. परमेश्वराने जगातील सर्व वस्तु मानवाच्या सुखासाठी निर्माण केल्या आहेत. त्यांचा वापर करण्यासाठी लागणारी बुद्धीही ईश्वराने त्याला दिली आहे. म्हणून स्वपरिश्रमाने अर्थार्जन करून ऐहिक सुख मिळविण्यात काहीच गैर नाही असे फुले यांचे सांगणे होते. आर्थिक क्षेत्रातील उद्योजक नवे उद्योगधंदे काढून स्वतःचा फायदा तर मिळवितोच पण राष्ट्राची औद्योगिक प्रगतीही तो घडवून आणतो. आपण पारमार्थिक कल्याणाला अवास्तव महत्त्व देऊन ऐहिक जीवनाबद्दल अनास्था बाळगली. त्यामुळे आपली अधोगती झाली, आपले दारिद्र्य कायम राहिले, परकीयांकडून आपला पराभव झाला अशी रानडे यांनी आपल्या अपयशाची कारणमीमांसा केली आहे. आपल्या देशाची भरभराट व्हावी व जगामध्ये

त्याला मानाचे स्थान प्राप्त व्हावे अशी ज्यांना इच्छा असेल त्यांनी देशाच्या सर्वांगीण भौतिक उत्कर्षसाठी झटले पाहिजे असे मत मांडून न्या. रानडे यांनी भारतातील सुशिक्षित मध्यमवर्गियांना समाज सुधारणेची प्रेरणा दिली.

एकोणिसाव्या शतकात भांडवलशाहीची वाढ झाल्यावर युरोपीय राष्ट्रांच्या समाजजीवनातील धर्माचे महत्त्व हळुहळु कमी होत गेले. धर्माने घातलेल्या निर्बंधाचा लोकांना विसर पडला. उलट आपल्याजवळ असलेल्या साधनसामग्रीचा वापर करून अधिकाधिक नफा व सुख मिळविण्याचा प्रत्येकाला हक्क आहे. स्पर्धेच्या राज्यात अशा प्रकारच्या प्रयत्नातून समाजाचे हित आपोआप साधले जाईल अशी विचारसरणी लोकप्रिय झाली. त्यामधून भोग वादाला उत्तेजन मिळाले. महात्मा गांधींसारखे धार्मिक प्रवृत्तीचे लोक या भोगवादापासून परावृत्त झाले आणि गरजा वाढवत नेण्याऐवजी त्या कमी करण्याची त्यांनी आपल्या अनुयायांना शिकवण दिली. गांधी धर्मनिष्ठ असले तरी धर्म म्हणजे नीती अशीच त्यांची धारणा होती. नीतीचा परिपोष नेहमी समाजातच होते. सामान्य माणसांच्या किमान भौतिक गरजा भागल्याशिवाय त्यांना नैतिक प्रश्नांबद्दल आस्था वाटत नाही. म्हणून साधकाने केवळ स्वतःच्या अध्यात्मसुखात तल्लीन होऊन न राहता समाजातील सर्व लोकांना अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि स्वास्थ्य मिळवून देण्यासाठी सतत प्रयत्नशील राहिले पाहिजे अशी गांधींची भूमिका होती. गांधींनी याप्रमाणे ऐहिक जीवननिष्ठेला सामाजिक ध्येयवादाची जोड दिली.

पारंपारिक धर्म आणि विश्वधर्म

दळणवळणाच्या साधनांची वाढ झाल्यानंतर निरनिराळ्या धर्मांच्या लोकांचा परस्परांशी निकटचा संबंध येऊ लागला. वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब करून समाजशास्त्रज्ञांनी निरनिराळ्या धर्मांचा तुलनात्मक अभ्यास केला. प्रत्येक धर्माची स्थापना विशिष्ट सामाजिक परिस्थितीत झालेली होती आणि तिचे त्या धर्मात प्रतिबिंब पडले होते. प्रत्येक धर्मावर या देशकालपरिस्थितीच्या मर्यादाही पडलेल्या होत्या. निरनिराळ्या धर्मातील हे भिन्न भिन्न नियम पाहून एकाच परमेश्वराने निरनिराळ्या लोकांना असा वेगवेगळा आदेश का द्यावा असा प्रश्न लोकांच्या मनात उभा राहिला. साहजिकच धर्माबद्दल आस्था असणाऱ्या लोकांकडून ख्रिस्ती, मुसलमान, हिंदू, बौद्ध अशा सर्व धर्माच्या लोकांना मान्य होईल अशा एका विश्वधर्माचा शोध सुरु झाला. नवे एकेश्वरवादी पंथ उदयास आले; आणि त्यांनी धार्मिक जीवनात क्रांती घडवून आणली. न्या. रानडे

स्वत:ला एकेश्वरवादी म्हणवून घेत. 'एका ईश्वरवाद्याची कैफियत' या आपल्या लेखांत (A Theist Confession of faith) त्यांनी या पंथाचे तत्त्वज्ञान सविस्तर मांडले आहे. जोतीराव फुले, यांनी आपल्या धर्माला 'सार्वजनिक सत्यधर्म' असे नाव दिले आहे. प्रत्येक धर्म ईश्वरप्रणीत असल्याने त्यात सत्याचा काही ना काही अंश असलाच पाहिजे अशी या धर्मवेत्यांची श्रद्धा होती. ह्या सर्व धर्मांचे संस्थापक श्रेष्ठ पुरुष असले तरी अखेर ते माणूसच होते. त्यामुळे कोणत्याही धर्माच्या प्रमाणग्रंथात अथपासून इतीपर्यंत केवळ सत्यच आहे असे म्हणता येत नाही. प्रत्येक धर्मात त्या त्या काळांतील अनेक चालीरीतींचा समावेश झालेला आहे; आणि त्यातील बऱ्याच चाली आता कालबाह्य झालेल्या आहेत. प्रत्येक पारंपारिक धर्माचे वेगळेपण त्याच्या उपासनापद्धतीत आहे. म्हणून प्रत्येक व्यक्तीला तिला हवी असेल ती उपासना पद्धती पत्करण्याची समाजाने मुभा द्यावी. मात्र हा पारंपारिक धर्म ही प्रत्येकाची खाजगी बाब असावी. माणसामाणसांमधील व्यवहार विश्वधर्माच्या म्हणजे सर्व लोकांना मान्य होतील अशा सार्वजनिक नीतितत्त्वानुसार चालावेत असे या धर्मसुधारकांचे प्रतिपादन होते. खरा धर्म एकच आहे. निरनिराळे पारंपारिक धर्म ह्या एकाच धर्मवृक्षाच्या निरनिराळ्या शाखा आहेत असे गांधीजींनी म्हटले आहे धर्म आणि व्यवहार, पारंपारिक धर्म आणि विश्वधर्म यांच्या या फारकतीमधूनच आधुनिक धर्मनिरपेक्ष शासनाची पार्श्वभूमी तयार झाली.

नीतीचे अधिष्ठान

नीतीचा उगम परमेश्वरामध्ये आहे अशी धार्मिक लोकांची परंपरागत श्रद्धा होती. परमेश्वराचा आदेश धर्मग्रंथांतून ग्रथित झालेला आहे. आणि धर्मग्रंथांचा अर्थ लावण्याचा अधिकार पवित्र धर्मगुरुंचा आहे असे सनातन्यांचे म्हणणे होते. आधुनिक काळातील धर्मसुधारकांनी ते मान्य केले नाही. परमेश्वर चित्स्वरूप आहे हे तर खरेच. प्रत्येक माणसाच्या हृदयात या चितत्त्वाचाच अंश असतो. या चितत्त्वामुळेच माणसाचे परमेश्वराशी नाते जडते. नीती अनीती, पापपुण्य, कार्याकार्य ही द्वंद्वे त्याच्या मनात उभी राहातात. पशू आपल्या सहजप्रेरणेच्या पलीकडे जाऊ शकत नाही. मानवाच्या नीतिप्रेरणेतच त्याचे पशुहून असलेले वेगळेपण साठविलेले आहे. नीतितत्त्वे शाश्वत असतात. परिस्थिती मात्र बदलत असते. कोणत्याही परिस्थितीत शाश्वत नीतिवत्त्वांना अनुसरून नीतिअनितीचा निर्णय करण्याची शक्ती परमेश्वराने माणसाला दिलेली आहे. म्हणून केवळ धर्मग्रंथांवर अवलंबून न राहता त्या त्या परिस्थितीत नीती

कशाला म्हणावयाचे हे प्रत्येकाने स्वतः विचारपूर्वक ठरविले पाहिजे. आपल्या अंतःकरणातील परमेश्वराचा आदेश प्रमाण मानून त्याप्रमाणे आचरण करणे हीच खरी नीती होय अशी या धर्मवेत्त्यांनी धर्माची व्याख्या केली आहे. तथापि आपल्या मनातील या स्फुल्लिंगावरही अनेकदा स्वार्थाची व अंधश्रद्धांची राख जमा झालेली असते. ती पूर्णपणे झाडून टाकल्याशिवाय आपला निर्णय बरोबर असेल अशी कुणालाही ग्वाही देता येत नाही. म्हणून ज्याला नैतिक जीवन जगावयाचे असेल त्याने आपल्या वैयक्तिक स्वार्थाला पूर्णपणे तिलांजली दिली पाहिजे असे या तत्त्ववेत्यांचे सांगणे होते. बाह्यप्रामाण्यापेक्षा अंतःप्रामाण्याला अधिक महत्त्व देऊन धर्मग्रंथ आणि धर्मगुरु यांच्या जाचापासून मानवाच्या नैतिक प्रेरणेची त्यांनी मुक्तता केली.

धर्मनिष्ठ मानवतावाद

सर्वांभूती एक आत्मा ही हिंदू अध्यात्म विचारातील एक मूलभूत संकल्पना आहे. परमात्मा लहान थोर सर्व वस्तू आणि प्राणी यांना व्यापून असतो. म्हणून माणसाने सर्वांकडे समदृष्टीने पाहावे, पृथ्वीच्या पाठीवरील सर्व भूतमात्रांच्या हितासाठी सतत प्रयत्नशील राहावे अशी हिंदू साधुसंतांची शिकवण होती. येथील दर्शनकारांनी मानव योनी ही इतर योनींपेक्षा श्रेष्ठ मानली आहे. परंतु तरीही भारतीय तत्त्वज्ञानात माणसाच्या इतर पशूहून असलेल्या वेगळेपणावर भर देण्यात आलेला नाही. विज्ञानाचा विकास झाल्यावर पाश्चात्य राष्ट्रात जी प्रगती घडून आली त्यामधून मानवाच्या कर्तुत्त्वशक्तीला एक नवे परिमाण लाभले. सामाजिक क्षेत्रात जी नवी इहवादी तत्त्वज्ञाने पुढे आली त्यांनी मानव हाच आपल्या विचारांना प्रारंभबिंदू मानला. या नव्या सामाजिक विचारांना ख्रिस्ती धर्मातील मानवतावादाची पार्श्वभूमी होती.ख्रिस्ती धर्माने आत्मा हा फक्त मानवी स्त्रीपुरुषांनाच असतो असे मानले आहे. परमेश्वराने मानवाच्या रूपाने आपली प्रतिकृतीच निर्माण केली आहे. पाप, पुण्य, नीतीअनीती यांमध्ये निवड करण्याची नैतिक प्रेरणा त्याने मानवाला दिली आहे. ही नैतिक प्रेरणा सर्व माणसांमध्ये असल्याने तत्त्वतः सर्व स्त्रीपुरुष समान आहेत असा ख्रिस्ती धर्ममताचा आशय होता.

आधुनिक काळातील धर्मवेत्यांनी या मूलभूत सिद्धांताचा नव्या परिस्थितीच्या संदर्भात पुनरुच्चार केला. मानवाला परमेश्वराने जी जन्मसिद्ध प्रतिष्ठा दिलेली आहे तिची जपणूक करणे हे त्याचे व इतरांचे कर्तव्य आहे. माणसाने कोणाही दुसऱ्या माणसापुढे लाचारी पत्करू नये. सर्व माणसे एकाच

'परमेश्वराची लेकरे असल्यामुळे सर्वांना सारखेच अधिकार असले पाहिजेत. माणसामाणसांमधील भेदाभेद नष्ट झाले पाहिजेत अशी त्यांनी भूमिका घेतली. भारतातील आधुनिक काळातील धर्मसुधारकांनीही अशीच भूमिका घेतली आहे. "आपल्या सर्वांच्या निर्माणकर्त्याने एकंदर प्राणिमात्रांस उत्पन्न केले. त्यापैकी स्त्रीपुरुष हे उभयतः जन्मतःच स्वतंत्र व एकंदर सर्व अधिकारांचा उपभोग घेण्यास पात्र केले आहेत"[३] हे फुले यांच्या लिखाणातील पालुपद आहे.महात्मा गांधींचा मानवतावादही मानवाचे पशूहून असलेले वेगळेपण व सर्व मानवांची समानता या दोन पायाभूत सकल्पनांवर उभा आहे.

हिंदू धर्माने जातिव्यवस्था ही निसर्गरचनेइतकीच ईश्वरदत्त व स्वयंसिद्ध मानली आहे. ती अपरिवर्तनीय व अंतीम दृष्टंचा लोकहितास पोषक आहे. अशीच येथील सर्व विचारवंतांची धारणा होती. प्रत्येक आत्मा कोणत्या योनीत जन्मास येणार आणि त्याच्या वाटचाला कोणती सुखदुःखे येणार हे त्याच्या पूर्वकर्माने ठरत असल्याने ही व्यवस्था सामाजिक नीतिमत्ता व न्याय यांच्याशी सुसंगत आहे असे तिचे समर्थन करण्यात येत होते. त्यामुळे प्रत्यक्षात विषमता व अधिकारभेद यांवर आधारलेल्या या समाजव्यवस्थेविरूद्ध येथे कधी बंडे झाली नाहीत.

ख्रिस्ती धर्मात प्रारंभापासूनच पृथ्वीवरील प्रचलित राज्यांहून वेगळ्या अशा एका परमेश्वराच्या राज्याची संकल्पना होती. सुरवातीच्या काळात या संकल्पनेचा आशय गूढ व आध्यात्मिक होता. आधुनिक काळातील धर्मचिंतकांनी तिच्यामध्ये ऐहिक आशय ओतला. परमेश्वराचे राज्य म्हणजे न्याय व नीती यांवर आधारलेले राज्य होय. असे राज्य निर्माण करणे हेच धार्मिक जीवनाचे अंतीम उद्दिष्ट असले पाहिजे. परमेश्वरी इच्छेने मानवी जीवनाचा प्रवाह त्याच दिशेने वाहात चालला आहे. मानव हे परमेश्वराच्या हातचे केवळ एक साधन आहे. परमेश्वराची इच्छा प्रमाण मानून त्याचे राज्य पृथ्वीतलावर आणण्यासाठी सतत प्रयत्नशील राहाणे हीच खरी धर्मसाधना होय असा ज्युरिटन धर्मवेत्त्यांनी या संकल्पनेचा अर्थ लावला. सोळाव्या शतकानंतर युरोपात ज्या अनेक सामाजिक सुधारणा घडून आल्या त्यांना या नव्या धर्मपंथांची प्रेरणा कारणीभूत ठरली. गुलामगिरीला, पुरोहितशाहीला, राजेशाहीला विरोध करण्यात या नव्या धर्मपंथांच्या अनुयायांनी पुढाकार घेतला. त्यांच्या प्रभावामुळे एकोणिसाव्या शतकातील. भारतातील धर्मसुधारकांनीही धार्मिक व सामाजिक सुधारणांचा सतत समन्वय साधला आहे.

महात्मा गांधी यांच्यावरही या प्युरिटन धर्ममताचे संस्कार झालेले होते.

हिंदू धर्माने अशिवाचा उगम मानवाच्या नैसर्गिक प्रवृत्तींमध्ये आहे असे मानले होते. आपल्या मनातील या अशिवाशी, पापप्रवृत्तीशी झगडा करून त्यांच्यावर मात केल्याखेरीज कोणालाही परमेश्वराचा साक्षात्कार होऊ शकत नाही असा मध्ययुगीन संतांच्या शिकवणुकीचा इत्यर्थ होता. परंतु मानव अपूर्ण असल्याने त्याने निर्माण केलेल्या सामाजिक संस्था, धार्मिक चालीरीती, शासकीय कायदे हे अन्यायाधिष्ठित म्हणजे अशिव असू शकतात हे गांधीजींनीच प्रथम निस्संदिग्धपणे सांगितले. परमेश्वर नीतिमय असल्याने समाजातील अन्यायाशी व अनीतीशी झगडा करून तेथे नीतीची स्थापना करणे हेच ईश्वरोपासकाचे प्रथम कर्तव्य आहे. मात्र अन्यायाविरूद्ध करावयाच्या या झगड्याची साधनेही माणसाच्या प्रतिष्ठेला साजेशीच असली पाहिजेत. हिंसा हा पशुसृष्टीचा नियम आहे. पण हिंसेमधून नेहमी हिंसेचाच उद्‌भव होतो. आणि त्यात माणुसकीचा बळी जातो. तथापि, प्रत्येक माणसाच्या हृदयात नीतीचा एक स्फुल्लिंग असतो. म्हणून पाशवी बळाच्या जोरावर प्रतिपक्षाला नामोहरम करण्यापेक्षा आत्मक्लेशामधून त्याचे हृदय-परिवर्तन करणे आणि अन्याय नाहीसा करण्यास त्याला प्रवृत्त करणे हा अहिंसेचा मार्गच सर्वश्रेष्ठ होय अशी गांधींची विचारसरणी होती. तिला अनुसरून सत्याग्रहाचे नवे तंत्र त्यांनी लोकांच्या हवाली केले.

धर्म आणि इहवाद

जीवनाकडे पाहाण्याचा एक समग्र दृष्टिकोन हे धर्माने मानवी संस्कृतीला दिलेले योगदान होय. मात्र धर्माचा पाया श्रद्धा हाच आहे. ईश्वर, धर्मसंस्थापक आणि धर्मग्रंथ यांच्यावरील अविचल श्रद्धा हेच धार्मिक माणसाचे मुख्य लक्षण मानण्यात येत होते. उलट विज्ञानाचे अधिष्ठान बुद्धी हेच आहे. मानवी बुद्धीच्या साऱ्या मर्यादा मान्य केल्या तरी इंद्रियानुभव आणि बुद्धी यांच्याखेरीज मानवाजवळ ज्ञानसंपादनाचे दुसरे विश्वसनीय साधन नाही असे शास्त्रज्ञांचे म्हणणे होते. ईश्वर आणि आत्मा यांचे अस्तित्त्व विज्ञानाने सिद्ध करता येत नाही म्हणून इहवादी त्यांवर श्रद्धा ठेवीत नाहीत. ईश्वर आणि आत्मा अस्तित्त्वातच नाहीत असेही बुद्धीने सिद्ध करता येत नाही असा काही लोकांचा युक्तिवाद असतो. परंतु जे अभ्युपगम पुराव्याच्या आधारे सिद्ध करता येतात त्यांनाच विज्ञानात सिद्धांत म्हणून स्थान मिळते. जे सिद्ध झालेले नाहीत अथवा सिद्ध करताही येणार नाहीत अशा इंद्रियानुभवाच्या पलीकडे असणाऱ्या अभ्युपगमांची विज्ञानात गणना करता येत नाही. या अर्थाने विज्ञान आणि धर्म हे परस्परांहून मूलतःच भिन्न आहेत. मात्र विज्ञानातून नीतिमूल्यांची उत्पत्ती होऊ शकत नाही.

सृष्टीविज्ञान काय किंवा समाजविज्ञान काय केवळ अस्तित्वात असलेल्या गोष्टींची नोंद करते. समाजाच्या दृष्टीने कोणती गोष्ट हितावह आहे ते केवळ विज्ञानातून समजू शकत नाही. त्यासाठी विज्ञानाला नीतिमूल्यांची जोड द्यावी लागते. नीतिमूल्यांचा विकास हा सामाजिक व्यवहाराशी निगडीत असतो. विज्ञानपूर्व काळात जगातील सर्व देशांमधील लोकांवर धर्माचा प्रभाव होता. म्हणून त्या त्या समाजातील नीतिविचार तेथील लोकांच्या विशिष्ट धर्मातून प्रगट झाला. धर्मातील अंधश्रद्धा आणि कर्मकांड यांना इहवाद्यांचा विरोध असला तरी शेकडो वर्षांच्या मानवी इतिहासातून संपन्न झालेल्या नीतिमूल्यांकडे त्यांनी पाठ फिरविलेली नाही. या नीतिमूल्यांना आधुनिक समाजविज्ञानाची जोड देण्याच्या खटपटीतून आधुनिक इहवादी सामाजिक तत्त्वज्ञानांचा जन्म झाला. समाजवाद हे या इहवादाचेच सर्वांत परिणत असे स्वरूप आहे.

सृष्टी आणि मानव

धर्माप्रमाणे समाजवादानेही सृष्टी, मानव आणि समाज यांच्यातील परस्परसंबंधांचा खोलवर विचार केलेला आहे. निरनिराळ्या धर्मांतील यासंबंधींच्या प्रगत कल्पना त्यांनी आत्मसात केल्या. पण ते तेवढ्यावर थांबले नाहीत. वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब करून त्यांनी सामाजिक जीवनाची चिकित्सा केली आणि परिवर्तनाची दिशाही दाखवून दिली. विज्ञानाने माणसाला निसर्गनियमांचे ज्ञान करून दिले. पण माणसाने सृष्टीतील पदार्थांशी, पशुपक्ष्यांशी कसे वागावे या प्रश्नाला विज्ञानापाशी उत्तर नव्हते. मानव आणि सृष्टी यांच्यातील ऐक्यावर भर हे हिंदू धर्माचे एक वैशिष्ट्य आहे. ऋषींच्या आश्रमात सर्व पशुपक्षी आपापसात समझोत्याने व सहकार्याने राहात. सर्व संगपरित्याग केलेल्या मुनींच्या संरक्षणासाठी साप फणा उभारी, पशु एकांतात त्यांना सोबत करीत तो महामानवही सर्वभूतहित हेच आपले कर्तव्य मानी अशा आशयाच्या कथा भारतीय साहित्यात वारंवार आढळतात. याचाच आविष्कार तत्त्वज्ञानामधील सर्वांभूती एक आत्मा या संकल्पनेत झालेला आहे. मात्र याचा दुसरा परिणाम असा झाला की निसर्गाशी सुसंवाद साधण्यावरच सर्व लक्ष केंद्रित केल्याने त्याचे नियम शोधून काढण्यासाठी, त्याच्यातील साधन सामग्रीचा वापर करून लोकांचे जीवन सपन्न करण्यासाठी आपण धडपडलो नाही. त्यामुळे आपले दारिद्र्य कायमच राहिले. मानवाच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणणाऱ्या वृक्षपूजा, नागपूजा, गोपूजा या परंपरा आपल्याकडे आजतागायत चालू राहिल्या आहेत.

याउलट आत्मा फक्त माणसालाच असतो. ही सृष्टी परमेश्वराने

माणसाच्या सुखासाठी निर्माण केली आहे असे ख्रिस्ती धर्माचे म्हणणे आहे. विज्ञानाचा उदय झाल्यावर बायबलमधील या वचनांच्या आधारे पंचमहाभूतांना स्वतःच्या सुखासाठी राबविण्याचा माणसाने हव्यास धरला. वैज्ञानिक ज्ञानाच्या प्रकाशात नैसर्गिक साधनसामग्रीचा वापर करून त्याने शेकडो वस्तू निर्माण केल्या. शेती, उद्योगधंदे, ऊर्जा, दळणवळणाची साधने यांमध्ये त्यांनी प्रगती घडवून आणली. त्यामधून सर्वसामान्य माणसाचे दारिद्र्य नष्ट करता येईल अशी शक्यता जगाच्या इतिहासात प्रथमच निर्माण झाली.

औद्योगिक क्रांतिनंतर पाश्चात्य राष्ट्रांमध्ये निसर्गावर प्रभुत्त्व मिळविण्याची ही ईर्षा बळावतच गेली. जगातील अप्रगत राष्ट्रेही आता त्यांचा कित्ता गिरवू लागली आहेत. इतकेच नव्हे तर साम्यवादी राष्ट्रांनीही औद्योगिक विकासाची त्यांचीच कल्पना उचलून धरली आहे. या प्रवृत्तीचे दुष्परिणाम आता लोकांच्या अनुभवास येऊ लागले आहेत. लाकडाच्या व्यापारासाठी बेसुमार जंगलतोड करण्यात आल्याने जमिनीची धूप झाली, पुरांचे थैमान सुरू झाले आणि जगातील काही देशांतं जंगलांची जागा वाळवंटांनी घेतली. रासायनिक उद्योगांनी विषारी वायू व द्रव्ये हवेत आणि पाण्यात सोडून नद्यांचे पाणी पिण्यासाठी अपात्र करून टाकले. वायुगळतीने शेकडो माणसांचे जीवन धोक्यात आले. तेव्हा निसर्गातील साधनसामग्रीची उधळपट्टी थांबविण्याची आणि पर्यावरणातील समतोल कायम राखण्याची आवश्यकता जगातील विचारवंतांच्या ध्यानात आली. मानवाच्या सुखासाठी निसर्गाचा वापर करताना त्याचा विनाश होऊ नये याचीही आपण काळजी घेतली पाहिजे याची अनेकांना जाणीव होऊ लागली निसर्गाला गुलाम बनविण्याची हाव बाळगण्याऐवजी त्याच्याशी सुसंवाद साधण्यावर भर देणारे 'हरित' गट आता परदेशांत ठिकठिकाणी संघठित होऊ लागले आहेत. मात्र आर्थिक विकास म्हणजे हरेक कुटुंबाने अधिकाधिक वस्तूंचा संग्रह करणे आणि त्या निर्माण करण्यासाठी उद्योगधंद्यांनी नव्या नव्या भांडवलप्रधान तंत्राचा वापर करणे होय ही कल्पना जोपर्यंत बदलत नाही तोपर्यंत चळवळीही यशस्वी होण्याची शक्यता नाही. पर्यावरणाचा प्रश्नही मानवी जीवनाचे परमसाध्य, आर्थिक विकासाचे स्वरूप, समाजातील निरनिराळ्या गटांचे परस्परसंबंध या सर्वांशी निगडीत आहे म्हणून निसर्गाशी सुसंवाद साधू पाहाणाऱ्यांनाही केवळ पारंपारिक धर्मावर अवलंबून न राहता सृष्टी मानव व समाज यांच्या परस्परसंबंधाचा इहवादी दृष्टिकोनातून साकल्याने विचार करावा लागत आहे.

मानवाचे इप्सित

इहवाद अथवा भौतिकवाद हा भोगवादच आहे अशी पुष्कळांची समजूत आहे. ज्या समाजात देह आणि आत्मा हे पूर्णपणे वेगळे मानण्यात आलेले आहेत तिथे आत्मानंदाऐवजी ऐहिक सुखावर भर देणारे तत्त्वविचार भोगवादी समजले जावेत हे स्वाभाविक आहे. परंतु खुद्द चार्वाकही भोगवादी नव्हते. इहवादी तत्त्वज्ञ, शरीरातून पूर्णपणे अलिप्त अशा वेगळ्या आत्माचे अस्तित्त्व नाकारतात. परंतु मानवाची बुद्धी आणि मन म्हणजेच त्याची चैतन्यशक्ती हिचे महत्त्व ते कमी लेखीत नाहीत. उलट मानवाचे शरीर, मन आणि बुद्धी यांच्या संपूर्ण विकासातच त्याचे सुख आहे अशी त्यांची धारणा आहे. प्रत्येक माणसाला स्वतःचा सर्वांगीण विकास करून घेण्याची संधी मिळेल अशी परिस्थिती निर्माण करणे हे समाजवादी चळवळीचे उद्दिष्ट आहे.

धर्माने वैराग्याचे अवास्तव स्तोम माजवून माणसाच्या नैसर्गिक प्रेरणांची गळचेपी केली होती. साहजिकच समाजविज्ञानाच्या उदयकाली जी इहवादी विचारसरणी पुढे आली तिने व्यक्तीची सहजप्रेरणा ही मुळातच पवित्र आहे, प्रत्येक व्यक्तीला दुसऱ्याच्या हक्कांवर आक्रमण न करता अधिकाधिक सुख मिळविण्याचा अधिकार आहे आणि अधिकाधिक व्यक्तींचे अधिकाधिक सुख हेच समाजजीवनाचे प्रयोजन आहे किंवा असले पाहिजे असे निस्संदिग्धपणे प्रतिपादन केले. कायदेपद्धतीत जरूर ते बदल केल्यास प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या सुखाचा पाठपुरावा करण्यासाठी आवश्यक असे संरक्षण देता येईल असे बेंथम यांना वाटत होते. खाजगी मालकी आणि स्पर्धा यांवर आधारलेल्या समाजव्यवस्थेत, प्रत्येक माणसाने जरी स्वतःच्या फायद्याची काळजी वाहिली तरी त्यामधून आपोआप समाजाचे हितच घडून येईल असा ॲडॅम स्मिथ यांचा सिद्धांत होता.

पुढे मोठ्या उद्योगधंद्यांचा विकास झाल्यावर काही लोकांची प्रवृत्ती इतरांच्या दैन्याला, दारिद्र्याला व बेकारीला कारणीभूत होते असाच प्रत्यय आला. व्यक्तींच्या सुखदुःखांचे समीकरण मांडणाऱ्या या उपयुक्ततावादाची मार्क्स यांनी दुकानदारांचे तत्त्वज्ञान अशी संभावना केली आहे. व्यक्तीच्या सुखापेक्षा तिची प्रतिष्ठा आणि विकास यांना समाजवाद्यांनी अधिक महत्त्व दिले आहे. कोणत्याही व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीला आपल्या सुखाचे केवळ एक साधन बनविणे हे शोषण आहे असेच त्यांचे मत होते. स्पर्धा आणि करार यांऐवजी सहकार्य व बंधुभाव या तत्त्वांवर सामाजिक संस्थांची पुनर्रचना करण्यासाठी त्यांनी चळवळी उभारल्या. श्रमिकांच्या साह्याने राज्यसत्ता काबीज करून

उत्पादनसाधनांचे समाजिकीकरण करण्याचा मार्ग त्यांनी अवलंबिला.

कोणताही समाज केवळ कायद्यावर व दंड शक्तीवर फार काळ विसंबून राहू शकत नाही. समाजातील बहुसंख्य लोक स्वखुषीने किंवा भीतीने कायदे पाळतात म्हणून समाजजीवन निर्वेधपणे चालू राहते. मात्र भीती असेल तेथे विकासाला पायबंद असतो. समाजजीवन सुरळीतपणे चालू राहाण्यासाठी आवश्यक असणारी शिस्त प्रत्येक माणसाच्या अंगी बाणविण्यासाठी जाणूनबूजून प्रयत्न करावे लागतात. माणूस स्वयंशिस्तीने जेथे समाजाभिमुख राहील, माणसामाणसांमधील संबंध जेथे स्वयंस्फूर्त सहकार्यावर आधारित राहातील, जेथे कोणत्याही दंडशक्तीची आवश्यकता राहाणार नाही असा शासनमुक्त समाज निर्माण करण्याचे ध्येय एकोणिसाव्या शतकातील अराज्यवादी आणि समाजवादी यांनी आपणासमोर ठेवले होते. महात्मा गांधींच्या विचारांवरही त्याचा प्रभाव पडला होता. मार्क्स यांच्या शासन नामशेष होणे (withering away of the state) या संकल्पनेचाही हाच अर्थ होता. माणूस जेथे, स्वखुषीने समाजासाठी स्वार्थाला मुरड घालील, जेथे व्यवस्थापन केवळ वस्तूंचे असेल, माणसावर नियंत्रण ठेवण्याची जेथे गरज राहाणार नाही असा शोषणमुक्त व शासनमुक्त समाज उभा करण्याची त्यांची मनीषा होती. गेल्या तीनशे वर्षांत विज्ञान आणि तंत्रविद्या यांमध्ये झालेल्या प्रगतीमुळे सर्व माणसांच्या किमान गरजा भागविता येण्याइतकी आवश्यक वस्तूंची मुबलकता निर्माण करता येईल, केवळ जिवंत राहाण्यासाठी पशूंच्या पातळीवर माणसांना करावा लागणारा झगडा संपुष्टात येईल आणि माणसांच्या बौद्धिक व मानसिक शक्तींच्या विकासाला भरपूर वाव देणारी परिस्थिती घडवून आणता येईल असा त्यांना विश्वास होता. मानवाच्या मनात स्वार्थ व परहितबुद्धी, भ्याडपणा आणि निर्भयता, लाचारी आणि स्वाभिमान या द्वंद्वांचा सतत झगडा चालू असतो. या झगड्यात स्वतःच्या मनातील क्षुद्र प्रवृत्तींवर, स्वार्थावर मात करण्याची धर्माने माणसाला प्रेरणा दिली. तमाकडून ज्योतिकडे, असत्याकडून सत्याकडे धाव घेण्याची एक सहजप्रवृत्ती माणसामध्ये आहे. तिला आवाहन केल्यास त्याचा स्वतःचा विकास होईल आणि समाजालाही स्थैर्य प्राप्त होईल असा प्रगत धर्माचा अभिप्राय होता. माणसाच्या मनातील या प्रवृत्तीचा उगम त्यांनी विश्वचैतन्यामध्ये मानला. समाजवादी जडाहून पूर्णपणे अलग अशा अमूर्त चैतन्यशक्तीचे अस्तित्त्व मानीत नाहीत. परंतु धर्माप्रमाणे त्यांची आदर्श समाजाची संकल्पनाही माणसाच्या सत्प्रवृत्तीवरील श्रद्धेवरच आधारलेली आहे.

सामाजिक समता आणि न्याय

हिंदू, ज्यू, पारशी हे प्राचीन धर्म एकेका विशिष्ट समाजाशी निगडीत होते. कोणत्याही विशिष्ट समाजाच्या चौकटीत न अडकता मानवांना नीतीची शिकवण देणारा पहिला धर्म बौद्ध धर्म हा होय, माणसाने आपले विचार, भावना, व्यवहार, उपजीविका यांचे कशा प्रकारे नियंत्रण करावे याचे सम्यग दिग्दर्शन गौतम बुद्धांनी अष्टांगमार्गाच्या द्वारा केले. पुढे येशू ख्रिस्ताने सर्व माणसे परमेश्वराची लेकरे असल्यामुळे ती समान आहेत असे निःशंपणे प्रतिपादन केले. मात्र प्रत्यक्षात विषमता, पिळवणूक वंशभेद, गुलामगिरी यांच्याशी या धर्मांनी तडजोडच केली. अमेरिकेतील ख्रिस्ती चर्चमध्येही काळा व गोरा हे भेद कायम राहिले. इस्लामचा भर सर्व मुसलमानांची समानता व ऐक्य यांवर होता. पण मुस्लीमेतर काफिरांना समानतेने वागविण्याची मुसलमानांची तयारी नव्हती. हिंदू धर्माने परमात्मा सर्व वस्तू व प्राणी यांच्यामध्ये वास करतो असे जाहीर केले होते. पण मानवाच्या पशुहून असलेल्या वेगळेपणाची त्याने पुरेशी दखल घेतली नाही. म्हणून गाय पवित्र व वंदनीय ठरविण्यात आली आणि अस्पृश्याचा विटाळ होऊ लागला. गोमूत्राने शुद्धी होते ही कल्पनाही रूढ झाली. सर्व मानवांची समानता व ऐक्य यांच्याशी पाश्चात्य संस्कृतीच्या द्वाराच आपला प्रथम परिचय झाला. महात्मा फुले यांनी जगातील सर्व स्त्रीपुरुषांच्या समानतेच्या तत्त्वाचा प्रथम उघडपणे पुरस्कार केला. महात्मा गांधींच्या नेतृत्त्वाखाली राष्ट्रसभेनेही या तत्त्वाला मंजूरी दिली. दलित व मागासलेल्या जातींच्या चळवळीमधून तिचे लोण समाजातील खालच्या थरांतील लोकांपर्यंत जाऊन पोहोचले. आधुनिक काळातील इहवादी विचारसरणीलाही या मानवतावादाचेच अधिष्ठान आहे. जगातील काळे, गोरे, पिवळे अशा सर्व वंशाचे, युरोप, आशिया, आफ्रिका इत्यादी सर्व खंडांत राहाणारे सर्व धर्मांचे व जातींचे स्त्रीपुरुष समान आहेत, त्यांच्यातील विषमता ईश्वरनिर्मित नसून मानवनिर्मित आहे असा इहवाद्यांचा दावा आहे. माणसामाणसांमधील भेदभाव, विषमता, शोषण आणि सामाजिक अन्याय नाहीसा करून त्यांच्यातील सहकार्य व बंधुभाव वृद्धींगत करणारी समाजव्यवस्था उभारणे हेच समाजवाद्यांचे उद्धिष्ट आहे.

जगातील सर्वच धर्म विज्ञानपूर्वकाळात उदयास आले. त्यामुळे त्यांच्यामध्ये समाजव्यवस्थेचा सांगोपांग विचार झालेला आढळून येत नाही. म्हणून प्रत्येक माणसाला नीतिनिष्ठ बनण्याची शिकवण दिली म्हणजे न्यायावर व नीतीवर आधारलेला समाज आपोआप अस्तित्त्वात येईल असे त्यांनी गृहीत धरले. पुढे

समाजशास्त्रांचा विकास झाल्यावर निरनिराळ्या देशातील समाजव्यवस्थांचे वस्तुनिष्ठ दृष्टीने विश्लेषण होऊ लागले. समाजाच्या स्थितीला व गतीला पोषक आणि विघातक प्रवृत्ती कोणत्या याचा विचार सुरू झाला. माणसाच्या मनातील अहंकार आणि स्वार्थ यांच्याप्रमाणे समाजव्यवस्थेची बांधणीही अन्यायाला व अनीतीला कारणीभूत असते याची समाजशास्त्रज्ञांना नीट जाणीव झाली तेव्हा समाजव्यवस्थेची उद्दिष्टे कोणती असावीत ती प्रत्यक्षात उतरविण्यासाठी प्रचलित समाज संस्थांमध्ये कोणते फेरफार करणे आवश्यक आहे? समाजातील कोणत्या शक्ती परिवर्तनास पूरक व कोणत्या बाधक आहेत याचा परिवर्तनवादी विचारवंतांनीही अभ्यास केला. त्यामधून शास्त्रीय समाजवादाची बैठक तयार झाली. मार्क्स यांनी त्यांच्या लिखाणात धर्मातून विकास पावलेल्या आदर्श समाजाच्या संकल्पना, जर्मनीतील चैतन्यवादी विचारवंतांचा ऐतिहासिक दृष्टिकोण आणि इग्लंडमधील अर्थशास्त्राची मूलतत्त्वे यांचा समन्वय साधला आहे.

इहवाद हा धर्मविरोधी नाही. धर्मातील अंधश्रद्धा व कर्मकांड यांचा उपयोग सामान्य लोकांची फसवणूक करण्यासाठी केला जातो. या अंधश्रद्धेचे निर्मूलन करणे हे ते आपले कर्तव्य मानतात. पण ऐतिहासिक दृष्ट्या मानवी मूल्यांचा विकास घडवून आणण्याचे जे महत्त्वाचे कार्य धर्माने केलेले आहे त्याचे महत्त्व ते नाकारीत नाहीत. मार्क्स यांनी आपल्या लिखाणात धर्माला अफूची गोळी म्हटले आहे याचा वारंवार उल्लेख केला जातो. शोषितांनी आपल्यावर होत असलेल्या अन्यायाविरूद्ध बंड करू नये म्हणून भांडवलदार वर्ग किंवा त्याचे पाठीराखे पक्ष जेव्हा लोकांच्या धर्मश्रद्धेला उत्तेजन देतात तेव्हा धर्माचा अफूच्या गोळीसारखाच उपयोग होतो. पण धर्माने दुःखितांना दिलासा दिला, त्यांचे अश्रु पुसले हे ही खरे आहे. ज्यांची परमेश्वरावर मनोमन श्रद्धा असेल त्यांना ती श्रद्धा बाळगण्याचा, परमेश्वराची पूजाअर्चा करण्याचा हक्क आहे. इहवादी त्यांचा हा हक्क हिरावून घेऊ इच्छित नाहीत. मात्र धर्म ही यापुढे प्रत्येकाची खाजगी बाब राहावी, सामाजिक व्यवहारात धर्माची लुडबूड असू नये, समाजातील विषमतेचे व अन्यायाचे धर्माच्या नावावर समर्थन करण्यात येऊ नये इतकेच त्यांचे म्हणणे आहे. धर्माचे क्षेत्र ईश्वर-भक्त संबंधांपुरते मर्यादित ठेवले आपल्या मर्जीनुसार उपासना करण्याचा प्रत्येकाचा अधिकार मान्य केला तर निरनिराळ्या धर्माची माणसे एका कुटुंबातही सुखाने राहू शकतील, बाप हिंदू, आई ख्रिस्ती, मुलगा मुसलमान अशा कुटुंबाची कल्पना फुले यांनी मांडली आहे. गांधींच्या आश्रमात

निरनिराळ्या धर्मांचे लोक कौटुंबिक जिव्हाळ्याने एकत्र राहात. अनेकधर्मीय कुटुंबाचे फुले यांचे स्वप्न सद्यपरिस्थितीत अव्यवहार्य असले तरी निरनिराळ्या धर्मांचे लोक एकाच राष्ट्रात साहचार्याने व बंधुभावाने राहाणे मुळीच अवघड नाही. पारंपारिक धर्मांचे क्षेत्र मर्यादित राखले तर ते सहज शक्य आहे. आजच्या काळाचीही तीच गरज आहे.



संदर्भ

१) लोकहितवादीकृत निबंधसंग्रह–पृ १६०-१६१. प्रथमांश. सं. अ. का. प्रियोळकर-पोप्युलर प्रकाशन मुंबई १९६७.

२) ज्योतिराव फुले-समग्र वाङमय पृ.३७४

३) किता. पृ. ३७५

४) वेबर मॅक्स–दी प्रोटेस्टंट एथिक अँड दि स्पिरिट ऑफ कॅपिटेलिझम.

धर्मनिरपेक्ष शासन-काही प्रश्न

धर्मनिरपेक्ष शासन हे आधुनिक लोकशाही राज्यपद्धतीचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. सोळाव्या शतकानंतर युरोपात लोकशाही विचारसरणीचा जो विकास झाला, त्यामधून धर्मनिरपेक्ष शासनाची कल्पना उदय पावली. पाश्चात्य विद्येच्या प्रभावामुळे आपल्या देशातील राजकीय नेत्यांनी लोकशाहीचे एक मूलभूत अंग म्हणून तिचा स्वीकार केला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर धर्मनिरपेक्ष शासनाच्या तत्त्वावर भारतीय संविधानाची निर्मिती करण्यात आली. सर्व धर्माच्या नागरिकांना धार्मिक विचार, आचार आणि उपासना यांचे पूर्ण स्वातंत्र्य, धर्म आणि लौकिक व्यवहार यांची फारकत, सामाजिक व्यवहारांवर शासनाचे नियंत्रण आणि सर्व धर्माच्या लोकांना समान राजकीय व सामाजिक हक्क ही धर्मनिरपेक्ष लोकशाहीची महत्त्वाची लक्षणे मानली जातात. मात्र धर्मनिरपेक्षतेचे हे धोरण प्रत्यक्ष व्यवहारात यशस्वी व्हावयाचे असेल तर लोकांचे परस्परांमधील व्यवहारही धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वावरच आधारलेले असावे लागतात. परंतु आपल्या देशांतील परंपरागत सामाजिक व्यवहाराला धर्माचे अधिष्ठान होते. बहुसंख्य लोकांची मने धर्माच्या विळख्यातून अद्याप बाहेर पडलेली नाहीत. त्यमळे धर्मनिरपेक्ष शासनावर आधारलेली राज्यघटना आणि प्रत्यक्ष सामाजिक व शासकीय व्यवहार यांमध्ये काही प्रमाणात विसंवाद निर्माण होणे स्वाभाविक आहे. या विसंवादातून अनेक प्रश्न निर्माण होतात. त्यापैकी काही निवडक प्रश्नांचा येथे थोडक्यात परामर्श घेतलेला आहे.

मध्ययुगीन शासन

मध्ययुगात भारतातील निरनिराळ्या प्रदेशांवर कुठे हिंदू तर कुठे मुसलमान राजे राज्य करीत होते. त्यांची आपापल्या धर्मांवर श्रद्धा असली तरी त्यांचे शासन धार्मिक नव्हते. राज्याच्या धर्मानुसार त्या त्या प्रदेशांत त्या धर्मांच्या लोकांना शासकीय नोकऱ्यांत काही प्रमाणात अग्रक्रम मिळत असेल. पण आपले राज्य टिकवून धरावयाचे असेल तर प्रजाजनांना दुखवून चालणार नाही, त्यांच्या धर्मात हस्तक्षेप करणे शहाणपणाचे ठरणार नाही याची बहुसंख्य राजांना जाणीव होती. म्हणून आपला धर्म इतरांवर लादण्याचा त्यांनी प्रयत्न केला नाही. प्रत्येकाला आपल्या धर्माप्रमाणे उपासना आणि आचरण करण्याचे त्यांनी स्वातंत्र्य दिले. इतकेच नव्हे तर निरनिराळ्या धर्माच्या देवस्थानांना त्यांनी इनामेही दिली. तत्कालीन सामाजिक जीवनावर धर्माची अप्रतिहत सत्ता होती. प्रत्येक धर्मातील लोकांच्या परंपरागत चालीरीतींचे संरक्षण करणे हे राजाचे कर्तव्य मानले जाई. या चालीरीतीत बदल घडवून आणण्याचा राजे लोकांनी प्रयत्न केला नाही. मात्र धर्माच्या बाबतीत येथील हिंदू व मुसलमान अशा दोन्ही राजांनी जी सहिष्णुतेची वृत्ती स्वीकारली तिच्यामधून धर्मनिरपेक्ष शासनाची पार्श्वभूमी येथे तयार झाली.

युरोपमधील रोम येथील कॅथॉलिक व कॉन्स्टन्टिनोपोल येथील ग्रीक ऑर्थडॉक्स ही दोन्ही धर्मपीठे स्वायत्त व संघटित होती. शिवाय निरनिराळ्या देशांतील शासनावरही त्यांची अधिसत्ता होती. विज्ञानाचा उदय झाल्यावर बायबलमधील सृष्टीविषयक विधानांची असत्यता लोकांच्या निदर्शनास आली आणि धर्मग्रंथावरील त्यांच्या श्रद्धेला धक्का बसला. पुढे प्रॉटेस्टंट धर्मपंथांची स्थापना झाल्यावर त्याच्या प्रणेत्यांनी पोपच्या सत्तेला विरोध करून प्रत्येक माणसाला स्वतःच्या विवेकबुद्धीला अनुसरून धर्मशास्त्रांचा अर्थ लावण्याचा अधिकार आहे असे प्रतिपादन केले. वाहतुकीच्या नव्या मार्गांचा शोध लागल्यामुळे पश्चिम युरोपातील काही देशातून व्यापाऱ्यांचा नवा वर्ग उदयास आला; आणि सरंजामदारांशी झगडा करून त्यांनी राज्यसत्तेवर आपला ताबा मिळविला. आपापल्या देशातील धर्मपीठांना प्रॉटेस्टंट धर्ममताच्या आधारे रोम येथील प्रमुख धर्मपीठांपासून वेगळे होण्यास राजांनी प्रोत्साहन दिले. पुढे प्रॉटेस्टंट धर्ममतामधूनही जे बंडखोर धर्मपंथ पुढे आले त्यांची आपापल्या राष्ट्रांतील प्रस्थापित धर्ममीठांचे निर्णय मानण्याचीही तयारी नव्हती. त्यांच्या विरोधामुळे धर्मसत्ता आणि शासनसंस्था यांचे परस्परसंबंध आणि अधिकार यांच्याबद्दल एक विचारमंथन युरोपातील देशांत सुरू झाले आणि त्यामधून या दोघींची कार्यक्षेत्रे

हळुहळू निश्चित झाली.

भारतातील हिंदू व मुस्लीम अशा दोन्ही धर्मांमध्ये संघटित धर्मपीठांचा अभावच होता. बहुतेक धर्मगुरू चरितार्थासाठी राजाश्रयावर अवलंबून असत. धार्मिक तंटयात अखेरचा निर्णय करण्याचा अधिकार परंपरेने राजाला मिळाला होता. त्यामुळे युरोपप्रमाणे संघटित धर्मसंस्था आणि राज्यसंस्था यांच्यामध्ये येथे संघर्ष उभा राहिला नाही.

भारतातील धार्मिक सत्तेचे शेकडो जातींमध्ये विभाजन झालेले होते. जातीने घालून दिलेल्या नियमांचे तंतोतंत पालन करणे हेच प्रत्येक माणसाचे धार्मिक कर्तव्य होते. जातपरत्वे वेगळी मंदिरे होती. शिवाय शेकडो वर्षांच्या परंपरेमुळे जातिव्यवस्थेचे संस्कार लोकांच्या रोमारोमांत भिनले होते. धार्मिक तंटयात न्याय देताना राजानेही परंपरेचा मान राखावा अशीच त्याच्याकडून अपेक्षा होती. परंपरेत बदल करण्याचा राजाला अधिकार नव्हता. युरोपात पोपची सत्ता सर्वत्र स्थापित झाल्यानंतरही ग्रीस व रोम-संस्कृतींच्या प्रभावामुळे धर्मनिरपेक्ष कायदा व संस्कृती यांची कल्पना टिकून राहिली होती. भारतीय समाजजीवनाचे कोणतेच क्षेत्र त्या अर्थाने धर्मापासून पूर्णपणे अलिप्त नव्हते. त्यामुळे धर्मनिरपेक्ष पायावर समाजजीवनाची पुनर्रचना करू पाहाणाऱ्यांना सर्वच क्षेत्रात धार्मिक परंपरेविरुद्ध झगडा करणे क्रमप्राप्त ठरले.

कायद्याचे राज्य

धर्मनिरपेक्ष शासनाची संकल्पना इंग्रजी अमदानीतच येथे प्रथम प्रसृत झाली. इंग्रजांच्या शासनाला कायद्याचे राज्य या कल्पनेचे अधिष्ठान होते. भारतातील हिंदू व मुसलमान शासनांचा कारभारही कायद्याला धरूनच चालत असे. पण तो कायदा बव्हंशी त्या त्या धर्माच्या शास्त्रावर आधारित होता. धर्मशास्त्रांचा अर्थ लावण्याचा अधिकार कायद्याने धर्मगुरुंना दिलेला होता. धर्मशास्त्रातील कायद्याप्रमाणे निरनिराळे वर्ग व जाती यांचे अधिकार वेगवेगळे होते. एकाच गुन्ह्याबद्दल निरनिराळ्या जातींच्या लोकांना वेगवेगळ्या शिक्षा मिळत. इंग्रजी राज्यात इंग्रज हा राज्यकर्त्यांचा वंशाचा म्हणून इतराहूंन श्रेष्ठ मानण्यात येत असला तरी इंग्रजांचा कायदा धर्मनिरपेक्ष होता. प्रत्येक व्यक्तीला काही जन्मजात अधिकार आहेत आणि त्यांचे संरक्षण करणे हे शासनाचे कर्तव्य आहे. कायद्यापुढे सर्व व्यक्ती समान आहेत आणि नागरिकांप्रमाणे शासनालाही तो बंधनकारक आहे असा कायद्याचे राज्य या संकल्पनेचा अर्थ आहे. शिवाय हा कायदा धर्माधिष्ठित नसून शासनाने केलेला असल्याने तो बदलणेही शासनाला सहज शक्य होते. त्यामधून शाश्वत व सनातन रुढींऐवजी बदलणाऱ्या कायद्याची

कल्पना लोकांच्या हळुहळू परिचयाची झाली. कायद्याच्या या नव्या तत्त्वांना अनुसरून सती, बालहत्या यासारख्या क्रूर चाली नाहीशा करण्यासाठी कायदे करण्यात इंग्रजांनी पुढाकार घेतला. मात्र १८५७ च्या बंडानंतर त्यांची वृत्ती बदलली. धर्मसुधारणेच्या बाबतीत आपण दाखविलेला उत्साहच आपल्याबद्दल असंतोष उत्पन्न करण्यास कारणीभूत झालेला आहे अशी त्यांनी आपली समजूत करून घेतली. राणीने जाहीरनामा काढून प्रजेच्या धर्मात आपण हस्तक्षेप करणार नाही असे लोकांना आश्वासन दिले. धार्मिक बाबतीत शासनाने तटस्थतेचे धोरण स्वीकारले. राज्यकर्ते परधर्मीय असल्याने ते आपल्या धर्मात हस्तक्षेप करतील अशी अनेकांना भीती वाटत होती. धार्मिक तटस्थतेचे हे धोरण जाहीर झाल्यावर त्यांनी सुटकेचा निश्वास सोडला. तत्कालीन विचारवंतांनी या धोरणाचे स्वागतच केले. मात्र येथील अनेक सामाजिक रुढींना धर्माचे अधिष्ठान होते. सामान्य लोकांच्या दृष्टीने धर्म आणि लौकिक व्यवहार यांत मूलभूत फरक नव्हता. परिस्थितीच्या दडपणाखाली आर्थिक, सार्वजनिक व गुन्हेगारी क्षेत्रातील धर्मनिरपेक्ष कायदे लोकांनी निमूटपणे स्वीकारले. सामाजिक बाबतीत मात्र धार्मिक तटस्थतेच्या या धोरणाचा परिणाम रुढींचे दास्य बळकट करण्यातच झाला.

राष्ट्रीय चळवळ

भारतात राष्ट्रसभेची ज्यांनी स्थापना केली त्या नेत्यांनी इंग्लंडमधील उदारमतवादी विचारसरणीची तत्त्वे मनोमन स्वीकारलेली होती. त्यामुळे राष्ट्रसभेचे सभासदत्त्व निरनिराळ्या धर्मांच्या व जातींच्या लोकांना नेहमीच खुले राहिले. पहिल्या महायुद्धापर्यंत राष्ट्रसभेची चळवळ उच्चशिक्षित मध्यमवर्गापुरती मर्यादित होती. युद्धानंतर तिचे लोण सामान्य लोकांपर्यंत जाऊन पोहोचले. निरनिराळ्या धर्मांचे व जातींचे लोक उत्स्फूर्तपणे तिच्यात भाग घेऊ लागले. तेव्हा स्वातंत्र्यानंतर भारतातील शासनसंस्थेचे स्वरूप नेमके कोणत्या प्रकारचे असेल ते निश्चितपणे जाहीर करण्याची नेत्यांना आवश्यकता वाटू लागली. १९३० साली कराची येथे राष्ट्र सभेचे जे अधिवेशन झाले त्यामध्ये एक विस्तृत ठराव करून आपले शासनविषयक धोरण कोणते राहील हे राष्ट्रसभेने स्पष्ट केले. भारताचे शासन धर्मनिरपेक्ष राहील आणि धार्मिक श्रद्धा, आचार व विचार याबाबतीत सर्व नागरिकांना स्वातंत्र्य राहील असे या ठरावाद्वारे राष्ट्रसभेच्या नेत्यांनी येथील जनतेला आश्वासन दिले. भारतीय संविधानामधून या आश्वासनाला घटनात्मक मान्यता मिळाली.

धर्मनिरपेक्ष शासन

धर्मनिरपेक्ष शासनात तीन प्रमुख संकल्पनांचा अंतर्भाव आहे. (१) राष्ट्राचे नागरिकत्व सर्व धर्मांच्या व पंथांच्या लोकांना खुले राहील. त्यासाठी कोणत्याही एका धर्मावर किंवा कुठल्याही धर्मावर श्रद्धा असण्याची आवश्यकता राहाणार नाही. धर्म मानणाऱ्यांप्रमाणे न मानणाऱ्यांनाही इतरांच्या बरोबरीने नागरिकत्त्वाचे सर्व अधिकार मिळतील. त्यांच्यामध्ये कोणत्याही प्रकारचा भेदाभेद केला जाणार नाही. (२) प्रत्येक व्यक्तीला व गटाला श्रद्धा, विचार आणि आचार यांचे स्वातंत्र्य राहील. शासन कोणाच्याही धर्मात ढवळाढवळ करणार नाही. (३) धर्म आणि शासन यांचे प्रांत वेगळे राहातील. धर्माची शासनापासून पूर्णपणे फारकत करण्यात येईल. सामाजिक व्यवहाराचे नियम ठरविणे हे शासनाचे काम आहे. कायदेमंडळातील लोकनियुक्त प्रतिनिधींना हे नियम ठरविण्याचा अधिकार राहील. धर्म ही प्रत्येकाची खाजगी बाब असेल.

धर्मनिरपेक्षता आणि सर्वधर्मसमभाव

धर्मनिरपेक्षता आणि सर्वधर्मसमभाव या दोन कल्पनांची पुष्कळदा गल्लत केली जाते. परंपरागत हिंदू धर्माने सर्वधर्मसमभावाचा पुरस्कार केलेला आहे. ईश्वर एकच आहे. त्याची उपासना करण्याचे अनेक मार्ग आहेत; आणि प्रत्येक माणसाला आपापल्या मार्गाने जाण्याचा अधिकार आहे हा हिंदू धर्मातील सर्वधर्मसमभावाच्या कल्पनेचा अर्थ आहे. हिंदू लोकांनी आपला धर्म इतरांवर लादण्याचा किंवा त्यांचे मतपरिवर्तन करून त्यांना आपल्या धर्मात घेण्याचा कधीच प्रयत्न केलेला नाही. मात्र धर्म निरपेक्ष शासनाच्या संकल्पनेत धर्म आणि व्यवहार यांची जी फारकत अपेक्षित आहे तिला हिंदू धर्मात स्थान नाही. हिंदू धर्मशास्त्रांनी व्यक्तीच्या जन्मापासून तिच्या मृत्यूपर्यंत तिने करावयाच्या वर्तणुकीचे काटेकोर नियम घालून दिलेले आहेत. धर्माने प्रत्येक व्यक्तीला उपासनेचे स्वातंत्र्य दिले. परंतु खाणे, पिणे, शिक्षण, व्यवसाय या सर्व बाबतीत प्रत्येकाने जातीच्या नियमाचे तंतोतंत पालन केले पाहिजे असा जातिसंस्थेचा आग्रह होता. जातीजातीतील परस्परसंबंध रुढीने ठरलेले होते. रुढींना धर्म-शास्त्रांचा आधार होता. काळाच्या ओघात सामाजिक परंपरांमध्ये स्वाभाविक रीत्या काही बदल घडून येणे अपरिहार्य होते. निरनिराळ्या जातींच्या स्थानांमध्ये काही चढउतार घडून आल्याचेही दाखले आहेत.मात्र बदल आपोआप घडून येणे आणि तो जाणीवपूर्वक घडवून आणणे या दोन गोष्टी अगदी भिन्न आहेत. समाजव्यवस्थेत हेतूपूर्वक बदल घडवून आणण्याचा मध्ययुगात शासनाला

अधिकार नव्हता. धर्माचे संरक्षण करणे हेच राजाचे परमकर्तव्य मानण्यात येत होते. म्हणून इंग्रजपूर्वकाळात येथील शासन धार्मिक नसले तरी ते धर्मनिरपेक्ष होते असेही म्हणता येणार नाही.

महात्मा गांधी आणि धर्मनिरपेक्ष शासन

महात्मा गांधी यांनी सर्वधर्मसमभावाच्या तत्त्वाचा पुरस्कार केला असे सांगितले जाते. पण गांधींनी सर्वधर्मसमभाव आणि धर्मनिरपेक्ष शासन यांची गल्लत केलेली नाही. धर्मनिरपेक्ष शासन आणि सर्व धर्माच्या लोकांची समानता या मूल्यांचा त्यांनी सतत पाठपुरावा केलेला आहे. राष्ट्रातील सर्व धर्माच्या लोकांना समान राजकीय व सामाजिक हक्क, धार्मिक स्वातंत्र्य आणि शासन व धर्म यांची फारकत ही तीन्ही तत्त्वे लोकांच्या मनावर बिंबविण्याचा गांधींनी आपल्या भाषणातून व लेखनातून सतत प्रयत्न केला. गांधी स्वत:ला सनातनी हिंदू म्हणवून घेत असले, तरी त्यांचा धर्म पारंपारिक नसून विश्वधर्मच होता. ते स्वत: कधी देवळात जात नसत किंवा कोणतेही कर्मकांड आचरीत नसत. त्यांच्या दृष्टीने नीती हाच धर्म होता. माणसाला नीतिमार्गाकडे प्रवृत्त करणे, त्याच्या मनातील आणि समाजातील आशिवाविरूद्ध त्याने चालविलेल्या लढ्यात त्याला मानसिक आधार देणे हे त्यांच्या दृष्टीने धर्माचे कार्य होते धर्माचा शासनाशी काही संबंध नाही असेच ते मानीत असत. कोणत्याही धर्माच्या मंदिराचा जीर्णोद्धार करणे असेल किंवा नवी मंदिरे बांधणे असेल तर ते काम त्या त्या धर्माच्या लोकांनी पार पाडावे, शासनाने त्या कामात पुढाकार घेऊ नये, शासकीय पैशाचा वापर त्यासाठी करण्यात येऊ नये. शासकीय अनुदानावर चालणाऱ्या शाळांमधून धार्मिक शिक्षण देण्यात येऊ नये. लोकांच्या भौतिक कल्याणाची तरतूद करणे हे शासनाचे कार्य आहे. त्यांना अन्न, वस्त्र, निवारा, वाहतूक, शिक्षण, वैद्यकीय मदत उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने आपल्याकडील साधन सामग्रीचा विनियोग करावा. या गोष्टींसाठी आवश्यक ते कायदे करण्याचा शासनाला अधिकार आहे. धर्माने याबाबतीत ढवळाढवळ करू नये. धार्मिक कारणासाठी कोणताही कायदा करण्यात येऊ नये असे विचार गांधीजींनी वेळोवेळी व्यक्त केले आहेत.

लोकव्यवहारात सर्वधर्मसमभाव

सर्वधर्मसमभाव हे गांधीजींच्या मते शासकीय व्यवहाराचे तत्त्व नसून लोकांनी परस्परांशी व्यवहार करताना पाळावयाची ती नीती आहे. गांधी वृत्तीने अत्यंत धार्मिक होते. परमेश्वरावर त्यांची दृढ श्रद्धा होती. प्रत्येक धर्मात

परमेश्वराचा संदेश सांगितलेला असल्यामुळे त्यात सत्याचा एक अंश आहे. मात्र त्या त्या देशातील व काळातील काही रीतिरीवाजांचाही प्रत्येक धर्मात शिरकाव झालेला आहे. परमेश्वर परिपूर्ण आहे हे खरे. पण त्याचा संदेश ज्या मानवी माध्यमातून आपणापर्यंत येऊन पोहोचतो ते माध्यम अपूर्ण आहे. प्रत्येक धर्मात सत्याबरोबर असत्याचाही अंश मिसळलेला आहे. शिवाय प्रत्येक धर्मपुस्तकात काही भाग प्रक्षिप्त आहे. म्हणून प्रत्येक धर्मातील जो भाग चांगला वाटेल तो आत्मसात करून आपण आपल्या धर्मात सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न करावा. धर्म हा एखाद्या डबक्यासारखा बंदिस्त असता कामा नये. गंगेच्या प्रवाहाप्रमाणे तो सतत वाहत राहिला पाहिजे. काळाच्या गरजा ध्यानात घेऊन आपण त्यात जरूर तो फेरफार केला पाहिजे असे त्यांना वाटत होते. मात्र इतर धर्मावर टीका करून आपण दुसऱ्यांच्या भावनांवर आघात करू नयेत, समाजात नसते तंटे बखेडे निर्माण करू नयेत असे त्यांचे मत होते. राष्ट्रीय चळवळ बळकट करण्याच्या दृष्टीने निरनिराळ्या धर्माच्या लोकांना एकत्र आणण्याची त्यांना आवश्यकता वाटत होती. म्हणून निरनिराळ्या धर्मातील तत्त्वविचार आणि चालीरीती यांची शास्त्रशुद्ध चिकित्सा करण्यासाठी त्यांनी लोकांना प्रोत्साहन दिले नाही.

गांधीजींच्या सत्याग्रहाच्या चळवळीमधून लोकांची राजकीय जाणीव जशी वाढत गेली तसा जातीय दंग्यांचाही प्रादुर्भाव होऊ लागला. हे दंगे सोडविताना सर्वधर्मसमभावाच्या तत्त्वाचा अवलंब करावा अशी गांधींची शिकवण होती. सर्व धर्माच्या लोकांना आपापल्या धर्माप्रमाणे वैयक्तिक व सामुदायिक आचरण करण्याचा सारखाच अधिकार आहे. म्हणून दोन जमातीत धार्मिक कारणांवरून जेव्हा तंटे निर्माण होतील तेव्हा दोन्ही जमातींच्या भावनांबद्दल आदर राखण्यात यावा, तंटयाचा उद्भव होण्यापूर्वी जी वहिवाट असेल ती शक्यतो चालू ठेवण्यात यावी, जेथे अशी वहिवाट नसेल तेथे दोन्ही जमातींच्या पुढाऱ्यांनी समझोत्याने तंटा मिटविण्याची खटपट करावी अगणि असा समझोता शक्य नसेल तेथे तंटयाचा निर्णय लवादांवर सोपवावा. पण कोणत्याही परिस्थितीत हिंसेचा उद्रेक होऊ देऊ नयें असे उपाय गांधीजींनी सुचविले आहेत.

भारतीय राज्यघटनेतील तरतुदी

धर्मनिरपेक्ष शासनाची ही सर्व अंगे भारतीय संविधानात समाविष्ट करण्यात आली आहेत. घटनेच्या पंचविसाव्या कलमानुसार भारतातील सर्व लोकांना (परदेशी नागरिक धरून) धार्मिक श्रद्धा, विचार, आचार आणि प्रचार

यांचे स्वातंत्र्य आहे. मात्र शांतता व सुव्यवस्था, आरोग्य आणि नीतिमत्ता यांच्या संरक्षणासाठी धार्मिक स्वातंत्र्यावर मर्यादा घालण्याचा हक्कही घटनेने शासनाला दिलेला आहे. आपल्याकडील हिंदू व मुसलमान या दोन्ही जमातीत रस्त्यातून वाजतगाजत धार्मिक मिरवणुका नेण्याची पद्धत आहे. त्यामधून अनेकदा तणाव निर्माण होतात आणि त्यांचे पर्यवसान जातीय दंग्यामध्ये होते. म्हणून अशा मिरवणुकांचे नियंत्रण करण्यासाठी कायदे करण्याचा अधिकार शासनाला देणे घटनाकारांना भाग पडले. धार्मिक मिरवणुकांचे रस्ते ठरवून देण्याचा, त्यांच्यातून दंगे धोपे होऊ नयेत म्हणून तजवीज करण्याचा आणि आवश्यक तेथे त्यांच्यावर बंदी घालण्याचा हक्कही कायद्याने शासनाला मिळालेला आहे. सती, देवदासी यांसारख्या धार्मिक समजल्या जाणाऱ्या चाली मुळातच अमानुष आहेत. कायद्याने त्यांच्यावर बंदी घातल्यास धार्मिक स्वातंत्र्याचा संकोच होत नाही. अस्पृश्यतेची रुढी मानवतेच्या प्रतिष्ठेला हरताळ फासणारी आहे. म्हणून हिंदूंची मंदिरे सर्व जातींच्या व वर्गांच्या लोकांना खुली करणे धार्मिक स्वातंत्र्याशी मुळीच विसंगत नाही असे घटनाकारांचे मत होते. हिंदूंमध्ये येथे शीख, जैन व बौद्ध यांचाही समावेश करण्यात आलेला आहे. तसेच धर्माच्या नावाखाली चालणाऱ्या आर्थिक, वित्तविषयक, राजकीय आणि इतर ऐहिक व्यवहाराबाबत कायदे करण्याचा शासनाला अधिकार आहे.

व्यक्तींप्रमाणे समुदायांनाही घटनेने धार्मिक स्वातंत्र्य दिलेले आहे. कायदा व सुव्यवस्था, आरोग्य आणि नीतिमत्ता यांसाठी घातल्या जाणाऱ्या निर्बंधाच्या चौकटीत राहून धार्मिक व धर्मादाय कारणांसाठी संस्था काढण्याचा, त्या चालविण्याचा, धार्मिक व्यवहारातील स्वायत्ततेचा, स्थावर व जंगम मालमत्तेची मालकी असण्याचा, ती संपादन करण्याचा आणि कायद्याला अनुसरून तिची विल्हेवाट करण्याचा धार्मिक समुदयांचा हक्क घटनेने मान्य केलेला आहे. तसेच धार्मिक व भाषिक अल्पसंख्यांना शैक्षणिक संस्थांची स्थापना करण्याचे व त्या चालविण्याचे स्वातंत्र्य आहे. शासकीय अनुदान देताना अल्पसंख्यांनी चालविलेल्या अशा शिक्षणसंस्थांविरूद्ध शासनाला पक्षपात करता येणार नाही असेही घटनेने अल्पसंख्यांना आश्वासन दिले आहे.

समान नागरिकत्व

भारतीय संविधानाने सर्व धर्मांच्या व पंथांच्या स्त्रीपुरुषांना नागरिकत्वाचे समान हक्क दिलेले आहेत. धर्म, वंश, जाती, लिंग आणि जन्मस्थळ यांची कसोटी लावून नागरिकांमध्ये शासनाला कोणताही भेदाभेद करता येणार नाही. मात्र

त्या बरोबरच जे सामाजिक व सांस्कृतिक दृष्ट्या मागासलेले आहेत अशा नागरिकांसाठी विशेषतः अनुसूचित जाती व जमाती यांच्या उन्नतीसाठी कायद्याने विशेष तरतूदी करण्याचा अधिकार घटनेने शासनाला दिलेला आहे.

भारत हे एकजिनसी राष्ट्र नाही. भारतीय समाज निरनिराळ्या धार्मिक गटांत विभागला गेला आहे. प्रादेशिक तत्त्वांवर आधारलेल्या मतदारसंघांत हिंदूंचे बहुमत असल्यामुळे कायदेमंडळात फक्त त्यांचेच प्रतिनिधी निवडून येतील आणि अल्पसंख्यांवर अन्याय होईल. धार्मिक अल्पसंख्यांना कायदेमंडळात प्रतिनिधीत्व मिळण्यासाठी त्या त्या धर्माच्या मतदारांची वेगळी यादी करण्यात येऊन त्यांना स्वतंत्र मतदारसंघ दिले जावेत अशी येथील जातीयवाद्यांची मागणी होती. राष्ट्रीय चळवळीत फूट पाडण्यास इंग्रज राज्यकर्त्यांना हे हत्यार फार मोयीचे वाटले. म्हणून स्वतंत्र मतदारसंघाची मागणी राज्यकर्त्यांनी तात्काळ मान्य केली. सन १९१९ आणि त्यानंतर वेळोवेळी जे घटनाकायदे मंजूर करण्यात आले त्यानुसार मुसलमान व शीख यांना विभक्त मतदारसंघ देण्यात आले. या मतदारसंघातून निवडून येण्यासाठी त्या त्या धर्माच्या उमेदवारांनी मतदारांच्या संकुचित जातीय भावनेला आवाहन केले. त्यामधून हिंदू व मुसलमान या जमातीत दुरावा उत्पन्न झाला आणि त्याची परिणती अखेर देशाच्या फाळणीत झाली. तेव्हा भारताच्या घटनाकारांनी विभक्त मतदारसंघ बरखास्त केले आणि केंद्र व राज्य यांच्या विधिमंडळातील सर्व जागांसाठीं प्रादेशिक संयुक्त मतदारसंघातून निवडणुका होतील आणि धर्म, वंश, जाती आणि लिंग या कारणास्तव कोणालाही मतदारांच्या यादीतून वगळता येणार नाही अशी व्यवस्था केली.

दलित हे अल्पसंख्य व आर्थिक व आणि सामाजिक दृष्ट्या मागासलेले असल्यामुळे त्यांच्यासाठीही स्वतंत्र मतदारसंघ देण्यात यावे अशी डॉ.आंबेडकरांनी गोलमेज परिषदेत मागणी केली होती. या परिषदेनंतर इंग्रज सरकारनें जो जातीय निवाडा जाहीर केला त्यात ही मागणी मान्य करण्यात आली. स्वतंत्र मतदारसंघामुळे स्पृश्य व अस्पृश्य यांच्यातील सामाजिक अंतर वाढत जाईल आणि त्यामधून अस्पृश्यांचेच अधिक नुकसान होईल असे महात्मा गांधीचे मत होते. म्हणून जातीय निवाडाविरूद्ध त्यांनी प्राणांतिक उपोषण सुरू केले. तेव्हा काँग्रेसचे नेते व दलितांचे पुढायी यांमध्ये वाटाघाटी होऊन पुणे करार करण्यात आला. दलितांना स्वतंत्र मतदारसंघ न देता संयुक्त मतदारसंघात त्यांच्यासाठी जागा राखून ठेवण्यात याव्या अशी तोड सुचविण्यात आली आणि शासनाने ती मान्य केली.

भारतातील वन्य जमाती दलितांप्रमाणे किंबहुना अधिकच मागासलेल्या होत्या. म्हणून पुणे कराराचे तत्त्व दलितांप्रमाणे त्यांनाही लागू करण्याचा घटनासमितीने निर्णय घेतला. त्याप्रमाणे केंद्र व राज्य पातळीवरील विधिमंडळांत अनुसूचित जाती व जमाती यांच्यासाठी लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव जागा ठेवण्यात आल्या.

शासकीय नोकरी अथवा अधिकाराच्या जागा यांच्या बाबतीत सर्व धर्माच्या लोकांना समान संधी देण्याचे तत्त्व घटनेत मान्य करण्यात आले आहे. शासकीय शिक्षणसंस्थाही सर्व धर्मांच्या व जातींच्या नागरिकांना खुल्या आहेत. मात्र शिक्षणाची अथवा शासकीय नोकऱ्यांत प्रवेश करण्याची ज्यांना संधि मिळालेली नाही अशा मागासवर्गियांसाठी व अनुसूचित जातीजमातींच्या लोकांसाठी शासकीय नोकऱ्यांत व शिक्षणसंस्थांत जागा राखून ठेवण्याचा अधिकार घटनेने शासनाला दिलेला आहे.

धर्म आणि शासन यांची फारकत

पूर्णपणे शासकीय अनुदानावर चाललेल्या कोणत्याही शिक्षणसंस्थेमधून धर्माचे शिक्षण देण्यास मनाई आहे. मात्र जी संस्था एखाद्या विश्वस्तनिधीतून अगर देणगीतून उभी राहिली असेल आणि त्या संस्थेत धार्मिक शिक्षण दिले जावे अशी त्या देणगीपत्रात तरतूद केलेली असेल, तर अशी संस्था शासनाने चालविण्यास घेतल्यास वरील नियम लागू पडणार नाही.

शासकीय अनुदानाने चालणाऱ्या किंवा शासनाची मान्यता असलेल्या कोणत्याही संस्थेत धार्मिक शिक्षण देण्यात येत असेल किंवा त्या संस्थेत किंवा तिच्या परिसरात धार्मिक प्रार्थना चालू असेल तर कोणत्याही व्यक्तीला तिच्या किंवा ती व्यक्ती अल्पवयीन असल्यास तिच्या पालकांच्या संमतीशिवाय त्या धार्मिक पाठास किंवा प्रार्थनेस हजर राहाण्याची सक्ती करता येणार नाही.

ज्या कराचे उत्पन्न केवळ एका विशिष्ट धर्माचे संगोपन व संवर्धन करण्यासाठी वापरले जाते असा कर देण्याची शासनाला कोणाही व्यक्तीवर सक्ती करता येणार नाही असेही एक कलम घटनेत अंतर्भूत करण्यात आलेले आहे. मात्र यावरून कराच्या उत्पन्नातील कोणताही भाग धर्मासाठी खर्च करण्यावर घटनेने बंदी घातली आहे असे नाही. आपल्याकडील अनेक मंदिरे व मशिदी यांना पूर्वीच्या शासनाकडून देणग्या व इनामे मिळालेली आहेत आणि त्यांच्याभोवती काही हितसंबंधही निर्माण झालेले आहेत. हे हितसंबंध नष्ट करणे हे शासनाचे कधीच उद्दिष्ट नव्हते. मात्र या सार्वजनिक पैशाचा गैरवापर होऊ नये याची काळजी घेणे शासनाला आपले कर्तव्य वाटले. म्हणून या मंदिरांचा

कारभार पाहाण्यासाठी विश्वस्त नेमण्याचा अधिकार शासनाने आपल्याकडे घेतला. यात्रा किंवा उत्सव यांच्या निमित्ताने शेकडो लोक देवस्थानाच्या परिसरात जेव्हा एकत्र जमतात तेव्हा तेथे गोंधळ माजू नये आणि रोगराई पसरू नये यासाठी शासनाला काही उपाय योजावे लागतात; आणि त्यानिमित्त होणाऱ्या खर्चासाठी अंदाजपत्रकात तरतूद करावी लागते. इतकेच नव्हे तर स्वातंत्र्यानंतर भारतात सामील होण्यासाठी येथील संस्थानिकांना जेव्हा पाचारण करण्यात आले तेव्हा त्या त्या संस्थानांतील देवस्थानांचे हितसंबंध सुरक्षित राहातील अशीही केंद्रशासनाला हमी द्यावी लागली. तिच्यानुसार केरळ राज्याच्या निधीतून दरवर्षी त्रावणकोर देवस्थान निधीसाठी सेहेचाळीस लक्ष रुपये देण्यात यावे आणि त्रावणकोर कोचीन संस्थानांच्या हद्दीतून मद्रास राज्याला जोडल्या गेलेल्या प्रदेशातील हिंदू मंदिरे व देवस्थाने यांच्या खर्चासाठी तेथील देवस्थान निधीला मद्रास राज्याच्या निधीतून दरवर्षी तेरा लक्ष पन्नास हजार रुपये देण्यात यावे अशी घटनाकारांनी तरतूद करून ठेवली आहे.

धर्मांतरांचे स्वातंत्र्य

धार्मिक श्रद्धा, आचार आणि विचार यांच्या प्रमाणे धार्मिक प्रचाराचे व धर्मांतराचे स्वातंत्र्यही घटनेने भारतातील सर्व लोकांना दिलेले आहे. हिंदू धर्म हा कोणी एका संस्थापकाने स्थापलेला धर्म नसून निरनिराळे लोकसमूह, त्यांची दैवते व उपासना यांना सामावून घेऊन विकास पावला आहे. म्हणून एखाद्या व्यक्तीने स्वयंस्फूर्तीने हा धर्म स्वीकारण्याची कल्पना त्या धर्मात नाही. ज्या आदिवासी जमाती इतिहासाच्या प्रवाहात हिंदू समाजाच्या सान्निध्यात आल्या त्यांना हिंदूंनी एक जात म्हणून आपल्या समाजव्यवस्थेत सामील करून घेतले; आणि जातिव्यवस्थेच्या उतरंडीत त्यांना त्यांचे विवक्षित स्थान मिळाले. बौद्ध व जैन धर्मांची स्थापना झाल्यावर ज्या लोकांनी या धर्मांचा स्वीकार केला त्यांच्याही येथे विशिष्ट जातीच बनल्या. पुढे मुसलमान व ख्रिस्ती धर्माचे लोक येथे आल्यावर त्यांनी अनेक हिंदूना आपल्या धर्माची दीक्षा दिली. परंतु हा प्रवाह नेहमी एकतर्फीच राहिला. स्वाभाविकपणे हिंदू लोकांच्या मनांत धर्मांतराबद्दल विरोधाचीच भावना राहिली.

एकोणिसाव्या शतकात परदेशी ख्रिस्ती धर्मोपदेशकांनी भारतात येऊन आपल्या धर्माचा प्रचार सुरू केला. अव्वल इंग्रजीतील काही उच्चवर्णीय सुशिक्षितांनी त्यांच्या प्रभावाखाली ख्रिस्ती धर्माची दीक्षा घेतली. तेव्हा येथील हिंदू सुशिक्षितांमध्ये नवे विचारमंथन सुरू झाले. एकोणिसाव्या शतकातील

ख्रिस्ती धर्मात आधुनिक उदारमतवादातील अनेक तत्त्वांचा समावेश झालेला होता. भारतातील काही थोड्या सुशिक्षितांना या तत्त्वांचे आकर्षण वाटत होते. त्यांना अनुसरून आपल्या धार्मिक जीवनात सुधारणा घडवून आणण्यासाठी त्यांनी अनेक मंडळ्या स्थापन केल्या. मात्र धर्मांतराला त्यांचा विरोध होता. अविभक्त कुटुंबातील एका व्यक्तीने धर्मांतर केल्यास कौटुंबिक जीवन व सामाजिक ऐक्य यांवर आघात होतो. धर्मांतरित ख्रिस्ती भाषा, पोषाख, आचार विचार याबाबतीत परकीय राज्यकर्त्यांचे अनुकरण करतात त्यांची निष्ठाही स्वधर्मीय म्हणजे परकीय राज्यकर्त्यांना मिळते आणि भारतीय स्वातंत्र्याची चळवळ दुबळी राहाते अशी त्यांची तक्रार होती.

राष्ट्रीय चळवळीतील महात्मा गांधींसारखे नेते आणि राधाकृष्णन यांच्यासारखे समाजचिंतक यांचाही धर्मांतरास विरोध होता. निरनिराळे धर्म ह्या एकाच विश्वधर्माच्या निरनिराळ्या शाखा असल्यामुळे ते मूलतः एकच आहेत. प्रत्येक धर्मात काही उदात्त तत्त्वे आहेत. दुसऱ्या धर्मातील उदात्त कल्पना आपल्या धर्मात आणून त्यात सुधारणा करण्याची प्रत्येकाला मुभा असल्याने धर्मांतराची आवश्यकताच नाही असा गांधींच्या म्हणण्याचा आशय होता. धर्म हा आपल्या अंगावरील कातडीप्रमाणे आपल्या शरीराचाच एक भाग आहे. ज्या संस्कृतीमधून आपली जडणघडण बनली आहे तिचा धर्म हा एक मूलभूत घटक आहे. म्हणून धर्माचा त्याग करणे म्हणजे स्वतःलाच विसरणे, आपल्या सांस्कृतिक वारशापासून फारकत करून घेणे होय अशी त्यांची समजूत होती. पण दुसऱ्या धर्माचे श्रेष्ठत्त्व मनोमन पटल्यामुळे आंतरिक गरजेतून एखाद्या माणसाने धर्मांतर केल्यास त्याला गांधीचा विरोध नव्हता.

खरा प्रश्न सामुदायिक धर्मांतराचा होता. सामुदायिक धर्मांतर धर्म तत्त्वांच्या ओढीतून न होता राजकीय नफ्यातोट्याचा हिशेब करूनच होणार होते. इंग्रजांनी धार्मिक अल्पसंख्यांना विधिमंडळांच्या निवडणुकांसाठी स्वतंत्र मतदारसंघ दिलेले होते. साहजिकच आपले राजकीय सामर्थ्य वाढविण्यासाठी दुसऱ्या धर्मातील लोकांना आकर्षून घेण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यांना प्रतिशह देण्याच्या इराद्याने हिंदू जातीयवाद्यांनी शुद्धीची व संघटनेची चळवळ सुरू केली. एका जमातीतून दुसऱ्या जमातीत मोठ्या प्रमाणावर सामुदायिक धर्मांतर झाल्यास सत्तेचे गणित बिघडण्याचा संभव होता. म्हणून त्या काळातील राष्ट्रीय नेत्यांनी धर्मांतरास विरोध केला. मात्र हा प्रश्न राजकीय पक्ष व सामाजिक संस्था यांच्या पुढाकारानेच सोडविण्यात यावा असे त्यांचे मत होते. म्हणून कायद्याने धर्मांतरावर बंदी घालण्यात यावी अशी मागणी त्यांनी केली नाही.

घटनासमितीत भारतीय संविधानाच्या मसुद्यावर चर्चा चालू असताना मूलभूत हक्कांमध्ये धार्मिक श्रद्धा आणि आचार यांच्याप्रमाणे धार्मिक प्रचार आणि धर्मांतर यांचाही समावेश करण्यात यावा असा भारतीय ख्रिस्ती कौन्सिलने आग्रह धरला. धर्मप्रसार हा यांच्या दृष्टीने धार्मिक आचाराचाच एक भाग होता. धर्मांतरामुळे सत्तेचा समतोल बिघडेल ही भीती स्वातंत्र्यानंतर नाहीशी झालेली आहे, परदेशी ख्रिस्ती राज्यकर्ते आपल्या देशाला परत गेलेले आहेत. ख्रिस्ती धर्म येथे नवीन नसून शेकडो वर्षे तो अस्तित्त्वात आहे. परकीय धर्मोपदेशक व प्रतीके यांच्या उसनवारीवर सतत अवलंबून न राहता राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने येथील संस्कृती व परंपरा यांच्याशी सुसंगत अशा नव्या कल्पना व प्रतीके रूढ करण्याचे धोरण येथील ख्रिस्ती धर्मपीठांनी अवलंबिले आहे. म्हणून धार्मिक प्रचार स्वातंत्र्याचा मूलभूत हक्कांत समावेश करण्यात कोणताही धोका नाही असेच त्यांचे मत होते.

वास्तविक पाहाता, विचार, आचार, प्रचार आणि संघटना यांचे स्वातंत्र्य हे आधुनिक लोकशाही राज्यव्यवस्थेतील एक प्रमुख मूल्य आहे. विचारांचे आदानप्रदान करण्याचे स्वातंत्र्य नाकारले तर लोकशाहीच संपुष्टात येते. धार्मिक विचारांनाही हाच न्याय लागू पडतो. युरोपमध्ये प्रॉटेस्टंट धर्मसुधारणेच्या चळवळींमधून जे विचारमंथन झाले त्यामधून आधुनिक सामाजिक व शासकीय तत्त्व ज्ञानांचा जन्म झाला. एकोणिसाव्या शतकात युरोपमधून भारतात आलेल्या ख्रिस्ती धर्मप्रसारकांना धार्मिक प्रचाराचे जे स्वातंत्र्य मिळाले त्यामुळेच नव्या धर्मकल्पनांचा आपल्या लोकांना प्रथम परिचय झाला; आणि त्यामधून धार्मिक व सामाजिक सुधारणांच्या चळवळींना प्रेरणा मिळाली.

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात धार्मिक प्रबोधनाची ही ऊर्मी ओसरून धार्मिक पुनरुज्जीवनवादाची नवी लाट उसळली आहे. राजकीय क्षेत्रात आपण लोकशाहीचा स्वीकार केला खरा; पण परंपरागत धार्मिक श्रद्धा, विचार आणि आचार यांची वस्तुनिष्ठ ऐतिहासिक दृष्टीने चिकित्सा करून त्यांतील कोणत्या श्रद्धा लोकशाहीला पोषक आणि कोणत्या बाधक आहेत याचा आढावा घेण्याचे काम अद्याप बाकी आहे. आधुनिकीकरणाच्या दिशेने देशाची पावले पडायची असतील तर धार्मिक विचारमंथनाची व सामाजिक प्रबोधनाची अत्यंत आवश्यकता आहे.

धर्म हे लोकजीवनाचे एक अंग असले तरी साहित्य, कला, राजकारण यांच्याशी त्याचा निकटचा संबंध आहे. धार्मिक प्रचारावर निर्बंध घालण्याचे

एकदा मान्य केले की साहित्यिक अभिव्यक्तींवर व इतर क्षेत्रांतील विचार-स्वातंत्र्यावर निर्बंध घालण्याची मागणी पुढे येईल. हल्ली अनेक साहित्यिक व कलावंत नव्या मानसशास्त्रीय ज्ञानाच्या प्रकाशात पौराणिक व्यक्तिरेखांचे नव्या पद्धतीने आविष्करण करीत आहेत. परंतु त्यांच्या लिखाणातून परंपरागत समजुतींना थोडा जरी धक्का बसला तरी आमच्या धार्मिक भावना दुखावल्या जातात असा आरडाओरडा सुरू होतो; आणि सनातन्यांच्या दडपणाला बळी पडून शासनही अशा अभिव्यक्तींवर बंदी घालण्यास उद्युक्त होते. कोणत्याही क्षेत्रातील विचारस्वातंत्र्यावर मर्यादा घातल्यास स्वतंत्र विचारांची नेहमी कुचंबणाच होते. अंतीम दृष्टचा असे निर्बंध लोकशाहीला मारक ठरतील अशी जवाहरलाल नेहरु व वल्लभभाई पटेल यांची भूमिका होती. म्हणून धार्मिक प्रचाराच्या स्वातंत्र्याचा घटनेतील मूलभूत हक्कांच्या यादीत समावेश करण्यात आला.

धर्मांतरविषयक विधेयके

भारतीय संविधानाने स्वतंत्र मतदारासंघ बरखास्त केले असले तरी जमातवादी पक्ष आणि प्रवृत्ती यांचे सामर्थ्य कमी झाले नव्हते. आर्थिक प्रलोभनाद्वारे मागासलेल्या जमातींमधून इतर धर्मांत मोठ्या प्रमाणावर धर्मांतर झाल्यास आपली संख्या सापेक्षतेने कमी होईल आणि आपल्या संस्कृतीवर आघात होईल अशी अनेक हिंदूंना भीती वाटत होती. त्यामुळे सामुदायिक धर्मांतरामधून जनमानसात प्रक्षोभ माजण्याचा मोठा धोका होता. परंतु धर्मांतरावर बंदी घालणे हा या प्रश्नावर योग्य उपाय आहे का हाच खरा वादाचा मुद्दा होता.भारताची घटना मंजूर झाल्यानंतरही जेठालाल जोशी, प्रकाशवीर शास्त्री आणि पुढे जनता राजवटीत महावीर त्यागी अशा अनेक खासदारांनी धर्मांतरावर, विशेषत: अनुसूचित जमातींच्या धर्मांतरावर निर्बंध घालणारी विधेयके वेळोवेळी लोकसभेत सादर केली. आदिवासींच्या अज्ञानाचा व दारिद्र्याचा फायदा घेऊन, त्यांना फसवून व प्रलोभने दाखवून ख्रिस्ती धर्मोपदेशक त्यांना धर्मांतरास प्रवृत्त करतात. भारताच्या इशान्य सरहद्दी वरील जमाती धर्मांतरामुळे राष्ट्रातून फुटून निघू पाहात आहेत. म्हणून धर्मांतरावर निर्बंध घालण्यात यावेत. जे दुसऱ्यांचे धर्मांतर करू इच्छितात अशा धर्मोपदेशकांना परवाना घेण्याची सक्ती करण्यात यावी, धर्मांतर करू पाहाणाऱ्या व्यक्तीने शासकीय अधिकाऱ्यांसमोर त्याची नोंद करावी. इतकेच नव्हे तर धर्मांतराचा हेतू मनात ठेवून सामाजिक कार्य करणाऱ्या सेवाभावी संस्थाही शासनाने आपल्या ताब्यात घ्याव्या अशा तऱ्हेच्या कलमांचा या निरनिराळ्या विधेयकांत समावेश करण्यात आला होता. ही विधेयके मंजूर

झाल्यास शासकीय अधिकाऱ्यांच्या हातात खूपच सत्ता एकवटून आदिवासींच्या छळणुकीत भर पडली असती. ज्यांचा आदिवासींच्या धर्मांतरास विरोध असेल त्यांनी केवळ निषेधपर भूमिका न घेता त्या भागात जाऊन सेवाभावी वृत्तीने काम करावे, यांच्या शिक्षणाची व रोगगारीची व्यवस्था करावी, शेती सुधारणेचा कार्यक्रम हाती घ्यावा आणि त्यांची आर्थिक व सांस्कृतीक पातळी उंचावून त्यांना राष्ट्रीय जीवनाच्या मुख्य प्रवाहात सामील करून घ्यावे अशी सुरवातीपासून राष्ट्रीय चळवळीच्या नेत्यांची धारणा होती. महात्मा गांधीच्या प्रेरणेने ठक्करबाप्पासारखे कार्यकर्ते आदिवासी क्षेत्रात अनेक वर्षे कार्य करीत होते. म्हणून धर्मांतरावर बंदी घालणारी ही विधेयके लोकसभेने फेटाळून लावली. लोकांच्या धार्मिक आचार व प्रचार स्वातंत्र्यावर बंधने घालणारी अशी विधेयके लोकसभेत मंजूर होऊ शकली नाहीत हे आपल्या लोकशाहीच्या निरोगीपणाचे एक लक्षण आहे.

दलितांचे धर्मांतर

१९५६ साली बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या हजारो अनुयायांसह हिंदू धर्माचा त्याग करून बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. धर्मांतरापूर्वी भारतातील बौद्ध समाज नगण्यच होता. त्यामुळे दलितांच्या बौद्धधर्मस्वीकाराने कुठल्याही अल्पसंख्य जमातीचे राजकीय पारडे जड होण्याचा संभव नव्हता. बौद्ध धर्म पूर्वीपासून हिंदू संस्कृतीच्या फारच जवळ होता. धर्मांतरामधून बौद्धांच्या मनावरील शेकडो वर्षांच्या शृंखला गळून पडत असल्या तरी त्यांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीत काही फरक पडत नव्हता. म्हणून ह्या धर्मांतराला येथे फारसा विरोध झाला नाही.

भारतीय संविधानाने अनुसूचित जाती व जमातींच्या लोकांना आर्थिक व शैक्षणिक क्षेत्रात काही विशेष सवलती देण्याची राज्यशासनांना मुभा दिली होती. तेव्हा धर्मांतरानंतर या सवलतींचे काय होणार असा प्रश्न नवबौद्धांसमोर उभा राहिला.

शेकडो वर्षांच्या भारताच्या इतिहासात हिंदूधर्मातील अपमान आणि उपासमार यांना कंटाळून अस्पृश्य जातींमधील अनेकांनी मुसलमान व ख्रिस्ती धर्माचा आश्रय घेतला होता. तत्त्वतः या धर्मांत अस्पृश्यतेला स्थान नव्हते. मात्र प्रत्यक्षात सवर्णांतून धर्मांतरित झालेले मुसलमान व ख्रिस्ती धर्मांतरित अस्पृश्यांना कमी लेखीत त्यांच्याशी रोटीबेटी व्यवहार करण्यास नकार देत.

धर्मांतराने त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक परिस्थितीत फार फरक पडला नव्हता. पण अस्पृश्यता हा केवळ हिंदू धर्माचा भाग आहे अशी सबब सांगून बहुतेक राज्यशासनांनी धर्मांतरित दलितांना या सवलती नाकारल्या होत्या. महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यावर मात्र सत्ताधारी काँग्रेस पक्षाने अधिक उदार भूमिका घेतली आणि अनुसूचित जमातींना दिल्या जाणाऱ्या सवलती बौद्धांना देण्याचे मान्य केले. इतर राज्यातील दलित मात्र धर्मांतराने या सवलतीना पारखे झालेले आहेत.

गोहत्याबंदीचा कायदा

हिंदू धर्माने गाय ही पवित्र मानली आहे. म्हणून शासनाने गायींच्या हत्येवर संपूर्ण बंदी घालावी अशी मागणी आधुनिक राजकीय चळवळींचा येथे उदय झाल्यापासून वारंवार पुढे येत होती. मुसलमान करीत असलेली गायीची हत्या हे हिंदू-मुस्लीम दंग्याचे एक प्रमुख कारण होते. मात्र गोहत्याबंदीच्या कायद्याला गांधी व नेहरु या दोघांचाही विरोध होता. गांधीजी गाय पवित्र आहे असेच मानीत असत. मात्र गोरक्षण याचा अर्थ त्यांनी गोसंवर्धन असाच लावला. आपले लोक गाडीच्या बैलांनी जोरात धावावे म्हणून त्यांना पराण्यांनी टोचतात. ही हिंसाच होय. गायींची पूजा होत असलेल्या या देशात प्रत्येक गायीकडून दरदिवशी होणारे दुधाचे उत्पादन जगातील इतर सर्व देशांपेक्षा कमी आहे. म्हणून गोमातेबद्दल ज्यांना आदर असेल त्यांनी गायीबैलांची उत्तम तऱ्हेने निगा राखावी आणि पांजरपोळांचे रूपांतर आदर्श दुग्धशाळांमध्ये करावे असा गांधीजींचा सल्ला होता. भारत हे काही केवळ हिंदूचे राष्ट्र नव्हे. मुसलमान, शीख, पारशी, ख्रिस्ती आणि यहुदी अशा वेगवेगळ्या धर्माच्या नागरिकांचे ते राष्ट्र आहे. गाय ही हिंदू धर्माने पवित्र मानली असली तरी इतर धर्मानीं तिला पवित्र ठरविलेली नाही. म्हणून हिंदूच्या धार्मिक भावनांचा मान राखण्यासाठी गोहत्या बंदीचा कायदा करून इतर धर्माच्या लोकांवर ती लादणे धर्मनिरपेक्ष शासनाच्या व लोकशाहीच्या तत्त्वांशी विसंगत आहे असे गांधींचे स्पष्ट मत होते. नेहरुंचा तर आर्थिक कारणासाठी ही अशा कायद्याला विरोध होता. असे असूनही शेठ गोविंददास यांच्यासारख्या काँग्रेस पक्षाच्या सभासदांनी घटनेमध्ये गोहत्या-बंदीचा समावेश करावा असा आग्रह धरला. तेव्हा पक्षांतर्गत फूट टाळण्यासाठी त्यांच्या म्हणण्याला मान देणे जवाहरलालजींना भाग पडले.

घटनासमितीने शासकीय धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे म्हणून ज्यांची यादी केलेली आहे त्यांत गोहत्याबंदीचा समावेश करण्याचे हिंदुत्ववाद्यांच्या दडपणा-खाली नेहरु व आंबेडकर यांनी मान्य केले खरे. पण शास्त्रशुद्ध गोपालनाच्या

दृष्टीने त्यांनी त्याला पुस्ती जोडली. घटनेत त्यांनी घातलेले कलम "शासन आधुनिक तत्त्वांवर शेती आणि दुग्धोत्पादन या व्यवसायांची उभारणी करण्याचा प्रयत्न करील आणि त्यासाठी गाई, वासरे आणि इतर दुभती जनावरे यांच्या हत्येवर बंदी घालण्याच्या आणि त्यांची उत्कृष्ट निपज करण्याच्या दृष्टीने पावले टाकील." असे आहे. घटना मंजूर झाल्यावर या कलमांना अनुसरून केंद्रशासनाने गोहत्याबंदीचा कायदा करावा असे अनेक खासदारांनी प्रयत्न केले. पण या प्रश्नावर जरूर तर आपले प्रधान मंत्रीपद सोडण्याची नेहरुंनी तयारी दर्शविल्यामुळे ते लोकसभेत मंजूर होऊ शकले नाहीत.

घटनेतील मार्गदर्शक तत्त्वांचा आधार घेऊन उत्तरेकडील उत्तर प्रदेश, बिहार, मध्य प्रदेश आणि राजस्थान अशा राज्यांच्या विधानसभांनी गायी बैल व इतर दुभती जनावरे यांच्या हत्येवर बंदी घालणारे कायदे केले. तेव्हां घटनेने दिलेल्या धार्मिक स्वातंत्र्यावर हे कायदे अतिक्रमण करीत आहेत म्हणून ते घटनाबाह्य ठरवावे असा काही मुसलमानांनी उच्च न्यायालयाकडे अर्ज केला. सर्वोच्च न्यायालयाने या प्रश्नाच्या धार्मिक बाजूचाच प्रामुख्याने विचार केला. कुराणाने ईदच्या दिवशी गायी, बैल, किंवा इतर पशु यांना बळी द्यावे अशी आज्ञा दिलेली असल्याने गाय बळी देणे हा मुसलमानांचा धार्मिक आचार आहे हे त्यांनी मान्य केले. मात्र गायीऐवजी बकऱ्याचा किंवा उंटाचा बळी देण्याची कुराणाने मुभा दिली असल्याने हा मुसलमान धर्मातील आवश्यक धार्मिक आचार ठरत नाही. उलट बहुसंख्य हिंदू गाय पवित्र आहे असे मानतात. गाईंना मारून त्यांचे मांस भक्षण करण्याची कल्पना त्यांना भयानक वाटते याबद्दल वाद नाही. तेव्हां दोन्ही बाजूंच्या भावना ध्यानात घेता गाई व वासरे यांच्या हत्येवर संपूर्ण बंदी घातल्याने धार्मिक स्वातंत्र्याचा संकोच होत नाही. बैल आणि म्हैशी यांच्या बाबतीत मात्र जोपर्यंत ते शेतीतील अथवा गवळीवाड्यातील कामासाठी उपयुक्त असतील तोपर्यंत त्यांच्या हत्येवर बंदी घालणे सयुक्तिक ठरेल. मात्र भाकड म्हशी व निकामी बैल यांच्या हत्येवर बंदी घालणे योग्य नाही असा सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला.

वास्तविक पाहाता या कायद्याच्या बाबतीत दोन धर्मियांच्या भावनांपैकी कोणाच्या भावनांना अधिक महत्त्व द्यावयाचे किंवा धार्मिकदृष्ट्या आवश्यक व अनावश्यक आचार कोणते या वादात शिरण्याचे सर्वोच्च न्यायालयाला काही कारण नव्हते. सामाजिक व्यवहाराचे नियंत्रण करण्याचा आणि सामाजिक सुधारणेच्या दृष्टीने धार्मिक बाबतीत हस्तक्षेप करण्याचा अधिकार घटनेने

कायदेमंडळाला दिलेला आहे. तेव्हा हा कायदा करण्यामागील हेतू धार्मिक आहे की आर्थिक अथवा सामाजिक आहे हाच खरा वादाचा प्रश्न होता. जर म्हैशी आणि बैल यांच्या बाबतीत उपयुक्ततेची कसोटी लावण्यात आली तर गायींच्या बाबतीत ती का लावण्यात येऊ नये? भाकड गायींच्या हत्येव ची बंदी योग्य का मानावी असा इहवादी लोकांचा सवाल होता. न्यायालयाने या प्रश्नाची आर्थिक बाजू लक्षात न घेता केवळ हिंदूंच्या धार्मिक भावानांना अवास्तव महत्त्व देऊन हा निर्णय घेतला अशी त्यांची टीका होती. न्या. गजेंद्रगडकर हे हा निर्णय देणाऱ्या न्यायाधीशांपैकी एक होते. इहवाद्यांच्या या टीकेत बराच तथ्यांश आहे हे १९७१ साली प्रसिद्ध झालेल्या 'सेक्युलॅरिझम अन्ड द कॉन्स्टिटचूशन ऑफ इंडिया' या आपल्या ग्रंथात त्यांनी मान्य केले आहे.[१]

वास्तविक पाहता गोहत्याबंदीचा प्रश्न धार्मिक नसून आर्थिक आहे. या प्रश्नाचा विचार करण्यासाठी केंद्रशासनाने तज्ञांची एक समिती नेमली होती. तिने १९५५ साली आपला अहवाल सादर केला. गायी व बैल यांच्या हत्येवर संपूर्ण बंदी घालणे देशहितास पोषक ठरणार नाही असाच या समितीचा अभिप्राय होता. ऐतिहासिक दृष्ट्या विचार केला तर वेदकालीन आर्य गोहत्या निषिद्ध मानीत नव्हते. ते गोमांसाभक्षणही करीत. यज्ञयागाचा प्रसार झाल्यावर त्यांच्या निमित्ताने वरिष्ठ वर्णांकडून गायी बैलांची मोठ्या प्रमाणावर हत्या होऊन समाजातील पशुधनाचा नाश होऊ लागला. तेव्हां उपनिषद कालातील ऋषीमुनींनी या बाह्य कर्मकांडाचा निषेध करून ध्यान व चिंतन यांचे महत्त्व प्रतिपादन केले. बुद्ध व महावीर यांनी तर सर्व प्राणिमात्रांच्या बाबतीत अहिंसावृत्तीचा उपदेश केला. त्या काळात पशु हीच मुख्य संपत्ती होती. नांगराच्या शेतीला नुकतीच सुरवात होत असल्याने शेतीसाठीही बैलांची आवश्यकता होती. म्हणून गोहत्येचा निषेध उत्पादनाच्या वाढीला पोषकच ठरला. पुढे हिंदू धर्मातही अहिंसा तत्त्वाचा समावेश करण्यात आला.

पंचवीसशे वर्षांचा काळ लोटल्यानंतर भारतातील परिस्थितीत आता खूपच बदल झालेला आहे हरित क्रांती झालेल्या प्रदेशात शेतीसाठी व मालवाहातुकीसाठी यंत्रांचा व रासायनिक खतांचा वापर सुरू झाल्याने शेतीतील गुरांची मागणी कमी होऊ लागली आहे. जगातील गुरांपैकी जवळजवळ एक चतुर्थांश गुरे भारतात आहेत. परंतु दर गाईचे दुधाचे वार्षिक उत्पादन जगातील इतर देशांच्या तुलनेने अत्यल्प आहे. याचे कारण भाकड गाईंची फार मोठी संख्या होय. लोकसंख्येच्या वाढीबरोबर सर्व पडीत जमीन लागवडीखाली आल्याने चाऱ्याचा तुटवडा पडतो. असलेला चारा निरूपयोगी गुरांसाठी वापरला गेल्याने

दुभती जनावरे अर्धपोटी राहातात आणि दुधाचे उत्पादन घटते. शास्त्रशुद्ध पद्धतीने गुरांची जोपासना करावयाची असेल तर जरूर तेव्हा त्यांना मारून टाकण्याची मुभा उत्पादकाला मिळाली पाहिजे. त्याशिवाय दुधाचे उत्पादन किफायतशीर ठरणार नाही आणि या व्यवसायाचा विकासही होणार नाही. सर्वोच्च न्यायालयाने या खटल्यात निर्णय देताना या बाबी ध्यानात घेतल्या नाहीत ही खेदाची गोष्ट आहे. विनोबाजी आणि त्यांचे अनुयायी यांनी धरलेला गोहत्याबंदीचा आग्रह केवळ बुद्धिवादाच्याच नव्हे तर गांधींच्या शिकवणुकीच्याही विरोधी आहे.

कुटुंबविषयक कायदे

इंग्रजी राज्यात शेती, उद्योग, गुन्हेगारी, शिक्षण अशा अनेक क्षेत्रांत नवे कायदे करण्यात आले. मात्र कुटुंबविषयक म्हणजेच विवाह, वारसा, दत्तक, घटस्फोट इत्यादींचे नियमन करणारे परंपरागत कायदे व रूढी तशाच चालू राहिल्या. या सर्व कायद्यांना त्या त्या धर्माचे अधिष्ठान होते. त्यांच्यात बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केल्यास परकीय राज्यकर्ते आमच्या धर्मात हस्तक्षेप करीत आहेत अशी तक्रार होत होती. म्हणून काळानुसार त्यांच्यामध्ये परिवर्तन घडवून आणण्याची जबाबदारी इंग्रजांनी स्वीकारली नाही. मात्र ज्यांना धार्मिक परंपरांच्या जाचातून मुक्त व्हावयाचे असेल अशा जोडप्यांसाठी पाश्चात्य देशातील कायद्यांच्या धर्तीवर विवाह हा करार आहे या तत्त्वावर आधारलेला एक नवा कायदा त्यांनी मंजूर केला; आणि आम्ही कोणत्याही धर्माचे नाही अशी शपथ घेऊन या कायद्याखाली आपले विवाह नोंद करून घेण्याची त्यांनी त्यांना सोय करून दिली.

भारतातील सर्वच धर्म पुरुषप्रधान असल्याने सर्व धार्मिक कायदे स्त्रीपुरुषविषमतेवर व भेदाभेदावर आधारलेले होते. ख्रिस्ती कायदा एक पती-एक पत्नी अशा स्वरूपाचा होता. शारियतने मुसलमानांना एकाच वेळी चारपर्यंत बायका करण्याची परवानगी दिलेली होती. हिंदू स्त्री पुरुषाने एकाच वेळी किती बायका कराव्या याला मर्यादा नव्हती. मुसलमान धर्माने स्त्रीला वारसा हक्क दिला होता. घटस्फोट झालेल्या किंवा विधवा स्त्रीला दुसरे लग्न करण्याची मुभा होती. हिंदू उच्चवर्णीय व ख्रिस्ती समाजातील स्त्रीपुरुषांना घटस्फोटाचा हक्क नव्हता. कोणत्याही परिस्थितीत पत्नीने पतीशी एकनिष्ठच राहिले पाहिजे अशी अपेक्षा होती. मुसलमानी कायद्याप्रमाणे तर तलाक, तलाक, तलाक असा तीन वेळा उच्चार करून पती कधीही पत्नीला एकतर्फी घटस्फोट देऊ शकतो. त्याच्या पत्नीला मात्र तलाकचा हक्क नसतो. निरनिराळ्या धर्मशास्त्रांमध्ये असा

थोडाफार फरक असला तरी सर्वच धर्मांनी स्त्रियांवर अन्याय केला आहे यात शंकाच नाही.

पाश्चात्य संस्कृतीच्या प्रभावामुळे एकोणिसाव्या शतकात शिक्षणाची दारे हळुहळू स्त्रियांना खुली झाली. इंग्रजी शिक्षण घेतलेल्या स्त्रियांना स्वतःच्या हक्कांची जाणीव होऊ लागली. विसाव्या शतकाच्या सुरवातीला भारतातील निरनिराळ्या प्रांतांत स्त्रियांच्या संघटना उभ्या राहिल्या. भारताच्या राज्य-पद्धतीत सुधारणा करणाऱ्या नव्या कायद्याची रूपरेषा ठरविण्याच्या दृष्टीने विचारविनिमय करण्यासाठी त्यावेळचे भारतमंत्री माँटेग्यू भारतात आले होते. तेव्हा स्त्रियांच्या एका शिष्टमंडळाने त्यांची भेट घेऊन स्त्रियांसाठी राजकीय हक्कांची मागणी केली. गांधीच्या सत्याग्रहाच्या चळवळीत तर अनेक स्त्रिया तुरुंगवासात गेल्या आणि त्यांनी लाठीमारही सोसला. विधायक कार्यासाठीही कांही स्त्रियांनी आपले आयुष्य वेचले.

स्त्रियांमध्ये स्वतःच्या राजकीय हक्कांची जाणीव झाल्यावर कौटुंबिक क्षेत्रातील अन्याय त्या निमूटपणे सहन करतील हे शक्य नव्हते. साहजिकच अखिल भारतीय महिला परिषदेसारख्या प्रतिनिधिक संस्थांनी कुटुंबविषयक कायद्यात सुधारणा घडवून आणण्याची मागणी केली व त्यासाठी शासनावर दडपण आणले. डॉ. आंबेडकर केंद्रीय कायदेमंत्री असताना स्त्रियांच्या या मागण्या ध्यानात घेऊन हिंदू कायद्यात सुधारणा करून त्याचे संहितीकरण करण्याच्या दृष्टीने त्यांनी एक हिंदू कोड विधेयक तयार केले. परंतु घटनासमितीतील काँग्रेस पक्षाच्या अनेक सदस्यांचा त्याला विरोध दिसून आल्यावर पंतप्रधान नेहरु यांनी ते मागे घेतले. नव्या घटनेप्रमाणे प्रौढ मताधिकाराच्या तत्त्वावर जी नवी निवडणूक झाली त्यात काँग्रेस पक्षाला लोकसभेत प्रचंड बहुमत मिळाले. त्यानंतर या विधेयकातील मुख्य कलमांचा समावेश असणारे निरनिराळे कायदे नेहरुंच्या प्रेरणेने लोकसभेने संमत केले. या कायद्यांनुसार हिंदू पतीला एकाचवेळी दोन किंवा अधिक बायका करण्यास प्रतिबंध करण्यात आला. हिंदू स्त्रियांना कुटुंबाच्या मालमत्तेत वारसा हक्क मिळाला. हिंदू स्त्रीचा दत्तक घेण्याचा हक्क मान्य झाला आणि काही ठराविक कारणासाठी घटस्फोट घेण्याचाही हिंदू स्त्रीपुरुषांना अधिकार मिळाला.

वास्तविक पाहता धर्मनिरपेक्ष शासनाच्या तत्त्वावर केलेली घटना मंजूर झाल्यानंतर एकाच धर्मातील लोकांना बंधनकारक असणारे कायदे लोकसभेने मंजूर करणे योग्य नव्हते. लोकसभेत त्यावेळी या कायद्यांवर तशी टीकाही झाली

होती. शासन केवळ हिंदूंच्याच धर्मात हस्तक्षेप करीत आहे. अशी हाकाटी करण्यास हिंदू जातीयवादी पक्षांना वाव मिळाला होता. परंतु त्या काळापर्यंत निरनिराळ्या जमातींसाठी निरनिराळे कायदे अस्तित्त्वात होते. कायद्यात सुधारणा करण्याची मागणी करण्यात हिंदू स्त्रिया आघाडीवर होत्या. शिवाय फाळणीनंतर भारतातील मुसलमान समाजाला एक मानसिक धक्का बसला होता. त्यांच्या सामाजिक चालीरीतीत बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केल्यास शासन आपल्या अस्मितेवर आघात करीत आहे अशी त्यांची समजूत झाली असती. म्हणून त्या काळात सर्व धर्माच्या लोकांना समानतेने लागू पडणारा एक कायदा मंजूर करणे राजकीय नेत्यांना सूज्ञपणाचे वाटले नाही.

समान नागरी कायदा

हिंदू सुधारणा कायदे मंजूर झाल्यानंतर थोड्या वर्षांनी समान नागरी कायद्याची मागणी पुढे येऊ लागली. अशा कायद्यासाठी मुसलमानांच्या मनाची अद्याप पूर्वतयारी झालेली नाही, अशा सबबीवर राज्यकर्त्यांनी या बाबतीत सतत चालढकल केली. शहाबानो प्रकरणाच्या निमित्ताने या प्रश्नाची पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. शहाबानू ही एक तलाक पीडित महिला आहे. अनेक वर्षे संसार झाल्यानंतर तिच्या नवऱ्याने तिला तलाक दिला. निर्वाहाचे दुसरे काही साधन नसल्याने तिने नवऱ्याकडून आपणांस पोटगी मिळावी म्हणून न्यायालयात अर्ज दाखल केला. तेव्हा गुन्हेगारी कायद्यातील अनाथांना लागू होणाऱ्या कलमांच्या आधारे तिच्या नवऱ्याने एक छोटीशी रक्कम दरमहा तिला पोटगी म्हणून द्यावी असा सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला. शारियत प्रमाणे तलाक दिलेल्या पत्नीला तीन महिन्यांतून अधिक काळ पोटगी देण्याची नवऱ्यावर जबाबदारी नाही. त्यामुळे हा निर्णय शारियतविरोधी आहे. त्याच्यामधून आमच्या धार्मिक स्वातंत्र्यावर आघात होत आहे. अशी भूमिका घेऊन मुस्लीम जमातवाद्यांनी बराच आरडाओरडा केला. या दडपणाचा परिणाम होऊन राज्यकर्त्यांनी जातीय वाद्यांपुढे शरणागती पत्करली आण तलाकपीडित महिलेच्या पोटगीची जबाबदारी तिच्या पतीऐवजी माहेरच्या नातलगांवर व ते नसतील तर वाकफवर टाकणारा कायदा सत्ताधारी पक्षाने प्रतोदाचा वापर करून लोकसभेत संमत करून घेतला.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची तरफदारी करण्यात आणि मुस्लीम स्त्री संरक्षण कायद्याला विरोध करण्यात हिंदू जातीयवादी अग्रभागी होते. मुसलमानां मधील पुरोगामी गट आणि निरनिराळ्या टिकाणच्या स्त्री संघटना यांचाही या कायद्याला विरोध होता. मात्र हिंदू जमातवाद्यांची भूमिका आणि हिंदू व मुस्लीम

उदारमतवाद्यांची व पुरोगामी स्त्री संघटनांची भूमिका यात मूलभूत फरक आहे. हिंदू जमातवादी सरसहा सर्वच मुसलमानांना प्रतिगामीच नव्हे तर राष्ट्रद्रोही मानतात. म्हणून सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय ज्यांना मान्य नसेल त्यांनी भारतातून निघून जावे. अशा त्यांनी घोषणा केल्या. वास्तविक पाहाता वैचारिक भूमिकेतून सर्वोच्च न्यायपीठाच्या निर्णयावर टीका करण्याचा आणि घटनेतही बदल सुचविण्याचा भारतातील प्रत्येक नागरिकाला मूलभूत हक्क आहे. शासन मुसलमानांचे लाड करीत आहे. त्यांच्यासाठी वेगळा कायदा राखून त्यांच्यातील फुटीरपणाला उत्तेजन देत आहे. समान नागरी कायदा करून मुसलमान समाजात सुधारणा घडवून आणल्याशिवाय आणि राष्ट्रीय प्रवाहात त्यांना सामील करून घेतल्याशिवाय राष्ट्रीय एकात्मतेला बळकटी येणार नाही हे हिंदू जमातवाद्यांच्या म्हणण्याचे पालुपद असते. जमातवाद्यांनी स्त्रियांच्या हक्कांबद्दल अद्याप कधी आस्था दाखविलेली नाही. त्यांच्या दृष्टीने समान नागरी कायद्याची मागणी हे मुसलमानविरोधी प्रचाराचे एक उपयुक्त हत्यार आहे.

भारतातील मानवतावादी स्त्री संघटनांची भूमिका याहून अजिबात वेगळी आहे. राष्ट्रीय ऐक्य हे नेहमी भावनिक असते. कायद्याच्या सक्तीने हे ऐक्य घडून येत नाही. कायद्यासाठी मुसलमान समाजाचे पूर्वमत तयार केले नाही तर त्यामधून हिंदू-मुस्लीम दुरावा वाढण्याचीच शक्यता आहे. फाळणीनंतरही मुसलमान समाजाचे संख्याबळ कमी झाले. मुस्लीम समाजातील वरिष्ठ भांडवलदार व मध्यमवर्गीय सुशिक्षित पाकिस्तानात गेल्याने मुल्लामौलवींच्या बाहेर स्वतंत्र नेतृत्त्व त्यांना उरले नाही. भारतातील मुसलमान बव्हंशी, शेतकरी कारागीर व छोटे दुकानदार आहेत. याच वर्गातील इतर जमातीप्रमाणे त्यांच्यामध्ये शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प व बेकारी मोठ्या प्रमाणावर आहे. त्यामुळे ते परंपरावादी नेतृत्त्वाच्या वर्चस्वाखाली राहातात. त्यांना राष्ट्रीय प्रवाहात सामील करून घ्यावयाचे असल्यास त्यांचे आर्थिक व शैक्षणिक प्रश्न प्रथम सोडवावे लागतील. केवळ समान नागरी कायद्याने राष्ट्रीय एकात्मता घडून येणार नाही.

मुस्लीम कौटुंबिक कायद्यात सुधारणा घडवून आणण्याची ज्या स्त्री-मुक्तीवादी संघटना मागणी करतात त्यांचा झगडा मुसलमानांच्या विरूद्ध नाही. हिंदू कायद्याने हिंदू पुरुषांवर काही अन्याय केला आहे असेही त्या मानीत नाहीत. हिंदू कायद्यात सुधारणा करण्यास येथील लोकनायकांनी अडथळा केला होता याचा त्यांना विसर पडलेला नाही. आपल्या घटनेत स्त्रीपुरुष समानतेचे तत्त्व

मान्य केलेले आहे. म्हणून घटस्फोटाची एकतर्फी अधिकार पतीला देणाऱ्या जुबानीतलाक सारख्या अन्याय व क्रूर रूढी कायद्याने बंद करण्यात याव्या असे त्यांचे म्हणणे आहे. शहाबानो खटल्यातील सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय कायद्याच्या कक्षेत असला तरी त्याने त्यांचे समाधान झालेले नाही. स्त्रीला विभक्त झाल्यानंतर नवऱ्याकडून पोटगी मागण्याची पाळीच येऊ नये अशी परिस्थिती निर्माण करणे हे त्यांचे उद्धिष्ट आहे. स्त्रीशिक्षणाचा प्रसार झाल्याशिवाय आणि स्त्रीचा अर्थार्जनाचा हक्क मान्य करून त्यासाठी आवश्यक असणाऱ्या पाळणा-घरांसारख्या सोयी समाजाने तिला उपलब्ध करून दिल्याशिवाय हे ध्येय प्रत्यक्षात उतरणार नाही. वास्तविक पाहता पुरुषांनी घराबाहेर जाऊन अर्थार्जन करावे आणि स्त्रियांनी घरी राहून संसाराची सर्व जबाबदारी सांभाळावी अशी श्रमविभागणी समाजाने शेकडो वर्षे स्त्रियांवर लादलेली आहे. विवाह झाल्यानंतर काही वर्षे स्त्रीने ही जबाबदारी पार पाडली असेल तर त्या प्रमाणात नवऱ्याच्या संपत्तीत न्याय्य वाटा तिला मिळाला पाहिजे. विभक्त झाल्यानंतर स्वतःच्या पायावर उभे राहाण्याची तिच्यामध्ये ताकद येईपर्यंत तिच्या निर्वाहाची जबाबदारी पतीने पत्करली पाहिजे; आणि कायद्याने ती त्याच्यावर टाकली पाहिजे. लोकसभेने मंजूर केलेला कायदा खरे तर मुस्लीम स्त्रीसंरक्षण कायदा नसून मुस्लीम पुरुष संरक्षक कायदा आहे.

केवळ कायद्यामुळे समाजसुधारणा घडून येत नाही हे खरे. कायद्याची परिणामकारक अंमलबजावणी होण्यासाठी लोकमत तयार व्हावे लागते. नाहीतर कायदे पुस्तकातच राहातात. बालविवाहाला प्रतिबंध करणाऱ्या कायद्याचे हिंदू समाजात मोठ्या प्रमाणावर उल्लंघन होते. हुंडाबंदीचा कायदा होऊनही शेकडो मुली दरवर्षी हुंडाबळी म्हणून मृत्युमुखी पडतात. याचे कारण या सुधारणांसाठी लोकमत तयार करणाऱ्या आणि त्यांच्या अंमलबजावणीसाठी शासनावर दडपण आणणाऱ्या संघटना पुरेशा प्रमाणात अस्तित्त्वात नाहीत हेच होय. असे असले तरी असलेला अन्याय दूर करण्याचे कायद्यावाचून दुसरे साधन नाही. स्वतःच्या हक्कांसाठी झगडण्याची जिद्द अंगी असलेल्या माणसाला तरी कायद्याच्या आधारे अन्यायापासून आपली सुटका करून घेता येते. कायदा लोकमतालाही वळण लावतो. मुस्लीम स्त्रीहक्क संरक्षण कायदा करून शासनाने उलटचा दिशेने पावले टाकली आहेत. अन्यायावर आपले शिक्कामोर्तब केले आहे. हिंदू स्त्रियांसाठी करण्यात आलेले कायदेही पूर्णपणे समाधानकारक आहेत असे नाही. म्हणून सर्वधर्माच्या स्त्रीपुरुषांना समान हक्क देणारा नवा कौटुंबिक कायदा करण्यात यावा अशी

स्त्रीसंघटनांची मागणी आहे. आणि तिच्यावरच सत्ताधाऱ्यांच्या धर्मनिरपेक्षतेची कसोटी लागणार आहे.

वैयक्तिक आणि सामुदायिक धार्मिक स्वातंत्र्य.

घटनेने अस्पृश्यता नष्ट झाल्याचे जाहीर केले. अस्पृश्यांना हिंदूंच्या देवळात प्रवेश मिळवून देणारे कायदे करण्याचा विधिमंडळांना अधिकार देण्यात आला. सामाजिक बहिष्कार हा गुन्हा ठरविण्यात आला. मद्रास प्रातांतील सर्व देवळे अस्पृश्यांना खुली करण्याचा कायदा त्या आधीच मद्रास विधानसभेने मंजूर केला होता. तेव्हा या कायद्यामुळे घटनेने दिलेल्या सामुदायिक धार्मिक स्वातंत्र्याच्या आमच्या हक्कांवर आक्रमण होत आहे अशी गौड सारस्वत जातीच्या लोकांनी न्यायालयात फिर्याद दाखल केली. मुलकी पेठा येथील सुप्रसिद्ध व्यंकटरमण मंदीर या जातीचे असून या मंदिरात अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या लोकांना प्रवेश देणे आपल्या धर्माविरूद्ध आहे असा त्यांचा दावा होता. तेव्हा दलित व्यक्तीचे धार्मिक स्वातंत्र्य व पंथाचे स्वातंत्र्य किंवा पंथीय स्वातंत्र्य आणि सामाजिक सुधारणा यांचा कसा मेळ घालावयाचा असा न्यायालयापुढे प्रश्न उभा राहिला. न्यायालयांनी या बाबतीत उदार व समजूतदार भूमिका घेतली. गौड सारस्वत जातीसाठी असलेल्या देवळांमध्ये काही समारंभ फक्त त्या जातींच्या लोकांपुरतेच मर्यादित असतील तर इतर सर्व जातींच्या लोकांच्या प्रवेशावर बंदी घालण्याचा त्यांना हक्क आहे हे न्यायालयाने मान्य केले. मात्र इतर हिंदूना जेव्हा प्रवेश खुला असेल तेव्हां केवळ जातीच्या कारणास्तव कोणाच्याही प्रवेशावर त्यांना बंदी घालता येणार नाही हे ही त्यांनी स्पष्ट केले.

दाऊदी बोहरा

दाऊदी बोहरा धर्मपंथांच्या बाबतीत अशा प्रश्नावर न्यायालयाने घेतलेली भूमिका मात्र एकांगी व संकुचितपणाची आहे. दाऊदी बोहरा हा भारतातील शिया मुसलमानांमधील एक धर्मपंथ आहे. या पंथाचे धर्मगुरू आपली आज्ञा पाळण्यास आपल्या पंथाच्या लोकांना भाग पाडण्यासाठी बहिष्काराचे अस्त्र वापरतात. इंग्लंडमधील ख्रिस्ती कौन्सिलसमोर आलेल्या एका खटल्यात सरदार सैफुद्दिन हे दाऊदी बोहरांचे धर्मगुरू आहेत आणि आपल्या पंथाच्या लोकांना पंथातून बहिष्कृत करण्याचा त्यांना अधिकार आहे. असा कौन्सिलने निर्णय दिला होता. त्यानंतर १९४९ साली मुंबई विधानसभेने एक कायदा केला. या कायद्याने पंथातील एखाद्या सभासदावर टाकलेला सामाजिक बहिष्कार कायद्याने त्याला मिळालेले हक्क व अधिकार यांपासून त्याला वंचित करीत असल्याने तो कायदेशीर

गांधी ग्रंथ संग्रहालय
32

ठरविण्यात आला आणि अशा कृत्यांबद्दल शिक्षा ठोठावण्याचा न्यायालयांना अधिकार देण्यात आला.[२]

या कायद्याविरूद्ध बोहरा धर्मगुरू न्यायालयात गेले. पंथाचे धर्मगुरू या नात्याने सभासदाला शिस्त लावण्याचा आणि जरूर तर त्याला बहिष्कृत करण्याचा आपल्याला अधिकार आहे. आणि तो काढून घेतल्याने आपल्या पंथाच्या धार्मिक स्वातंत्र्यावर अतिक्रमण होत आहे असा त्यांचा दावा होता. हा खटला चालविण्यासाठी न्यायालयाने जे खंडपीठ नेमले त्याला एकमताने कोणताच निर्णय घेता आला नाही. फार पूर्वीपासून आपल्या धर्मातील लोकांना शिस्त लावण्यासाठी आणि आपले वेगळेपण शाबूत ठेवण्यासाठी निरनिराळ्या धर्मांनी बहिष्काराचा वापर केलेला आहे. प्रत्येक बोहरा व्यक्ती दीक्षेच्या वेळी धर्मगुरुंशी निष्ठा राखण्याची शपथ घेते. त्यामुळे धर्मगुरुंवरील अविचल निष्ठा हा बोहरांच्या धर्मश्रद्धेचाच एक भाग आहे. बहिष्कार हा धार्मिक स्वातंत्र्यासाठी आवश्यक आहे असा निर्णय देऊन खंडपीठाने बहुमताने हा कायदा वैध ठरविला.

सर्वोच्च न्यायालयाचे त्या काळचे प्रमुख न्यायाधीश बी. पी. सिन्हा यांना बहुमताचा हा निर्णय मान्य नव्हता. बहिष्काराच्या भीतीने एखाद्या व्यक्तीवर धार्मिक श्रद्धा लादणे योग्य आहे का असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. आपल्या धार्मिक श्रद्धेच्या सत्यासत्यतेची ग्वाही शासनाला किंवा दुसऱ्या कोणाही व्यक्तीला देण्यास कुणीही मनुष्य बांधलेला नाही. प्रत्येक धर्मपंथ ही इथे एक जात बनते. व्यक्तीचे सामाजिक जीवन त्या पंथाच्या लोकांशी संलग्न असते. एकदा तो मनुष्य बहिष्कृत ठरविण्यात आला तर पंथाच्या मालमत्तेचा व दफनभूमीचा वापर करण्यासच फक्त याला बंदी होते असे नाही. जातीतील इतर लोकांशी असणारे त्याच्या कुटुंबातील माणसांचे रोटीबेटीव्यवहार व संभाषण यांच्यावरही बंदी घातली जाते. तो मनुष्य त्या जातीतील अस्पृश्य ठरतो. तेव्हा हा कायदा घटनाबाह्य नाही, कोणत्याही गटाच्या धार्मिक स्वातंत्र्यावर त्याने घाला पडत नाही. उलट घटनेने प्रत्येक व्यक्तीला धार्मिक श्रद्धा आचार व विचार यांचे जे स्वातंत्र्य दिले आहे त्याच्या परिपूर्तीसाठी तो आवश्यक आहे असे आपले मत न्या. सिंहा यांनी नोंदविले आहे.[३]

न्यायालयांच्या खंडपीठाने बहुमताने हा जो निर्णय दिला त्यामुळे बोहरा धर्मगुरुंना आपल्या पंथातील लोकांवर सत्ता गाजविण्याचा अनिर्बंध अधिकार मिळाला; आणि सुधारकांची मुस्कटदाबी करण्यासाठी ते त्याचा वापर करू लागले. व्यक्तिस्वातंत्र्याची पूर्ण गळचेपी झाली आणि सुधारणांना खीळ बसली. न्यायालयाचा हा निर्णय व्यक्तीच्या स्वातंत्र्यासच नव्हे तर बोहरा जमातीच्या

स्वाभाविक प्रगतीसही बाधक ठरत आहे यात शंका नाही.

धर्म आणि शासन

भारत स्वतंत्र झाल्यावर येथील लोकांच्या उत्साहाला उधाण आले. बहुसंख्य लोक धार्मिक असल्याने धार्मिक क्षेत्रात या उत्साहाचा अविष्कार झाला. देवळातील लोकांची उपस्थिती वाढली. दळणवळणांच्या साधनांमुळे यात्रेकरुंच्या संख्येत भर पडली. स्वातंत्र्यानंतर झालेल्या पहिल्या कुंभमेळ्याला तर पन्नास लाख लोक गेले असावेत असा अंदाज आहे. भारतातील धर्म संघटित नसल्याने यात्रेच्या ठिकाणी बेसुमार गर्दी होऊन लोकांचे जीव धोक्यात येऊ नयेत, दंगा होऊ नये, रोगराईचा फैलाव होऊ नये यादृष्टीने खबरदारी घेण्याची जबाबदारी शासनावर येऊन पडली. याबाबतीत धर्म आणि शासन यांची फारकत करणे भारतातील विशिष्ट परिस्थितीत शक्यच नव्हते.

परंतु सामान्य लोक धार्मिक विधीत गुंतून गेले तरी राज्यकर्त्यांनी धर्म व शासन वेगळे ठेवण्याची दक्षता घेणे जरूर होते. पण त्यांनाही आपला तोल सांभाळता आला नाही. महंमद घोरीने सातशे वर्षापुर्वी लुटलेल्या सौराष्ट्रातील सोमनाथ मंदिराचा जीर्णोद्धार करण्याची मागणी स्वातंत्र्यप्राप्तीच्या काळात पुढे येत होती. हिंदू लोकांची इच्छा असेल तर हा जीर्णोद्धार करण्याचा त्यांना हक्क आहे. मात्र शासनाने हे काम हाती घेऊ नये आणि शासनाचा पैसा त्यासाठी खर्च करण्यात येऊ नये असे स्पष्ट मत महात्मा गांधींनी व्यक्त केले होते. परंतु जुनागढ राज्याने या देवस्थानला जमिनीची देणगी दिली आणि जीर्णोद्धाराच्या मुख्य समारंभाला नेहरुंच्या विरोधाला न जुमानता घटनासमितीचे अध्यक्ष राजेंद्रप्रसाद व काही केंद्रीय मंत्री उपस्थित राहिले. कुंभमेळ्यालाही राजेंद्रप्रसादांनी आपली हजेरी लावली. राष्ट्रपतींचे अनुकरण करून महाराष्ट्रातही पंढरपूर यात्रेच्या वेळी मंत्रीदांपत्याने विठ्ठलाची पूजा करण्याची प्रथा आता रूढ झाली आहे.

लोकसंपर्काची बहुतेक साधने बहुसंख्य हिंदूंच्या ताब्यात आहेत. त्यामुळे अधिकृत पाठ्यपुस्तकातून धर्माचे माहात्म्य वाढविणारे धडे घातले जातात. आकाशवाणीवरून भक्तिगीते व भजने यांचा रतीब घातला जातो आणि कुंभमेळ्याच्या बातम्या दुरदर्शनवर पुन्हा पुन्हा दाखवून त्यातून मंत्रीमहाशयांच्या उपस्थितीकडे लोकांचे लक्ष वेधले जाते. शासकीय कार्यालये आणि राष्ट्रीकृत बँका यामधून देवांच्या मूर्ती अथवा फोटो ठेवले जातात आणि फुले घालून व दिवे जाळून त्यांची पूजा केली जाते. राजकारणी लोकांनी सार्वजनिक ठिकाणी धार्मिक विधीत भाग घेण्याची प्रथा सुरू केल्यावर इतर सार्वजनिक व्यवहारातही त्याचा

सुळसुळाट होऊ लागला. मुंबईतील मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षांनी गणेशपूजेने साहित्य दिंडीला सुरवात केली आणि मंडपाच्या प्रवेशद्वारापाशी सुवासिनींकडून ओवाळूनही घेतले. असे करताना आपण पारंपारिक धर्मातील पुरुषश्रेष्ठत्त्वाची आणि विधवांच्या अशुचितेची कल्पना उचलून धरीत आहोत आणि स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने दर्जा मिळावा म्हणून धडपडणाऱ्या सुधारकांच्या श्रमावर पाणी ओतीत आहोत याचे त्यांना भान राहिले नाही.

धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाची जोपासना करण्याची परंपरा असणाऱ्या काँग्रेस पक्षाने सार्वजनिक व्यवहारात धर्माचा हस्तक्षेप चालू दिल्यावर इतर पक्ष या बाबतीत मागे राहतील अशी अपेक्षा करण्यात अर्थ नव्हता. एन. टी. रामाराव आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री झाल्यावर तिरुपती देवस्थानचे अध्यक्ष भगवान तिरुपती व आपण याचे उपाध्यक्ष असल्याचे त्यांनी जाहीर केले. रामाराव यांची लोकप्रियता सुरवातीपासून तेलगू चित्रपटात त्यांनी केलेल्या राम आणि कृष्ण यांच्या भूमिकांशी निगडीत होती. आता तर ते साधूचा वेष परिधान करतात आणि रथातून फिरतात शासकीय कर्मचारी आपल्या मागण्यांसाठी संपावर गेल्यानंतर तिरुपतीच्या ईश्वराकडे आपला अर्ज घेऊन जातात. शासनच धार्मिक आचारात वारंपार असे गुंतून पडू लागले तर धर्मनिरपेक्ष शासनाचा अंत होण्यास वेळ लागणार नाही.

संदर्भ

१) गजेंद्रगडकर प. बा.–सेक्युलॅरिझम अँड दी कॉनस्टिटचूशन ऑफ इंडिया–पृ. १२९

२) घाऊस मोहंमद–सेक्युलॅरिझम, सोसायटी अँड लॉ इन इंडिया. पृ. २००, विकास पब्लिशिंग हाऊस १९७३.

३) कित्ता पृ. २०३-२०४.

जमातवाद आणि राष्ट्रीय एकात्मता

भारतातील सर्व धर्माच्या व पंथांच्या लोकांना समान अधिकार मिळावे आणि येथील लोकशाहीला स्थैर्य प्राप्त व्हावे म्हणून धर्मनिरपेक्ष शासनाची आपण स्थापना केली. मात्र लोकांची मने पारंपारिक धर्मभावनेत गुंतलेली असल्यामुळे राजकारणातून धर्माची हकालपट्टी करणे फार अवघड होते. उघड किंवा प्रच्छन्नपणे धार्मिक पायांवर एका धर्माच्या लोकांना एकत्र आणणाऱ्या संघटना आणि पक्ष येथे पूर्वीपासून कार्य करीत होते. त्यांच्यावर कायमची बंदी घालणे उचित आणि शक्यही नव्हते. भारताची फाळणी आणि त्यानिमित्ताने झालेल्या कत्तली आणि अत्याचार यांचा येथील जनतेला बसलेला धक्का, महात्मा गांधीच्या खुनानंतर जमातवाद्यांविरूद्ध झालेली लोकमताची प्रतिक्रिया, भारतीय प्रजासत्ताकाची स्थापना, पहिल्या तीन पंचवार्षिक योजनांची यशस्वी परिपूर्ती आणि जवाहरलाल नेहरुंचे प्रभावी व्यक्तिमत्त्व यांच्यामुळे स्वातंत्र्या- नंतरच्या काही वर्षात येथील जमातवादी शक्ती दबून राहिल्या होत्या. गेल्या दोन दशकांत मात्र या शक्ती पुन्हा वर डोके काढीत आहेत. जगातील अनेक देशात आज धार्मिक पुनरुज्जीवनाची लाट आलेली आढळून येते. भारत त्याला अपवाद नाही. धार्मिक समारंभ, उत्सव आणि धार्मिक साहित्य यांची लोकप्रियता सर्वत्र वाढत आहे. लोकांच्या धार्मिक भावनांचा राजकारणासाठी वापर करणाऱ्या संघटना निरनिराळ्या धार्मिक गटांत उभ्या राहात आहेत. शहरांपासून खेड्यांपर्यंत आणि समाजाच्या. तळच्या थरांमध्येही त्यांचे हात पोहोचत आहे. निरनिराळ्या धार्मिक गटांतील तणाव वाढत जाऊन देशाच्या निरनिराळ्या भागात जातीय

दंग्यांचा वारंवार उद्रेक होत आहे. पंजाबातील शीख जमातवाद्यांच्या राजकारणाची परिणती खलिस्तानच्या मागणीत झाली असून ती पुरी करून घेण्यासाठी त्यांच्यातील अतिरेकी गट दहशतवादी मार्गांचा अवलंब करीत आहेत. भारताच्या सरहद्दीवरील पंजाबचे स्थान, लष्करातील शीखांची मोठी संख्या, हरित क्रांतीनंतर निर्माण झालेले प्रश्न, परदेशांतील शीखांच्या कारवाया आणि भारतसरकारचे धरसोडीचे धोरण यांच्यामुळे पंजाबचा प्रश्न अत्यंत गुंतागुंतीचा बनला आहे. त्याचे सांगोपांग विवेचन करणे वेळेच्या अभावी येथे शक्य नाही. मात्र शीखांप्रमाणे हिंदू, मुसलमान, ख्रिस्ती, बौद्ध अशा सर्वच धर्मातील लोकांच्या मनावर जातिवादाचा थोडा बहुत पगडा आहे. जमात- वादाच्या उदयाची कारणे, त्याचे पाठीराखे गट आणि त्यांच्या कृतीचे परिणाम स्थूलमानाने सर्वत्र सारखेच आहेत. मुसलमान हा धार्मिक अल्पसंख्यापैकी सर्वांत मोठा गट होय. देशात सर्वत्र तो विखुरलेला आहे. राजकारणाची त्याला परंपरा आहे. मुस्लीम जातीयवाद्यांनी इंग्रजांशी सहकार्य करून देशाची फाळणी करून घेतल्याने मुसलमानांबद्दल इतरांच्या मनात साशंकता आहे. म्हणून मुख्यतः हिंदू- मुस्लीम तणावांच्या संदर्भातच जमातवादाचे विवेचने करण्याचे मी योजिले आहे.

जमातवादाचे स्वरूप

जमावाद हे उदारमतवाद, गांधीवाद अथवा समाजवाद यांच्याप्रमाणे एखादे स्वयंपूर्ण सामाजिक, तत्त्वज्ञान नाही. सामाजिक प्रश्नांकडे पाहाण्याचा तो केवळ एक दृष्टीकोण आहे. व्यक्तीचे हक्क, समाजाची घडण, निरनिराळ्या गटांचे परस्परसंबंध यांचा सखोल अभ्यास करून जमातवाद्यांनी त्याबाबत काही विचार मांडले आहेत असे दिसत नाही. आजच्या आपल्या राष्ट्रीय जीवनात आर्थिक विकास, परराष्ट्रीय नीती, शिक्षण इत्यादी क्षेत्रात जे प्रश्न उभे राहिले आहेत त्यांना त्यांच्यापाशी काही वेगळी उत्तरे आहेत असेही नाही. स्थूलमानाने प्रचलित सामाजिक व आर्थिक संरचनेच्या चौकटीतच ते वावरत असतात. तिला काही मूलगामी पर्याय शोधून काढण्याची त्यांना आवश्यकता वाटत नाही.

जमातवाद्यांच्या मते धर्म हे परंपरेने चालत आलेले समाजाच्या घडणीचे मूलभूत तत्त्व आहे. भारत हे इंग्लंड किंवा फ्रान्स यांच्याप्रमाणे एक एकसंघ राष्ट्र नाही. हिंदू, मुसलमान, शीख, पारशी, ख्रिस्ती अशा निरनिराळ्या समाजाचे मिळून ते बनलेले आहे. यांतील प्रत्येक जमात हा एक स्वयंपूर्ण असा समाज आहे. यांतील प्रत्येक धार्मिक गटाला स्वतःची वेगळी अस्मिता आहे; वेगळा इतिहास आहे. प्रत्येकाची सांस्कृतिक परंपरा व आचार वेगळे आहेत. अशी जमातवाद्यांची धारणा

असते. निरनिराळ्या जमातींचे हितसंबंध केवळ वेगवेगळे नव्हे तर पुष्कळदा परस्पर-विरोधीही असतात. प्रत्येक व्यक्तीचे हित तिच्या जमातीच्या हितांशी निगडीत असते. म्हणून आपल्या जमातीच्या हिताचे रक्षण करणे हे प्रत्येक माणसाचे कर्तव्य आहे. आपल्या राजकीय, सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक हिताची जोपासना करण्यासाठी आणि इतरांच्या आक्रमणापासून त्याचे संरक्षण करण्यासाठी प्रत्येक धर्माच्या लोकांनी आपल्या खंबीर संघटना बांधल्या पाहिजेत, आपले प्रतिनिधी विधिमंडळात निवडून दिले पाहिजेत आणि निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींनी आपल्या धार्मिक गटाच्या हितसंबंधाचे संरक्षण करण्यासाठी सदैव तयार राहिले पाहिजे असे जमातवाद्यांचे म्हणणे असते.

स्वातंत्र्यपूर्वकाळात राजकारण आणि इतिहासलेखन यांमध्ये जमातवाद्यांचे प्राबल्य होते. आता काही समाजशास्त्रज्ञांवरही जमातवादी दृष्टीकोणाचा प्रभाव पडू लागला आहे. आजचा जमातवाद हा मध्ययुगीन भारतीय इतिहासातील प्रवृत्तींचाच परिपाक आहे असा या समाजचिंतकांचा दावा आहे. येथील हिंदू व मूसलमान हे समाज शेकडो वर्षे शेजारी राहात असले तरी ते एकमेकांपासून अलग होते. त्यांच्यामध्ये सांस्कृतिक देवाणघेवाण नव्हती. प्रत्येक व्यक्तीची जाणीव त्या त्या गटापुरती मर्यादित होती. भारताचा इतिहास हा निरनिराळ्या धार्मिक गटांमधील विशेषतः हिंदू मुसलमानांमधील संघर्षाचाच इतिहास आहे. या मध्ययुगीन मानसिकतेमधूनच आजच्या जमातवादाचा जन्म झालेला आहे असा कार्यकारणभाव ते लावतात.[१] त्यांचा हा निष्कर्ष अप्रत्यक्षपणे आजच्या जमातवादाचे समर्थन करणारा आहे.

मध्ययुगीन राजकारणाच्या मर्यादा

जमातवाद्यांचा हा सिद्धांत इतिहासातील काही सोयीस्कर घटना निवडून काढून त्यांवर आधारलेला असला तरी तो एकंदर ऐतिहासिक वास्तवाशी विसंगत आहे. मध्ययुगामध्ये प्रत्येक व्यक्तीची सांस्कृतिक अस्मिता हा त्या त्या गटापुरती मर्यादित होती हे खरे. पण या गटांमध्ये त्या त्या धर्मातील सर्व लोकांचा समावेश नव्हता. हिंदू धर्माचे लोक तर शेकडो जातीत विभागले गेले होते. प्रत्येक जातीच्या माणसांवर त्या त्या जातीच्या निष्ठेचे संस्कार होते. मध्ययुगात ज्या हिंदू गटांनी आपली स्वतंत्र राज्ये स्थापन केली त्यांना आपण मराठे, राजपूत, जाट, शीख असल्याचाच अभिमान होता. सर्व हिंदू एक आहेत अशी घोषणाही येथे कधी दिली गेली नाही. मुसलमानांमध्ये तात्त्विक पातळीवर मुस्लीम बंधुभावाची संकल्पना होती. परंतु प्रत्यक्षात तैही इराणी, तुर्की, दख्खनी

अशा अनेक गटांत विभागले गेले होते. आपल्या राज्याचा विस्तार करण्यासाठी हिंदू व मुसलमान राजे एकमेकांवर स्वाऱ्या करीत. तशाच हिंदू-हिंदू व मुसलमान मुसलमान या राजांमध्येही आपापसात सतत लढाया होत. औरंगजेबाने दक्षिणेतील मुसलमान शाह्या बरखास्त केल्या होत्या आणि त्याच्या विरूद्ध चाललेल्या लढायांत मराठ्यांनी या राजांना साह्य केले होते असाच इतिहासाचा दाखला आहे. मध्ययुगातील राजकीय सत्ता जमीनदार व संरजामदार वर्गांच्या हातात होती. सामान्य लोकांचा राजकारणात काही सहभाग नव्हता. त्यामुळे वरिष्ठ वर्गातील निरनिराळ्या गटांतील स्पर्धेचे सामान्य लोकांत पडसाद उमटले नाहीत. खेड्यातील बहुसंख्य लोकांचे जीवन ग्रामसंस्थेच्या मर्यादित परिसरात चाले. हिंदूमधील अनेक जातींच्या कारागिरांप्रमाणे मुसलमान मुलाणा व पिंजारी निर्वाहासाठी शेतकऱ्यांवर अवलंबून असत. खेड्यातील आर्थिक जीवन निरनिराळ्या जातीतील लोकांच्या दैनंदिन सहकार्यावर आधारलेले होते. एकमेकांच्या धार्मिक उत्सवातही लोक सहभागी होत. इंग्रजांच्या आगमनापूर्वी येथे जातीय तणाव वाढल्याचे किंवा जातीय दंगे झाल्याचे आढळून येत नाही. तेव्हा केवळ धार्मिक भिन्नता आजच्या जमातवादाला कारणीभूत आहे असा निष्कर्ष काढता येत नाही.

भारतातील प्रत्येक प्रदेशातील संस्कृतीला धर्माचे अधिष्ठान असले तरी त्या त्या संस्कृतीचा विकास प्रादेशिक भाषांमधून झालेला होता. एकाचप्रदेशात राहाणारे निरनिराळ्या धर्मांचे लोक एकच भाषा बोलत. एका प्रदेशात राहाणारे आणि एक भाषा बोलणाऱ्या लोकांचे एक वेगळे राष्ट्रक बनते असा सिद्धांत युरोपात एकोणिसाव्या शतकात मांडला गेला होता. आपल्याकडेही राष्ट्रीय चळवळीच्या बाल्यावस्थेत टिळक, सुरेंद्रनाथ बॅनर्जी इत्यादी लोकांनी भारताप्रमाणे महाराष्ट्र, बंगाल यांचा उल्लेखही कधी कधी राष्ट्र म्हणून केलेला आहे. पुढे राष्ट्रीय चळवळीला आकार येऊ लागल्यावर भारत हे येथील सर्व प्रदेशांचे आणि सर्व भाषा बोलणाऱ्या लोकांचे मिळून बनलेले एक राष्ट्र आहे ही भावना रूढ झाली. धार्मिक आणि जातीय अस्मितेप्रमाणे ही प्रादेशिक अस्मिताही प्रत्येक व्यक्तीच्या मानसिक घडणीचा एक अविभाज्य घटक होती. भारतातील सर्व हिंदू किंवा सर्व मुसलमान हे एक आहेत ही कल्पना येथील राष्ट्रीय चळवळीच्या विकासानंतरच उदय पावली आहे.

हिंदू व मुस्लीम जमातवाद परस्परपूरक

समाजजीवनाला सातत्य व परिवर्तन अशा दोन्ही बाजू असतात. नव्या

कल्पना आणि नवे विचार यांची जुन्या कल्पना व बदलत्या गरजा या दोन्हींशी सांधेजोड झाल्याशिवाय समाजजीवनावर त्यांचा प्रभाव पडत नाही. आजच्या जीवनातील प्रवृत्तींची मुळे इतिहास काळातील कांही घटना व घडामोडी यांत असतात यात शंकाच नाही. तसे नसते तर समाजाचे सातत्य टिकून राहिले नसते. मात्र प्रत्येक समाजात अंतर्विरोधही असतो. म्हणून आजच्या जीवनातील परस्परविरोधी प्रवृत्तींची बीजेही इतिहासात सापडू शकतात. धर्म, वंश, पंथ यांचा भेद असूनही भारत हा एक देश आहे अशी भावना इथल्या बुद्धिमंतांच्या मनात होती म्हणूनच भारतीय स्वातंत्र्याची चळवळ उभी राहिली. इहवादी व जमातवादी या दोन्ही प्रवृत्ती अनेक वर्षे येथे तग धरून आहेत. म्हणून केवळ इतिहासाचा आधार घेऊन कोणत्याही आधुनिक प्रवृत्तीचे स्पष्टीकरण करता येत नाही. त्यासाठी येथील अर्थव्यवस्थेचे स्वरूप, आर्थिक विकासाचा निरनिराळ्या गटांवर होणारा परिणाम, शासकीय धोरणे, निरनिराळ्या पक्षांच्या भूमिका, लोकांच्या चळवळी यांचा सांगोपांग अभ्यास करावा लागेल.

फाळणीचा एक परिणाम असा झाला की सर्व मुसलमान जमातवादी आहेत अशी बहुसंख्य हिंदूंची समजूत झाली. हिंदू मुळात उदारमतवादी आहेत, त्यांच्यातील जमातवाद ही मुसलमानांच्या जमातवादाविरूद्ध झालेली केवळ एक प्रतिक्रिया आहे अशी लोकांची समजूत करून देण्यास हिंदू जमातवाद्यांना वाव मिळाला. परंतु हिंदू व मुस्लीम हे दोन्ही जमातवाद स्वातंत्र्यचळवळीला सुरवात झाल्यानंतर एकाकाळीच उदयास आलेले आहेत. भारतात हिंदूंची संख्या फार मोठी असल्यामुळे हिंदूंचे हित तेच देशाचे हित अशी भूमिका घेऊन हिंदू जमातवादी आपण राष्ट्रवादी असल्याचा दावा करू शकतात. परंतु आक्रमक हिंदुत्त्ववादामुळे इतर जमातीत असुरक्षिततेची भावना निर्माण होते. अल्पसंख्यांचा जमातवाद फुटीरपणाला उत्तेजन देतो आणि फुटीर वृत्ती दडपून टाकण्याच्या मिषाने हिंदू जमातवाद हुकूमशाहीला पोषक ठरतो. मुसलमान जमातवाद्यांची वक्तव्ये व कृती हिंदू जमातवादी आपल्या विधानांना पुरावा देण्यासाठी वापरतात. आणि हिंदू जमातवाद्यांची वक्तव्ये व प्रचार यामुळे घाबरून अल्पसंख्यांमधील सामान्य लोक जमातवाद्यांच्या निशाणाखाली गोळा होतात. दोन्ही जमातवाद याप्रमाणे क्रियाप्रतिक्रियात्मक असून परस्परांना पूरक ठरतात. म्हणून राष्ट्रीय ऐक्य व लोकशाही येथे टिकून राहावी अशी ज्यांना इच्छा असेल त्यांनी या दोन्ही जमातवाद्यांशी मुकाबला करण्यासाठी सज्ज झाले पाहिजे.

जमातवादाचा उगम

भारतातील राष्ट्रवादाची तात्त्विक बैठक कोणती असावी हा प्रश्न

स्वातंत्र्यचळवळीच्या बाल्यावस्थेतच येथील विचारवंतांसमोर उभा राहिला होता. युरोपातील राष्ट्रवादी विचारसरणीत दोन प्रमुख प्रवाह होते. पहिला प्रवाह हा मानवतावादी प्रवाह होय. राष्ट्रवादाचा उगम भांडवलशाहीच्या वाढीबरोबरच झालेला आहे. युरोपातील उगवत्या भांडवलदार वर्गाच्या वाढीस सरंजामशाहीतील निर्बंधामुळे अडथळा येत होता. म्हणून या सरंजामदारांविरूद्ध झगडा करून त्यांनी राज्यसत्तेवर आपले आधिपत्य प्रस्थापित केले. हा झगडा जेथे निकराचा होता तेथे सरंजामदारांविरूद्ध झगडण्यासाठी भांडवलदारांना सामान्य लोकांची मदत घ्यावी लागली. साहजिकच व्यक्तिस्वातंत्र्याचा व समानतेचा त्यांनी पुरस्कार केला.

इंग्लंड हे जगातील पहिले भांडवलशाही राष्ट्र होय. क्रॉमवेल यांच्या नेतृत्त्वाखाली ज्या प्युरिटन क्रांतिकारकांनी राजाविरूद्ध बंड पुकारले त्यांना आपण मानवी स्वातंत्र्याचे पाईक आहोत असा अभिमान वाटत होता. स्वातंत्र्याचा हा संदेश जगाला देणारे पहिले राष्ट्र अशी त्यांची इंग्लंडबद्दलची भावना होती. अठराव्या शतकातील फ्रान्समधील राज्यक्रान्तीचे प्रवक्ते रूसो यांनी राष्ट्रवादाला प्रथम तात्त्विक अधिष्ठान मिळवून दिले. लोकांच्या मनावरील राजनिष्ठेच्या पारंपारिक कल्पनांना विरोध करून त्यांनी राष्ट्रनिष्ठेचा उदोउदो केला. राष्ट्रवादाची त्यांनी लोकशाहीशी सांगड घातली. फ्रेंच क्रांतिकारकांनी स्वातंत्र्य, समता व बंधुभाव या मूल्यांचा सर्वत्र प्रसार केला. पुढे विज्ञानाचा विकास झाल्यावर उद्योगधंद्यात त्याचा वापर करणारा औद्योगिक भांडवलदारांचा वर्ग पुढे आला. तेव्हां अधिक शास्त्रशुद्ध पद्धतीने सामाजिक प्रश्नांची चर्चा होऊ लागली. स्मिथ, बेंथॅम, मिल इत्यादी इंग्रज विचारवंतांनी राष्ट्रीय ऐक्याचा पाया बळकट करण्याच्या दृष्टीनेच व्यक्तिस्वातंत्र्य, सामाजिक समता आणि राजकीय लोकशाही यांवर आधारलेल्या उदारमतवादी तत्त्वज्ञानाची मांडणी केली.

महाराष्ट्रातील लोकहितवादी, रानडे, आगरकर या समाजचिंतकांना इंग्लंडमधील या उदारमतवादी विचारसरणीबद्दल आकर्षण वाटले; आणि त्यातील मूलतत्त्वे आत्मसात करून येथील जीवनाला ती लागू करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. धार्मिक सहिष्णुता, सर्व धर्मांच्या व जातींच्या स्त्रीपुरुषांची समानता, व्यक्तीच्या मूलभूत हक्कांची जपणूक ही मूल्ये प्रमाण मानून त्यांनी भारतातील राष्ट्रीय चळवळीची उभारणी केली. राजकीय सुधारणे बरोबरच धार्मिक व सामाजिक सुधारणांचाही त्यांनी आग्रह धरला. ना. गोखले, महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरु यांनी उदारमतवादी राष्ट्रवादाची ही परंपराच पुढे

चालविली.

पुनरुज्जीवनवादी राष्ट्रवाद

युरोपातील दुसरा राष्ट्रवादी प्रवाह जर्मनीतील होता. एकोणिसाव्या शतकात अनेक छोटी राज्ये एकत्र येऊन जर्मन राष्ट्राची बांधणी होऊ लागली. त्याकाळापर्यंत युरोपातील इतर अनेक राष्ट्रांमधील सरंजामदारवर्ग पूर्णपणे नामोहरम झालेला होता. त्यांच्या इतिहासापासून धडा घेऊन जर्मन सरंजामदार वर्गाने भांडवलदारांशी झगडा करण्याऐवजी युती करणेच पसंत केले. तेव्हा लोकशक्तीची आराधना करण्याची भांडवलदारांना गरज उरली नाही. जर्मन राष्ट्रवाद्यांनी बुद्धीऐवजी भावनेवर भर दिला. त्यांची दृष्टी भविष्याऐवजी भूतकाळावर केंद्रित झालेली होती. गतेतिहासाच्या अभिमानातून लोकांमधील स्वत्त्वभावना जागृत करण्याची त्यांनी कोशीस केली. भावनिक राष्ट्रवादाच्या या पार्श्वभूमीवरच पुढे हुकूमशाहीचा जन्म झाला.

भारतातील काही विचारवंतांवर या भावनिक राष्ट्रवादाचा प्रभाव पडला. विष्णुशास्त्री चिपळूणकर व लोकमान्य टिळक हे महाराष्ट्रातील या पुनरुज्जीवनवादी राष्ट्रवादाचे प्रमुख प्रणेते होत. लाला लजपतराय आणि बिपिनचंद्र पाल हे त्यांचे सहकारी होते. निरनिराळ्या जातींच्या लोकांना एकत्र आणून त्यांना राजकीय दृष्टया जागृत करण्यासाठी टिळकांनी महाराष्ट्रात सार्वजनिक गणेशोत्सव व शिवाजीउत्सव सुरु केले. त्यामधून पारंपारिक धर्माचा राजकारणासाठी वापर करण्याची प्रथा सुरु झाली. या उत्सवाचे आकर्षण बव्हंशी हिंदू धर्माच्या लोकांनाच वाटले. इतर धर्मांचे लोक त्यांच्यापासून दूरच राहिले. पुनरुज्जीवनवादी इतिहासकारांनी भारताच्या मध्ययुगीन इतिहासातील हिंदू-मुस्लीम संघर्षावरच सतत भर दिला. शिवाजी महाराजांनी येथील मुसलमान राजांविरूद्ध केलेल्या लढायांची रसभरीत वर्णने गाऊन लोकांच्या राष्ट्रभावनेला व पराक्रमाला त्यांनीआवाहन केले. त्यामुळे त्यांच्या प्रचारामधून सामान्य हिंदूच्या मनात मुसलमानांबद्दल परकेपणाची भावनाच निर्माण झाली. परकीय राज्यकर्त्यांचा आपल्या धर्मात हस्तक्षेप नको अशी भूमिका घेऊन टिळकांनी सामाजिक सुधारणाकायद्यांना विरोध केला. मात्र टिळक जमातवादी होते असे म्हणणे योग्य नाही. राजकारणात लोकशक्तीचे महत्त्व ओळखणारे तेच पहिले राष्ट्रवादी पुढारी होत. परकीय राज्यकर्त्यांवर दडपण आणण्यासाठी लोकमत संघटित करण्यास तेच प्रथम पुढे सरसावले. मंडालेहून परत आल्यावर मुस्लीम लीगशी त्यांनी समेट घडवून आणला. तरीही पुनरुज्जीवनवादी राष्ट्रवादाच्या

मर्यादा त्यांना पूर्णपणे ओलांडता आल्या नाहीत. या पुनरुज्जीवनवादी राष्ट्र-वादाचीच पुढे सावरकर व गोळवलकर यांच्या हिंदू राष्ट्रवादात परिणती झाली

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात मुसलमानांमध्येही आधुनिक शिक्षणाचा प्रसार झाला. ज्या प्रातांत मुसलमान मोठ्या संख्येने राहात होते त्या बंगाल, बिहार, उत्तरप्रदेश, पंजाब या प्रातांत इंग्रजांनी जमीनदारी धारापद्धती सुरू केली होती. जमीनदार व कुळे यांच्या परिस्थितीत फारच अंतर होते. त्यामुळे केवळ जमीनदार वर्गातूनच नवशिक्षितांत भरती झाली. आपण एकाकाळी या देशावर राज्य केले आहे याची या वर्गाची स्मृती अद्याप ताजी होती. आपण अल्पसंख्य असल्याने भारताने लोकशाही राज्यमघटनेचा स्वीकार केल्यास आपणांस बहुसंख्य हिंदूंच्या वर्चस्वाखाली राहावे लागेल अशी त्यांना भीती वाटली. म्हणून मुसलमान ही एक स्वतंत्र जमात आहे. या जमातीला तिच्या पूर्वेतिहासामुळे विशेष महत्त्व आहे. म्हणून लोकशाहीतील कायदेमंडळात तिला स्वतंत्र प्रतिनिधीत्त्व आणि लोकसंख्येच्या प्रमाणाहून अधिक जागा मिळाल्या पाहिजेत अशी त्यांनी मागणी केली. मुसलमानांना राष्ट्रीय चळवळीपासून दूर राखण्याची इंग्रज राज्यकर्त्यांना आतुरता लागून राहिली होती. म्हणून मुस्लीम जमातवादी पक्षांना त्यांनी हाताशी धरले. त्यांच्या पाठिंब्यामुळे या पक्षांनी राष्ट्रीय चळवळीला विरोध करण्याचे धोरण पत्करले. मुसलमान ही एक वेगळी जमात आहे यामधून आता मुसलमान हे एक वेगळे राष्टक आहे असा जमातवाद्यांचा प्रचार सुरू झाला. त्यामधून पाकिस्तानची मागणी पुढे आली आणि भारतीय उपखंडाचे तुकडे होऊन भारत व पाकिस्तान या दोन राष्ट्रांची निर्मित झाली.

दुसऱ्या महायुद्धापर्यंत मुसलमान जमीनदार व सुशिक्षित मध्यमवर्ग हेच मुस्लीम लीगचे खरे पाठिराखे होते. पाकिस्तान होण्याची शक्यता दिसू लागल्यावर मुस्लीम भांडवलदारवर्ग राजकारणात उतरला. फाळणीनंतर मुसलमानांमधील वरिष्ठवर्ग पाकिस्तानात निघून गेला. उरलेल्या भारतातील बहुसंख्य मुसलमान शेतकरी व छोटे कारागीर आहेत. त्यांच्यामध्ये शिक्षणाचे प्रमाण कमी आहे. बहुसंख्य उद्योग हिंदू उद्योजकांच्या हातात असल्याने नोकरीत त्यांच्याविरूद्ध पक्षपात केला जातो. त्यामुळे बेकारांमध्ये त्यांचे प्रमाण तुलनेने अधिक आहे. अशा परिस्थितीत त्यांच्यामध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाल्यास आश्चर्य नाही. या असुरक्षिततेमुळेच ते मुल्लामौलवींच्या दडपणाखाली राहातात. त्यांची एकगठ्ठा मते मिळावी म्हणून मुसलमान राजकीय पुढारी जमातवादाला उत्तेजन

देतात. सत्ताधारी पक्ष बहुमत मिळविण्यासाठी या पुढाऱ्यांना आपल्यांत सामावून घेतो. मात्र मुसलमानांची लोकसंख्या एकंदर लोकसंख्येच्या केवळ १५ टक्के आहे. केवळ मुस्लीम मतांवर निवडून येता येईल अशा मतदारसंघांची संख्या अत्यल्प आहे बहुतेक निवडणुकांमध्ये त्यांनी सत्ताधारी पक्षालाच मते दिलेली आहेत. मुसलमानांमधील फुटीरपणाला त्यांच्यातील जमातवादी उत्तेजन देत असल्यामुळे त्यांच्याशी राजकीय पातळीवर झगडा करणे आवश्यक आहे यात शंकाच नाही. पण मुस्लीम जमातवाद्यांमुळे ज्ञाता देशाला फार मोठा धोका निर्माण झालेला आहे असे म्हणता येत नाही.

फाळणीपूर्वी मुसलमान जमातवादी जातीय तणाव निर्माण करण्यात आधाडीवर असत. गेल्या काही वर्षात हिंदू जमातवाद्यांनी अधिक आक्रमक भूमिका घेतली आहे. येथील शासन मुसलमान धर्जिणे आहे. मुसलमानांची बाजू घेऊन ते हिंदूंवर अन्याय करते. त्यामुळे हिंदू बहुसंख्य असूनही त्यांना आपल्या देशात असुरक्षितता वाटते असा जमातवाद्यांच्या प्रचाराचा रोख असतो. परंतु स्वातंत्र्योत्तर काळात भारतातील आर्थिक व राजकीय सत्तेच्या नाड्या हिंदू जातींत जन्माला आलेल्या लोकांच्याच हाती आहेत. सैन्य व पोलीस यांच्यांत हिंदूंचात जास्त भरणा आहे. बहुसंख्य शिक्षणसंस्था व जनसंपर्काची साधने त्यांच्याच हाती आहेत. शासनाने मुसलमानांना काही विशेष अधिकार किंवा सवलती दिल्याचे दिसून येत नाही. मुस्लीम कौटुंबिक कायदा वगळल्यास इतर सर्व कायदे हिंदू व मुसलमान यांना सारखेच लागू आहेत. म्हणून हिंदू व मुसलमान या दोघांनाही या देशात असुरक्षितता वाटत असेल तर तिची कारणे येथील आर्थिक परिस्थितीत शोधावी लागतील. हिंदूंनी त्याबद्दल मुसलमानांना आणि मुसलमानांनी हिंदूंना जबाबदार धरल्याने हा प्रश्न सोडविण्यास काहीच मदत होणार नाही.

नियोजनाचे अपयश

जमातवादाचा पाठीराखा मुख्यतः शहरातील मध्यमवर्ग असतो. या मध्यमवर्गात लहान कारखानदार व लहान व्यापारी, डॉक्टर, वकील यांच्यासारखे स्वतंत्र व्यवसायिक आणि नोकरपेशे बुद्धिजीवी अशा अनेक गटांचा समावेश होतो. परंपरा आणि शिक्षण यांच्यामुळे स्वतःची आर्थिक परिस्थिती व राहाणीमान यांची कामगार व शेतकरी यांच्या मानाने मध्यमवर्गियांना जास्त जाणीव असते त्यामुळे आर्थिक परिस्थितीबद्दलचा असंतोष मध्यम वर्गात अधिक प्रमाणात आढळून येतो.

भारतातील भांडवलशाहीच्या बाल्यावस्थेतच येथील संघटित उद्योगांमध्ये मक्तेदारीचा जन्म झालेला होता. काही थोडक्या उद्योगपतींच्या हातात औद्योगिक क्षेत्रातील आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण झाले होते. स्वातंत्र्योत्तर काळात बहुराष्ट्रीय कंपन्यांशी सहकार्य करून त्यांनी येथील बाजारपेठेवर आपले आधिपत्य प्रस्थापित केले. मोठे कारखाने अद्यावत तंत्राचा वापर करून आपला उत्पादन खर्च कमी करतात. जाहिरातीवर अफाट खर्च करून उत्पादित वस्तूंसाठी बाजारपेठ निर्माण करतात. त्यांच्याशी चाललेल्या स्पर्धेत टिकाव धरणे लहान उद्योजकांना नेहमीच अवघड जाते. नियोजनाच्या सुरवातीस मोठ्या कारखान्यांच्या व परकीय भांडवलदारांच्या स्पर्धेपासून लहान उद्योजकांना संरक्षण देण्याचे धोरण शासनाने अवलंबिले होते. हे धोरण कधीच यशस्वीरीत्या राबविले गेले नाही हे तर खरेच. पण जवाहरलाल नेहरुंच्या मृत्युनंतर या धोरणात हळुहळू फरक करण्यात आला. आता तर उत्पादन क्षमता वाढविण्याच्या नावाखाली बड्या उद्योगांना उत्तेजन देण्याचे व परकीय वस्तूंच्या व भांडवलाच्या आयातीवरील निर्बंध दूर करण्याचे शासनाचे धोरण आहे. त्यामुळे छोट्या उद्योजकांना अधिक खडतर स्पर्धेस तोंड द्यावे लागून त्यांची परिस्थिती बिकट बनत चालली आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतातील शिक्षणाचा वेगाने विकास झाला. शाळांच्या संख्येत भर पडली. तालुक्यांच्या ठिकाणी महाविद्यालये उभी राहिली. ज्यांना आतापर्यंत कधी शिक्षणाची संधी मिळाली नव्हती अशा जातींनी या सोयींचा फायदा घेतला. त्यामुळे सुशिक्षित आणि अर्धशिक्षितांची मोठी फौज आज नोकऱ्यांच्या शोधात हिंडत आहे. मात्र रोजगारीच्या वाढीचा वेग अत्यंत अपुरा आहे. औद्योगिक विकासाची मंद गती आणि अद्यावत तंत्राचा वापर यामुळे उत्पादन वाढले तरी रोजगारीत भर पडत नाही. गेल्या वीस वर्षात औद्योगिक उत्पादनात दरवर्षी सरासरी ४ ते ५ टक्क्यांनी वाढ झाली. पण संघटित खाजगी उद्योगातील रोजगारी प्रतिवर्षी सरासरी एक टक्क्यानेही वाढलेली नाही. ज्यांना संघटित उद्योगात प्रवेश मिळतो त्यांना चांगले उत्पन्न मिळते. इतरांना असंघटित उद्योगात अथवा शेतीत अपुऱ्या उत्पन्नावर राबावे लागते अथवा बेकारीचा जाच सहन करावा लागतो.

निरनिराळ्या गटांमधील वाढती विषमता हे भांडवलशाहीतील आर्थिक विकासाचे एक अविभाज्य लक्षण आहे. मध्ययुगीन अर्थव्यवस्थेतही विषमता होती. परंतु वरिष्ठ व कनिष्ठ वर्गांची परिस्थिती व राहाणीमान वर्षानुवर्षे कायम होते. त्यामुळे नैसर्गिक परिस्थितीतील भिन्नतेप्रमाणे ही आर्थिक विषमताही

स्वाभाविक मानली गेली. भांडवलशाही अर्थव्यवस्था स्पर्धेवर आधारलेली असते. ज्यांच्यापाशी जमीन, भांडवल, तंत्रज्ञान यांपैकी एखादा तरी उत्पादक घटक विपुल प्रमाणावर असतो ते गट इतरांना नामोहरम करतात. स्वाभाविक विकसित आणि अविकसित असे प्रदेश, गट किंवा व्यक्ती यांच्या उत्पन्नातील तफावत वाढत जाते. शिवाय आपल्या मालाला मागणी निर्माण करण्यासाठी उद्योजक लोकांमध्ये नव्या नव्या गरजा निर्माण करतात. जाहिरातींसाठी निरनिराळ्या माध्यमांचा उपयोग केला जातो. त्यामधून विषमतेची जाणीव अधिक टोकदार बनते. अपुऱ्या उत्पन्नामुळे ज्यांना चागंल्या रहाणीमानापासून सतत वंचित व्हावे लागते त्यांच्या मनांत कटुतेची भावना बळावते.

उत्पन्नातील विषमता कमी करणे हे आपल्या नियोजनाचे एक उद्दिष्ट म्हणून मान्य करण्यात आले होते. श्रीमंतांवर कर लादून आणि गरीबांच्या कल्याणासाठी निरनिराळ्या योजना आखून ही विषमतेची दरी कमी करण्याची शासनाची मनीषा होती. परंतु राष्ट्रीय उत्पन्नातील बचतीचे प्रमाण पाच टक्क्यावरून पंचवीस टक्क्यांपर्यंत वाढूनही या बचतीचा पुरेसा भाग करांच्या द्वारे शासनाकडे वळविण्यास राज्यकर्ते असमर्थ ठरले. अंदाजपत्रकातील तूट भरून काढण्यासाठी चलनवाढ करण्यात आली. तिचा परिणाम भाववाढीत झाला. भाववाढीने व्यापारी, कारखानदार व मोठे शेतकरी यांचा नफा वाढत जातो. परंतु ज्यांचे उत्पन्न दीर्घ मुदतीच्या कराराने ठरलेले असते असे पगारी नोकर व कामगार यांच्या उत्पन्नात भर पडत नाही. संघटित कामगार मालकांशी लढे करून आपले उत्पन्न वाढवून घेऊ शकतात; आणि असंघटित क्षेत्रातील कामगार व शेतमजूर यांना भाववाढीचा सारा बोजा सहन करावा लागतो. त्यांच्या वास्तव उत्पन्नात घट होते आणि निरनिराळ्या वर्गातील विषमता अधिक तीव्र होते.

जातिव्यवस्था आणि भांडवलशाही

आर्थिक विकासाची कुंठित गती, संघटित क्षेत्रातील मक्तेदारी, मोठ्या प्रमाणावरील बेरोजगारी आणि उत्पन्नातील वाढती विषमता ही सामान्य लोकांमधील असंतोषाची व असुरक्षिततेच्या भावनेची मूळ कारणे आहेत. परंतु आपल्या देशातील परंपरागत सामाजिक चौकटीमुळे त्यांचा आविष्कार जातीय तणावातून होत आहे. मध्ययुगामध्ये भारतातील बहुसंख्य लोक खेड्यात राहात. खेड्यातील प्रत्येक माणसाचा आहार, पेहराव, शिक्षण, व्यवसाय व विवाह यांवर जातीची कडक बंधने होती. निरनिराळ्या जातींमधील रोटीबेटी- व्यवहारावर बंदी होती. त्यामुळे व्यक्तीची सामाजिक जाणीव जातिपुरतीच मर्यादित राहिली.

खेड्याच्या लहान परिघात निरनिराळ्या जातींच्या लोकांचा परस्परांशी प्रत्यक्ष संबंध येई. आर्थिक जीवनांत त्यांना सहकार्य करावे लागे. मुसलमान व ख्रिस्ती या अल्पसंख्य जमातींचे लोकही खेड्यांमध्ये एक जातच बनून राहिले होते. दैनंदिन जीवनातील या साहचर्यामुळे खेड्यातील स्थितिशील जीवनात निरनिराळ्या जातीत किंवा जमातीत संघर्ष उद्‌भवले नाहीत.

इंग्रजी राजवटीत भारतात एका मोठ्या आर्थिक स्थित्यंतराला सुरुवात झाली. स्पर्धा व करार यांवर आधारलेली भांडवलदारी अर्थपद्धती शहरात विकास पावू लागली. नव्या यंत्रोद्योगाच्या स्पर्धेमुळे जुन्या हस्तोद्योगांचा ऱ्हास झाला. खेड्यांतील निरनिराळ्या जातींचे सहकार्य संपुष्टात आले. मात्र जातिसंस्थेला धर्माचे अष्ठिान असल्याने जातिसंस्थेचा ताबडतोब ऱ्हास झाला नाही. खेड्यातून शहरात आलेले त्या त्या जातींचे लोक आपली वेगळी वस्ती करून राहिले. शहरातील नव्या अर्थव्यवस्थेतही जातिव्यवस्थेचे काही प्रमाणात प्रतिबिंब पडले. पूर्वीपासून ज्यांना ज्ञानाची व लिखापढीची परंपरा होती त्यांनी इंग्रजी ज्ञान संपादन करून शासकीय नोकरीतील मोक्याच्या जागा काबीज केल्या. स्वतंत्र व्यवसायांतही त्यांनीच प्रथम प्रवेश मिळविला. ज्यांच्यापाशी भांडवल होते ते नव्या व्यापारधंद्यात शिरले. बलुतेदारांपैकी अनेकांनी आपले जुने व्यवसाय शहरात चालू ठेवले मात्र ज्यांच्यापाशी जमीन किंवा कौशल्य नव्हते त्यांना नोकरीशिवाय चरितार्थाचे दुसरे साधन उरले नाही. मध्ययुगीन समाजव्यवस्था विषमतेवर आधारलेली होती. निरनिराळ्या जातींची सांस्कृतिक परंपरा भिन्न होती. त्यामुळे निरनिराळ्या जातीत शिक्षणाचा प्रसारही वेगवेगळ्या काळी झाली. ज्यांनी नोकरीच्या व व्यापाराच्या क्षेत्रात उशीरा प्रवेश केला त्यांना त्या त्या क्षेत्रात आधीच ठाण मांडून बसलेल्या निरनिराळ्या जाती जमातीतील लोकांच्या स्पर्धेला तोंड दद्यावे आहे. परंतु भारताच्या विशिष्ट परिस्थितीत बहुसंख्य लोकांवरील जातिनिष्ठेच्या संस्कारामुळे व्यक्तिव्यक्तींमधील स्पर्धेला जातिजातींमधील स्पर्धेचे रूप प्राप्त झाले आहे. वास्तविक पाहता स्पर्धेवर आधारलेल्या आपल्या समाजव्यवस्थेत प्रत्येक जात व जमात आता निरनिराळ्या वर्गात विभागली गेली आहे; आणि प्रत्येक वर्गात अनेक जातीय गट अस्तित्त्वात येत आहेत. मात्र जन्म, मृत्यु, विवाह या व्यक्तीच्या आयुष्यातील महत्त्वाच्या प्रसंगी व्यक्तीचा तिच्या जातीजमातीशी संबंध येतो. स्पर्धेच्या राज्यात सुरक्षिततेसाठी व्यक्ती जमातीवर विसंबून राहाते. त्यामुळे तिच्या जातिनिष्ठेला धक्का बसत नाही. उलट एकाच वर्गातील

निरनिराळ्या जमातीय गटात नोकरीसाठी व बाजारपेठेसाठी सतत स्पर्धा चालू राहाते. त्यांच्यामध्ये एकमेकांबद्दल दुरावा निर्माण होऊन वर्गीय ऐक्याला वाव उरत नाही. मध्यमवर्गातील निरनिराळ्या जातीजमातींच्या गटात सतत चालणारी स्पर्धा हेच जातीय तणावांचे मुख्य कारण आहे. स्थानिक आणि परप्रांतीय, हिंदू-मुसलमान, ब्राम्हण-ब्राम्हणेवर, सवर्ण-दलित, पुढारलेल्या आणि मागासलेल्या जाती या सर्वांच्यामधील संघर्षाची पार्श्वभूमी हीच आहे.

जमातवाद हा समाजवादाला पर्याय

स्वातंत्र्यपूर्वकाळात हिंदू व मुसलमान मध्यमवर्गीया मध्ये व्यापार, नोकरी आणि राजकीय सत्ता यांच्यासाठी चाललेल्या स्पर्धेमधून जमातवादाचा उदय झाला. पंजाब व बंगाल या प्रांतात हिंदू जमीनदार व मुस्लीम कुळे यांच्यामधील वर्गकलहाचाही जमातवादामधून आविष्कार झाला. स्वातंत्र्योत्तर काळात परिस्थितीत बदल घडून आला आहे. महाराष्ट्रात मालेगाव, भिवडी अशा काही ठिकाणी मुसलमानांमध्ये काही छोटे उद्योजक आहेत. परंतु महाराष्ट्राचा किंवा एकंदर भारताचाही विचार केला तर मुसलमान आघाडीवर असल्याचे दिसत नाही. हिंदूंमधील पुढारलेल्या जमातींच्या हातीच आता आर्थिक सत्तेच्या नाड्या आहेत. भारताच्या फाळणीनंतर बहुसंख्य हिंदूंच्या मनात मुसलमानांबद्दल जी अढी निर्माण झाली तिचा वापर लोकांच्या असंतोषाचा ओघ त्याच्याविरूद्ध वळविण्यासाठी करून घेण्यात येत आहे. पहिल्या महायुद्धानंतर ब्राम्हणेतर जमातीत जेव्हा जागृती घडून आली तेव्हा ब्राम्हण जमीनदार व प्रशासक यांच्याविरूद्ध असलेला त्यांचा राग उफाळून आला. या रागाला मुस्लीम द्वेषाचे स्वरूप देण्याच्या हेतूने येथील उच्चवर्णियांनी हिंदुमहासभेला उचलून धरले. ब्राम्हणेतरांत मराठा जात अग्रेसर व बहुसंख्य होती. लोकशाहीचा विस्तार झाल्यावर त्यांच्या हाती सत्ता येण्याची त्यांना आशा होती. म्हणून स्वातंत्र्यासाठी ब्रिटिशांविरूद्ध लढा करणाऱ्या राष्ट्रीय काँग्रेसला त्यांनी पाठिंबा दिला. स्वातंत्र्योत्तर काळात मराठा समाजातून एक सधन शेतकरी वर्ग आता पुढे आलेला आहे. शेतमजूरांविरूद्ध पाठिंबा मिळविण्यासाठी त्यांच्या जातिनिष्ठेचा तो उपयोग करून घेतो. परंतु बेकार तरुणात इतर मागस जातींचा भरणाच जास्त आहे. त्यांच्या असंतोषाला जमातवादाचे स्वरूप देणे शहरातील व खेड्यातील वरिष्ठ वर्गांना सोयीचे आहे. म्हणून शिवसेना, विश्व हिंदू परिषद, हिंदू एकता, पतित पावन संघटना या सर्वांना वरिष्ठ वर्गातील एका गटाचा आशिर्वाद मिळतो.

शोषित वर्गांचे प्रश्न सोडविण्यास भांडवलशाही असमर्थ ठरल्याने

समाजवादाचा उगम झाला. जमातवाद हा समाजवादाला विरोध करण्यासाठी वरिष्ठ वर्ग जाणून बुजून वापरीत असलेले एक हत्यार आहे. जमातवादाचे मूळ कारण आर्थिक असंतोष व असुरक्षितता हे असले तरी भारतातील बेकारी, महागाई, यांसारखे आर्थिक प्रश्न सोडविण्याची जमातवाद्यांनी कधी उत्सुकता दाखविली किंवा त्यावर काही उपाययोजना सुचविली असे दिसून येत नाही. त्यांचा सारा रोख केवळ धार्मिक प्रश्नांवरच असतो. परंतु हिंदू व मुसलमान शेतकरी किंवा दोन्ही धर्मांचे कामगार यांचे आर्थिक प्रश्न सारखेच असतात. ते सोडवायचे असतील तर त्या त्या वर्गातील सर्व गटांना एकत्र आणून त्यांच्या संघटना बांधाव्या लागतात, आर्थिक धोरणे बदलण्यासाठी शासनावर दडपणा आणावे लागते. किंवा राजकीय सत्ता काबीज करून अर्थव्यवस्थेची घडण बदलावी लागते. सामान्य लोकांना याची अस्पष्ट का होईना जाणीव असते म्हणून निरनिराळ्या क्षेत्रात वर्गीय संघटनाही आज बांधल्या जात आहेत. त्यांच्या आधारे मूलभूत समाजपरिवर्तनाच्या चळवळी जेव्हा उभ्या राहातात. तेव्हा आपापसातील कलह बाजूस सारून निरनिराळ्या जातीधर्माचे लोक परस्परांशी सहकार्य करून त्यांच्यामध्ये सहभागी होतात आणि जमातवादी शक्तींना उतरती कळा लागते. याउलट समाजपरिवर्तनाच्या चळवळी क्षीणबल झाल्या की लोकांमध्ये नैराश्य पसरते आणि जातीय दंग्यांचा स्फोट होतो. स्वातंत्र्य चळवळीच्या काळातही हाच अनुभव आला होता. आजही ज्या राज्यांत डावे पक्ष सत्तारुढ आहेत तेथे जातीय दंगे झालेले नाहीत.

धार्मिकता आणि जमातवाद

जमातवादाशी मुकाबला करावयाचा असेल तर त्याचा आशय प्रथम नीट समजून घेतला पाहिजे. प्रत्येक धार्मिक मनुष्य जमातवादी असतोच असे नाही. आपल्या देशातील खेड्यांमधील बहुसंख्य लोक अद्याप मनाने मध्ययुगातच वावरत आहेत. धर्म हे त्यांच्या परंपरागत जीवनाचेच एक अंग आहे. त्यांना जमातवादी म्हणता येणार नाही. आजच्या आर्थिक व राजकीय जीवनातील असुरक्षिततेमुळे सामान्य माणसे मानसिक आधारासाठी धर्माकडे वळतात. अगतिकतेतून निर्माण झालेल्या या धर्मभावनेला धार्मिक व राजकीय पुढारी खतपाणी घालतात. मात्र जमातवाद्यांचा भर धर्माच्या केवळ बाह्यांगावर असतो. निरनिराळे धार्मिक उत्सव थाटामाटाने साजरे करणे, सामुदायिक आरती करून प्रसाद वाटणे, ध्वनिक्षेपकावरून आजुबाजूच्या परिसराला गीते ऐकविणे असल्या कृत्यांमधून त्यांना समाधान मिळते. धर्माच्या नैतिक अंगाशी त्यांचा

परिचय नसतो. माणसांच्या भावनांचे उदात्तीकरण करणे, जीवनातील सुखदुःखांचे प्रहार मनाचा तोल जाऊ न देता सहन करण्याची त्याला शिकवण देणे, समाजातील अपप्रवृत्तींशी झगडा करण्यास त्याला प्रवृत्त करणे हे त्यांच्या धर्म कल्पनेत बसत नाहीत. त्यांच्या दृष्टीने धर्म हे संघटनेचे केवळ एक तत्त्व असते.

महाराष्ट्रातील मध्यमवर्गीय सुशिक्षितांमध्येही पूजेअर्चेचे, बाह्य कर्मकांडाचे, गुरुंचे प्रस्थ सध्या खूप वाढत आहे. हे समाजाच्या निरोगीपणाचे लक्षण नव्हे. स्वातंत्र्यपूर्वकाळात भारतात सामाजिक व राजकीय सुधारणेच्या ज्या चळवळी झाल्या त्यामध्ये येथील मध्यम वर्गीय सुशिक्षितांनी हिरीरीने भाग घेतला. त्यामधून आधुनिक काळाशी सुसगंत अशा व्यापक सामाजिक तत्त्वज्ञानाचे त्याच्या जीवनाला अधिष्ठान मिळाले. तेव्हा बाह्य कर्मकांडांचे त्यांच्या जीवनातील महत्त्व कमी झाले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर या चळवळींचा जोर ओसरला. उलट आर्थिक विकासामधून सामाजिक जीवनातील गुंतागुंत वाढत गेली. निरनिराळ्या गटांमधील जीवघेणी स्पर्धा आणि तिच्यामध्ये पुढे येण्यासाठी सत्ता आणि पैसा यांचा केला जाणारा वापर यांमधून गोंधळ व असुरक्षितता निर्माण झाली. स्वतः आटोकाट श्रम करूनही त्याचे फळ आपल्या पदरात पडेल अशी कोणालाही शाश्वती वाटेनाशी झाली. परिस्थितीवर मात करण्याची जिद्द उत्पन्न करणाऱ्या सामाजिक ध्येयवादाच्या अभावी जीवनातील पोकळी भरून काढण्यासाठी सुशिक्षित तरुणतरुणी आता धर्माकडे वळत आहेत. धर्माच्या बाह्य आचारात स्वतःला गुंतवून घेत आहेत. त्यांच्या धर्मश्रद्धेला मूलगामी तत्त्वविचारांची अथवा उत्कट भावनाशीलतेची जोड नाही. धर्माच्या निमित्ताने ते परिस्थितीला अगतिकतेने शरण जात आहेत. त्यांची धार्मिकता ही एकप्रकारे त्यांच्या दुबळेपणाची, पराभूत मनोवृत्तीची द्योतक आहे. मध्यमवर्गियांचा हा न्यूनगंड, ही अगतिकता हुकूमशाहीला पोषक ठरते असाच आतापर्यंतचा अनुभव आहे.

धार्मिक लोक जसे जमातवादी नसतात तसे जमातवादी होण्यासाठीही धर्मनिष्ठ असण्याची आवश्यकता नसते. बॅ. जीना हे वेगळ्या मुस्लीम राष्ट्राचा आग्रह धरणाऱ्या मुस्लीम लीगचे एक अग्रगण्य पुढारी होते. पण ते प्रार्थनेसाठी मशिदीत जात नसत. कोणतेही धार्मिक आचार पाळीत नसत. त्यांची राहाणी पाश्चात्य पद्धतीची होती. परधर्मीय स्त्रीशी त्यांनी विवाह केलेला होता. सर्व मुसलमानांना एकत्र आणून त्यांच्या राजकीय हिताचे संरक्षण करणे एवढेच त्यांनी आपल्या जीवनाचे ध्येय मानले होते.

बॅ. सावरकर हे हिंदू राष्ट्राचे प्रणेते होते. पण तेही महात्मा गांधीप्रमाणे धार्मिक वृत्तीचे नव्हते. सावरकर विज्ञाननिष्ठ होते असे त्यांचे अनुयायी अभिमानाने सांगत असतात. गाय हा एक उपयुक्त पशू आहे असेच ते मानीत असत. मात्र सृष्टीविज्ञान हे नेहमी नीतिनिरपेक्ष असते. हिटलर हे ही विज्ञाननिष्ठ होते. ॲटम बॉम्ब तयार करण्याचा पहिला मान जर्मनीला मिळावा म्हणून त्यांनी आटोकाट प्रयत्न केले. विज्ञान ही केवळ एक शक्ती आहे. तिचा वापर कोणत्या उद्दिष्टांच्या परिपूर्तीसाठी केला जातो हाच खरा प्रश्न आहे. हिटलर हे विज्ञाननिष्ठ असूनही त्यांनी साठ लक्ष निरपराध ज्यूंची कत्तल केली. बुद्ध, ख्रिस्ती यांच्या सारखे जे श्रेष्ठ धर्मपुरुष होऊन गेले, त्यांनी धर्म आणि नीती यांचे अभिन्नत्त्व प्रतिपादन केले. सदाचार, परोपकार, करुणा समानता यांचा त्यांनी पुरस्कार केला. या महापुरुषाची खऱ्या धर्माची कसोटी लावली तर आपल्या धर्मातील लोकांच्या गटस्वार्थाला आवाहन करून इतर धर्मातील निरपराध लोकांचा द्वेष करण्यास चिथावणी देणारे जमातवादी धर्मविरोधीच आहेत असे म्हणावे लागेल.

सामाजिक सुधारणेला विरोध

मध्ययुगातील सामाजिक विचारात राजनिष्ठा, जातिनिष्ठा कुटुंबनिष्ठा यांना महत्त्व होते. आधुनिक युगाचा उदय झाल्यावर ज्या सामाजिक शास्त्रांची प्रगती झाली त्यांनी व्यक्ती हे एक स्वतंत्र मूल्य आहे. प्रत्येक व्यक्ती स्वयंसिद्ध आहे आणि सर्व व्यक्तींचे सुख हेच समाजव्यवस्थेचे प्रयोजन आहे हे गृहीत धरले. ही व्यक्तिवादी विचारसरणी भांडवलशाहीला पोषक होती म्हणून भांडवल-शाहीच्या यशानंतर विद्यापीठांमधून या ज्ञानाला प्रतिष्ठा मिळाली. जमातवादी या ज्ञानाचा वापर करीत नाहीत असे नाही. पण व्यक्ती हे एक स्वतंत्र मूल्य आहे हे पत्करण्याची त्यांची तयारी नसते. प्रत्येक माणूस हा कोणत्या तरी जमातीचा अविभाज्य घटक आहे आणि त्या जमातीतील कोणाही माणसाने एखादी आगळीक केली असेल तर तिची जबाबदारी त्या जमातीवर आहे असे ते धरून चालतात. व्यक्तीचे हक्क व जबाबदाऱ्या यांचा विचार करण्याच्या भानगडीत ते पडत नाहीत. त्यांचे आवाहन बुद्धीऐवजी भावनेला असते. म्हणून पूर्वग्रहरहित वस्तुनिष्ठ पद्धतीने कोणत्याही सामाजिक प्रश्नांचा सांगोपांग अभ्यास करण्याची ते शिकवण देत नाहीत. त्यामुळे जमातवादी विचारसरणी सामाजिक विज्ञानाच्या विकासाला उपकारक ठरत नाही.

धर्मरक्षणाचा आव आणणाऱ्या जमातवाद्यांना जुन्या रुढी व परंपरागत

आचार यांचे रक्षण करणे आवश्यक वाटते. म्हणून आपल्या धर्मातील सामाजिक सुधारणांना त्यांचा विरोध असतो. शासनाने एखादी अन्याय रुढी बदलण्याचा प्रयत्न केल्यास शासन आमच्या धर्मात हस्तक्षेप करीत आहे असा त्यांच्याकडून आरडाओरडा सुरू होतो. मुस्लीम वैयक्तिक कायद्यात सुधारणा घडवून आणण्यास मुस्लीम जातीयवाद्यांनी संघटित विरोध केला हे सर्वांना माहीत आहे. परंतु ज्या हिंदुत्ववादी संघटना समान नागरी कायद्याचा पुरस्कार करतात त्यांनाही स्त्रियांच्या हक्कांबद्दल तळमळ लागलेली असते असे नाही. बाबासाहेब आंबेडकरांनी जे हिंदू कोड विधेयक तयार केलेले होते. ते काँग्रेसअंतर्गत व काँग्रेस बाहेरील सनातन हिंदूंच्या विरोधामुळे त्यांना कायदे- मंडळात पुढे रेटता आले नाही. हिंदू धर्मात पुत्रप्राप्तीला फार महत्त्व आहे. तेव्हा पहिली पत्नी निपुत्रिक असल्यास पतीला दुसरे लग्न करण्याची कायद्याने मुभा असली पाहिजे. तशी ती न दिल्यास शासनाचा हिंदूंच्या धर्मात हस्तक्षेप होतो अशीच द्विभार्याप्रतिबंधक कायद्याच्या बाबतीत त्यांची भूमिका होती.

स्वातंत्र्यानंतर आपल्या देशात लोकशाहीची स्थापना झाली. लोकशाही ही केवळ एक राज्यपद्धती नव्हे. ती एक स्वतंत्र अशी जीवनसरणी आहे. माणूस हा एक बुद्धिनिष्ठ प्राणी आहे. समाजाचे हित कशात आहे याचा तो स्वतः किंवा त्याने निवडून दिलेला प्रतिनिधी स्वतंत्रपणे विचार करून निर्णय घेऊ शकतो, म्हणून देशातील कायदे आणि समाजव्यवहाराचे नियम लोकप्रतिनिधींनी चर्चेतून परस्परांशी विचारविनिमय करून ठरविणेच श्रेयस्कर होय असे लोकशाहीच्या प्रणेत्यांचे प्रतिपादन होते. धार्मिक नियम हे धर्मशास्त्रांनी घालून दिलेले असतात. ते सनातन व अपरिवर्तनीय मानले गेल्याने ह्यांच्या बाबतीत चर्चेला वाव नसतो. म्हणून जमातवादाला लोकशाहीचे वावडे असते. बहुतेक जमातवादी संघटना एक चालकानुवर्तित्त्वाच्या तत्त्वानुसार चालतात. नेत्यांची आज्ञा निमूटपणे पाळण्याची ते अनुयायांना शिकवण देतात. त्यांचा स्वाभाविक कल हुकूमशाहीकडे असतो. सामाजिक तंटे समझोत्याने व परस्पर सामंजस्याने सोडविण्याऐवजी हिंसेचा वापर करणे ते पसंत करतात.

धार्मिक अस्मिता आणि राष्ट्रवाद

जमातवाद हा धर्म, सामाजिक सुधारणा आणि लोकशाही यांच्याच केवळ विरोधी असतो असे नव्हे. राष्ट्रवादालाही तो विघातकच असतो. अल्पसंख्यांचा जमातवाद हा बहुसंख्यांकाबद्दल त्यांना वाटणाऱ्या भीतीतून निर्माण होतो. आपली सांस्कृतिक अस्मिता टिकवून धरण्याची मुस्लीम, शीख किंवा ख्रिस्ती अल्पसंख्यांची

इच्छा स्वाभाविक आहे. भारतीय संविधानाने प्रत्येक धार्मिक व भाषिक गटाला त्याची वेगळी सांस्कृतिक परंपरा जपण्याचे स्वातंत्र्य दिलेले आहे. कोणत्याही गटाच्या जीवनसरणीचा आविष्कार त्याचे खाणेपिणे, पेहराव, साहित्य, कला, वास्तुशिल्प यामधून होतो. अकबराची महसूलपद्धती, वास्तुशिल्प, मोगल चित्रकला, अभिजात गायन व वाद्यवादन, उर्दु साहित्य या सर्व क्षेत्रात मुसलमानांनी भारतीय संस्कृतीत मोलाची भर घातली आहे. मात्र धर्माच्या नावाने कालबाह्य रुढींना चिकटून राहाण्याची वृत्ती संस्कृतीच्या विकासाला नेहमी बाधक ठरते. युरोपातील ज्या राष्ट्रांनी नव्या धर्मकल्पनांचा व नीतिमूल्यांचा निस्संकोचपणे स्वीकार केला त्यांची आर्थिक व सांस्कृतिक भरभराट झाली. जगातील अनेक देशात त्यांनी आपली साम्राज्येही स्थापन केली. उलट एका काळी भरभराटीस आलेली इराण व इराक सारखी राष्ट्रे तेलाचा पैसा मिळूनही जुन्या सामाजिक चौकटीतून बाहेर पडू न शकल्याने अद्याप मागासलेलीच राहिली आहेत. आधुनिक नीतिमूल्यांना अनुसरून धर्माचा नवा अर्थ लावण्यात मुसलमान विचारवंतांना आलेले अपयश हे मुसलमान समाजाच्या मागासलेपणाचे एक प्रमुख कारण आहे. मुसलमानांमध्ये पूर्णपणे इहवादी व समाजवादी विचारवंत नाहीत असे नाही. परंतु ते व सामान्य अशिक्षित मुसलमान यांच्यामध्ये सांस्कृतिक दृष्टचा फार मोठी दरी आहे. राजा राम मोहन राय, केशवचंद्र सेन, न्या. रानडे, महात्मा गांधी इत्यादी नेत्यांनी हिंदू धर्मातील जुन्या संकल्पनांचा नव्या नीतिमूल्यांना अनुसरून काळाशी सुसंगत असा वेगळा अर्थ लावला. त्यामुळे राष्ट्रीय चळवळीतील कार्यकर्त्यांना जीवनाकडे पाहाण्याची एक नवी दृष्टी मिळाली आणि त्यामधून भारतीय लोकशाहीची पार्श्वभूमी तयार झाली. मात्र भारतातील बहुसंख्य हिंदू धार्मिक विचारांच्या चौकटीतून बाहेर पडले आहेत असे म्हणता येत नाही.

महात्मा गांधीपासून स्फूर्ती घेऊन मौलाना आझाद यांनी कुराणे शरीफचा राष्ट्रवादाशी सुसंगत असा नवा अर्थ लावला. परंतु, आझाद हे गांधीप्रमाणे लोकनेते नव्हते. शिवाय हिंदू किंवा मुस्लीम जमातवादाला उघडपणे विरोध करण्याची भूमिका येथील राष्ट्रीय नेत्यांनी घेतली नाही. अनेक हिंदू जमातवादी उघडपणे राष्ट्रीय सभेच्या व्यासपीठावर वावरत होते. ब्रिटिशांविरूद्ध सर्व जमातींची संघटित आघाडी उभी करता यावी या हेतून मुस्लीम जमातवाद्यांशी तडजोड करण्याचीच राष्ट्रसभेच्या नेत्यांची खटपट चालली होती. त्यामुळे जमातवादी हेच मुसलमानांच्या हिताचे खरे रक्षणकर्ते आहेत असा सामान्य

लोकांचा समज होऊन राष्ट्रीय मुसलमानांना त्यांच्या जमातीत मान मिळाला नाही. मुसलमानांची बहुसंख्या असलेले देश अद्याप सरंजामदारी युगातच आहेत. मुसलमानांच्या धर्मकल्पनेचा स्वाभाविक विकास घडवून लोकशाहीशी सुसंगत पद्धतीने तिची मांडणी करण्याचे कार्य तेथील विचारवंतांनी पार पाडलेले नाही मुसलमान अल्पसंख्य असलेल्या देशात ते काम अधिक अवघड आहे. मात्र ते झाल्याशिवाय मुसलमान समाजाची कधीच प्रगती होणार नाही. जुन्या धार्मिक परंपरेतून मुक्त होऊन मुसलमान समाज एकदम इहवादाचा स्वीकार करील अशी मुळीच शक्यता नाही. म्हणून लोकांच्या धार्मिक भावानंना धक्का लागू न देता जुन्या परंपरेला नवे वळण देणाऱ्या विचारवंतांची आज फार गरज आहे.

हिंदुत्त्व आणि भारतीयत्त्व

अल्पसंख्यांकांचा जमातवाद फुटीरपणाकडे नेत असल्याने तो राष्ट्रविरोधी आहे असा सहज प्रचार करता येतो. पण हिंदूंचा जमातवादही राष्ट्रहिताला तितकाच विघातक आहे. आम्ही बहुसंख्य असल्याने आम्हीच या देशाचे खरे नागरिक आहोत, इतरांनी आमची मर्जी सांभाळून इथे राहावे असे हिंदू जमातवाद्यांना वाटत असते. अल्पसंख्याकांचे भारतीयीकरण करण्याच्या गोष्टी बोलल्या जातात त्यांचाही अर्थ हाच होतो. आक्रमक हिंदुत्त्ववाद्यांची वक्तव्ये आणि कारवाया यामुळे अल्पसंख्यांकांमध्ये असुरक्षिततेची भावना पसरते. त्यामधून त्या धर्मातील पुरोहितांचे व सनातन्यांचे त्यांच्यावरील दडपण वाढत जाते. स्वतःच्या बळावर निवडणुका जिंकण्याची अल्पसंख्यांकांमध्ये ताकद नसल्याने ते हिंसेचा मार्ग अवलंबितील अशी भीती निर्माण होते. त्यांना दडपण्यासाठी अधिकाधिक प्रमाणात दंडसत्तेचा वापर करणे शासनाला भाग पडते. आणि हुकूमशाही प्रवृत्ती बळावत जातात.

हिंदूंची बहुसंख्या आणि त्यांच्यातील सांस्कृतिक ऐक्य यांनी भारतीय राष्ट्रीयत्त्वाचा पाया रचला आहे हे नाकारता येणार नाही. पण इतर धर्मांचे लोकही शेकडो वर्षे या देशात वास्तव्य करून होते आणि त्यांनीही या संस्कृतीत मोलाची भर घातली आहे. युरोपातील बहुतेक राष्ट्रे एक धर्मी व एक भाषी आहेत. भारतीय राष्ट्रियत्त्वाची घडण यूरोपातील राष्ट्रांहून वेगळ्या पद्धतीने झालेली आहे. इंग्रजांनी सर्व भारत जिंकून आपले एकछत्री साम्राज्य येथे निर्माण केले. राज्यकारभाराच्या सोयीसाठी त्यांनी या देशाचे लष्करी, शासकीय व आर्थिक एकत्रीकरण केले. इंग्रजी भाषेच्या माध्यमातून सुशिक्षितांमध्ये समान मूल्यांचा प्रसार झाला; अखिल भारतीय स्वरूपाचा भांडवलदार वर्ग निर्माण

झाला आणि इंग्रजांविरूद्ध चाललेल्या स्वातंत्र्यलढ्यामधून येथील राष्ट्रीयत्त्वाच्या कल्पनेचा विकास झाला. पाकिस्तानची निर्मिती झाल्यानंतरही भारतात निरनिराळ्या धर्मांचे अल्पसंख्याक मोठ्या प्रमाणावर आहेत. मात्र राष्ट्र म्हणजे निरनिराळ्या धार्मिक गटांची केवळ गोळाबेरीज नव्हे. राष्ट्र या संकल्पनेत देशातील लोकांमधील एकतेची भावना आणि इतरांपासूनच्या वेगळेपणाची जाणीव या दोन्हींना सारखेच महत्त्व आहे. एका उपखंडाच्या आकाराच्या आणि प्रचंड लोकसंख्येच्या या देशात सर्व समूहांचे खाणेपिणे, पोषाख, चालीरीती स्वभावधर्म एकसारखे असतील हे संभवनीय नाही. विविधतेतून एकता असेच पूर्वीपासून आपल्या संस्कृतीचे स्वरूप राहिले आहे. राष्ट्रीय काँग्रेसच्या नेत्यांनीही विविधतेला वाव देणाऱ्या अशाच सांस्कृतिक ऐक्याचा पुरस्कार केला आहे. गुजरात विद्यापीठाच्या उद्घाटनप्रसंगी महात्माजींनी काढलेले उद्गार त्यांचा राष्ट्रीयत्त्वाबद्दलचा दृष्टिकोण स्पष्ट करतात. गांधीची म्हणतात "प्राचीन संस्कृतीचे पुनरुज्जीवन नव्हे तर जुन्या परंपरांच्या पायावर नंतरच्या काळातील अनुभवांनी संपन्न झालेली अशी नवी संस्कृती बनविणे हे आपले उद्दिष्ट असले पाहिजे. भारतात येऊन स्थायिक झालेल्या, येथील जीवनावर ज्यांचा प्रभाव पडला आहे आणि येथील मातीचा वास ज्यांना लाभला आहे. अशा निरनिराळ्या संस्कृतींचा संगम घडवून आणण्याची उमेद आपण बाळगली पाहिजे. हा संगम स्वदेशी पद्धतीचा असेल. त्यात प्रत्येक संस्कृतीचे विशिष्ट स्थान शिल्लक राहील. अमेरिकेपणे एका संस्कृतीने इतरांवर आधिपत्य गाजविणे ही आपली परंपरा नाही." अल्पसंख्य आपल्या संकुचित अस्मितेतून बाहेर पडून राष्ट्रीय संस्कृतीत मिसळून जाण्यास तयार होतील आणि बहुसंख्य त्यांना बाह्य गोष्टीतील त्यांचे वेगळेपण कायम राखण्यास संमती देऊन त्यांना आपल्यात समाविष्ट करून घेतील तेव्हाच भारतीय राष्ट्रीयत्त्वाचा पाया बळकट होईल.

इतिहासाचा विपर्यास

मुसलमान हे अल्पसंख्य असल्याने बहुसंख्य अशा हिंदूंपासून त्यांचा धर्म व संस्कृती यांना धोका आहे अशी त्यांच्या मनात भीती निर्माण करण्यावर मुसलमान जमातवाद्यांचा भर असतो. हिंदू बहुसंख्य असल्यामुळे हिंदूंना मुसलमानांपासून धोका आहे असे त्यांना पटवून देणे तितकेसे सोपे नसते. तेव्हा जमातीय दृष्टीकोनातून इतिहासाची शिकवण हे, हिंदू जमातवाद्यांनी आपल्या प्रचाराचे मुख्य साधन बनविले आहे. हिंदू जमातवादी दृष्टीकोनातून प्राचीन काळ हा भारताच्या सर्वांगीण भरभराटीचा काळ ठरतो. मुसलमानांच्या आगमनानंतर

ऱ्हासाला सुरवात होते. बहुतेक हिंदू राजे सद्वर्तनी, धर्मरक्षक, प्रजाहितदक्ष असतात. मुसलमान राजांचे वर्णन क्रूर, धर्मांध, लुटारु, स्त्रीलंपट असे केले जाते. प्राचीन काळात निरनिराळ्या गटांमध्ये किती सलोखा व परस्पर सामंजस्य होते हे दाखविण्यासाठी श्रमविभागाच्या तत्त्वावर जातिसंस्थेचे समर्थन करण्यात येते. हिंदू राजे राज्यविस्तार अथवा सत्ता यांऐवजी केवळ धर्मरक्षणासाठी मुसलमानांविरूद्ध लढले असा खोटा समज करून देण्यात येतो. राणा प्रताप व शिवाजी राजे राष्ट्रपुरुष म्हणून गोरविले जातात आणि शेरशहा व अकबर यांना अनुल्लेखाची शिक्षा मिळते. हा विकृत इतिहास केवळ पाठ्यपुस्तकांतूनच नव्हे तर कथा, कादंबऱ्या आणि पोवाडे यांच्यामधून अतिरंजित स्वरूपात लोकांपुढे मांडला जाता. शिक्षणाच्या प्रसाराबरोबर कनिष्ठ जातींतील विद्यार्थ्यांवरही त्याचे संस्कार होतात आणि त्यांच्या जमातवादाला पुष्टी मिळते.

वास्तविक पाहाता दिल्लीतील राजघराण्यांच्या धर्मावरून भारताच्या इतिहासाची हिंदू, मुसलमान व ब्रिटिश या तीन कालखंडात विभागणी प्रथम इंग्रज इतिहासकारांनी केली. भारतातील मुसलमान राजेही आपल्यासारखेच परकीय होते. सर्व मुसलमान सत्ताधारी व हिंदू शोषित होते. मुसलमानांच्या राज्यांत हिंदूंचा छळ झाला; आणि इंग्रजांनी या छळापासून त्यांची सुटका केली असे लोकांच्या मनावर बिंबवून इंग्रजी राजवटीचे समर्थन करण्याचा त्यांचा हेतू होता. हिंदू पुनरुज्जीवनवाद्यांनी हा सिद्धान्त उचलून धरला. इतिहासातील एखाद्या मुस्लीम राजाचे क्रौर्य हा त्याचा वैयक्तिक स्वभावविशेष नसून तो मुसलमान धर्माचाच परिपाक आहे असे त्यांनी गृहीत धरले. साहजिकच असे धर्मांध राजे मुस्लीम धर्मरक्षक असून त्यांच्या कृतींचे समर्थन करण्याची जबाबदारी आपल्यावर आहे अशी मुस्लीम इतिहासकारांनी स्वतःची समजूत करून घेतली. दोन्ही जमातींच्या शिक्षणसंस्थांमधून विद्यार्थ्यांना असा परस्परविरोधी इतिहास शिकविला गेल्यावर त्यांच्यामध्ये परस्परांबद्दल अविश्वास निर्माण झाला तर त्यांत आश्चर्य नाही.

राजघराण्यांच्या धर्मावरून इतिहासाच्या कालखंडांची अशी विभागणी करणे मुळीच शास्त्रशुद्ध नाही. शिवाय प्राचीन काळी भारताची फार मोठी भरभराट झाली होती आणि मोगल अमदानीत राष्ट्रीय उत्पन्न, व्यापार, कला, साहित्य या सर्व क्षेत्रात भारताची अधोगती झाली असे म्हणण्याला कोणताही पुरावा नाही. सर्व हिंदू एका बाजूला व सर्व मुसलमान विरूद्ध बाजूला अशा लढाया झाल्याचे ऐतिहासिक कागदपत्रांवरून सिद्ध होत नाही. तथाकथित

मुसलमान कालखंडातही अनेक हिंदू राजे, सरंजामदार, जमीनदार भारतात अस्तित्वात होते आणि बहुसंख्य हिंदूंप्रमाणे बहुसंख्य मुसलमान ही शेतकरी आणि कारागीरच होते. दोन्ही धर्मातील राजांच्या राज्यपद्धती शेतकरी कारागिरांच्या शोषणावरच अधिष्ठित होत्या. हिंदू राजे आणि सरदार यांचे कनिष्ठ जातीतील हिंदूंपेक्षा वरिष्ठ वर्गातील मुसलमानांशीच अधिक निकटचे संबंध होते. म्हणून शेकडो वर्षाच्या काळात सर्व मुसलमानांनी सर्व हिंदूंचा छळ केला असे अनुमान काढणे हे ऐतिहासिक सत्याला धरून नाही. सर्व मुसलमानांना राज्यसत्तेची परंपरा असल्यामुळे त्यांना स्वतंत्र भारतातही राज्यसत्तेत हिंदूंच्या प्रमाणात अधिक वाटा मिळाला पाहिजे ही मुस्लीम जमातवाद्यांची मागणी ही इतिहासाच्या अशा विपरीत अर्थावर आधारलेली होती.

मुसलमानांनी हिंदू मंदिरांचा विध्वंस केला हे हिंदू जमातवाद्यांच्या प्रचाराचे पालुपद असते. गझनीच्या महंमदाने शेकडो वर्षांपूर्वी काठेवाडातील सोमनाथ मंदिर लुटले याबद्दलचा द्वेष अजूनही लहान मुलांच्या मनांत भरविला जातो. भारतातील मंदिरामध्ये संपत्तीचे केंद्रीकरण झाल्याने लुटारुंना त्यांनी आकर्षून घेतले त्यात काहीच आश्चर्य नाही. लढाईच्या काळात काही मंदिरे लुटली गेली हे ही खरे आहे. मराठ्यांनीही त्यांच्या स्वाऱ्यांमध्ये दक्षिणेतील काही मंदिरे लुटल्याची नोंद आहे. परंतु लढाई संपल्यावर येथील निरनिराळ्या धर्मांच्या राजांनी मंदिरांना अभयदान दिले व त्यांची इनामे चालू ठेवली. औरंगजेबाने मात्र जाणूनबुजून काही तीर्थक्षेत्रांची मोडतोड केली. त्याचा हा धर्मवेडेपणा मोगल साम्राज्याच्या ऱ्हासाला कारणीभूत झाला असाच बहुतेक इतिहासकारांचा निष्कर्ष आहे. परंतु इतर मुसलमान बादशहांनी हिंदू प्रजेच्या धर्मात हस्तक्षेप केला नाही. दक्षिणेतील बहामनी व त्यानंतरचे आदिलशहा, निझामशहा वगैरे राजे धर्मांतरित हिंदू होते. त्यांच्या कारकीर्दीत विजापूरच्या जवळच पंढरपूर क्षेत्री एकादशीची यात्रा वर्षानुवर्षे निर्विघ्नपणे चालू होती. तेव्हा सर्वच मुसलमान सुलतानांवर धर्मच्छळाचा आरोप करणे अन्यायाचे होईल.

मुसलमानांवरील आरोप

मुसलमानांवरील आणखी एक आरोप म्हणजे त्यांनी अनेक हिंदू स्त्रिया पळवून नेल्या, त्यांना भ्रष्ट केले आणि आपल्या जनानखान्यात सामील करून घेतले हा होय. कुठल्याही पुरुषाने स्त्रीवर अत्याचार करणे किंवा तिच्या इच्छेविरूद्ध तिला आपल्या उपभोगाचे साधन बनविणे हे अत्यंत निंद्य कृत्य होय यांत मुळीच शंका नाही. परंतु हिंदू राजे आणि जमीनदार यांनीही स्त्रियांवर

काही कमी अत्याचार केलेले नाहीत. उत्तरेकडील जमीनदारी प्रदेशात कुळाच्या कुटुंबातील नववधूला पहिल्या रात्री जमीनदाराच्या सेवेला पाठविण्याची प्रथा विसाव्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत चालू होती. जगातील सर्व देशातील जमीनदारांनी सरंजमादारी युगामध्ये स्त्रियांवर अशाच प्रकारचे अत्याचार केलेले आहेत. आजही कित्येक ठिकाणी ते चालू आहेत. म्हणून हिंदू वरिष्ठ वर्गांच्या वर्तनाकडे काणाडोळा करून केवळ मुसलमानांना दोष देणे हे जमातवादी मनोवृत्तीचे द्योतक आहे.

मुसलमानांनी प्रादेशिक संस्कृतीला काही योगदान केलेले नाही अशी तक्रार पुष्कळदा ऐकू येते. परंतु ती अज्ञानावर आधारित आहे. महाराष्ट्रात वारकरी संप्रदायाचा उगम झाल्यावर मुसलमान धर्मातील सूफी पंथ आणि विठ्ठलसंप्रदाय यांचा समन्वय करण्याचा शहा मुंतोजी ब्रम्हणी, हुसेन अंबरखान, शेख महंमद इत्यादी अनेक मुसलमान संतांनी प्रयत्न केला. शहा मुंतोजी ब्रम्हणी उर्फ मृत्युंजय हे बेदरच्या राजघराण्यात जन्माला आले होते. पुढे ते कल्याणीच्या सहजानंद स्वामींचा शिष्य बनून ज्ञानसागरानंद म्हणून प्रसिद्धी पावले त्यांनी मराठीत परमार्थावर अनेक ग्रंथ लिहिले आहे. सतराव्या शतकातील हुसेन अंबरखान यांनी मराठीत गीतेवर समश्लोकी टीका लिहिली. संगीत साहित्य शिरोमणीखलजी वंशीय मुंतोजी यांनी संगीत मकरंदावर ओवीबद्ध टीका लिहून मराठीतील संगीतविषयक साहित्यात मोलाची भर घातली. विजयभैरव नांवाचा ज्योतिषविषयक ग्रंथही त्यांनी लिहिला आहे. शाहिरी वाङमयात सगनभाऊंचे नाव अजरामर ठरले आहे.

मध्ययुगाच्या तुलनेने आधुनिक काळात मुसलमानांमध्ये प्रथितयश साहित्यिक कमी आढळतात हे खरे. पण त्याचे कारण मुसलमानांमधील आधुनिक शिक्षणाचा अभाव हे होय. स्वातंत्र्यपूर्वकाळात महाराष्ट्रात शिक्षणाचा प्रसार ब्राम्हण कायस्थ इत्यादी वरिष्ठ जातींपुरताच मर्यादित होता. त्यामुळे त्याच जातींतून अनेक ललित व ललितेतर मराठी लेखक पुढे आले. हळुहळू शिक्षणाचे लोण ब्राम्हणेत्तर व दलित जातींपर्यंत जाऊन पोहोचले आणि त्यांच्यामधील अनेक सुशिक्षितांनी साहित्याच्या क्षेत्रात प्रवेश केला. मुसलमानांमधूनही अमरशेख यांच्यासारखे शाहीर लोकमानसावर प्रभाव पाडून गेले.

संस्कृतीमध्ये साहित्याबरोबर संगीत, चित्रकला, नाटच, क्रीडा यांचाही समावेश होतो. महाराष्ट्रापुरता विचार केला तर अभिजात संगीत आणि वाद्यवादन यांत लताफत हुसेन खान, बिस्मिला खान, अलारखा, डागर बंधू हे

आज अग्रस्थानी आहेत. नाट्याच्या क्षेत्रात नासिरुद्दिन शहा, फैयाज, जब्बार पटेल, यांनी नाव कमावले आहेत. सिनेकलावंतामध्ये त्यांची संख्या मुळीच कमी नाही. जमातवाद्यांना त्यांची आठवण राहात नसेल तर तो या कलावंतांचा दोष नाही.

जमातवाद्यांचा विचार तदन् खोटा असला तरी त्याचा प्रचार मात्र फार मोठ्या प्रमाणावर सुरु आहे. महाराष्ट्रातील सांस्कृतिक क्षेत्रात पूर्वीपासून उच्चवर्णीयच आघाडीवर होते. त्यामुळे वृत्तपत्रे, नियतकालिके, आकाशवाणी, दूरदर्शन यांच्यावर अद्याप त्यांचेच वर्चस्व आहे. टिळकांच्या काळापासून महाराष्ट्रातील उच्चवर्णीय सुशिक्षितांनी पुनरुज्जीवनवादाचाच पुरस्कार केलेला आहे. गांधीवाद्यांना पुस्तकी ज्ञानाचे कधीच महत्त्व वाटले नाही. त्यामुळे वैचारिक क्षेत्राची त्यांनी उपेक्षाच केली. नेमस्त पक्षाचा महाराष्ट्राच्या राजकारणातून लोप झाल्यानंतर इहवादी वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून सामाजिक प्रश्नांचा अभ्यास करण्याची परंपरा नष्ट झाली. महाराष्ट्रातील समाजवाद्यांनी आगरकरांपासून स्फूर्ती घेतली होती. परंतु परंपरागत हिंदू धर्माबद्दल त्यांना कधीही स्पष्ट भूमिका घेता आली नाही. कम्युनिस्टांनी कामगार चळवळीत आपले सर्वस्व ओतून वैचारिक बाबतीत परकीयांची उसनवारी करण्यावर समाधान मानले. साहजिकच जमातवाद्यांना सांस्कृतिक क्षेत्रात मोकळे रान मिळाले. आज मराठी वृत्तपत्रांच्या संपादक मंडळांवर पूर्णपणे इहवादी दृष्टिकोन असणारे अभ्यासू संपादक अपवादानेच आढळतील. शिवाय जमातवादी शक्तींचे सामर्थ्य वाढल्याने त्यांचा रोष ओढवून घेणे धोक्याचे वाटते. त्यामुळे बहुसंख्य मराठी वृत्तपत्रांतून उघड किंवा अप्रत्यक्ष पद्धतीने हिंदू जमातवादाचे समर्थन केलेले दिसून येते. बहुसंख्य उर्दू वृत्तपत्रे मुस्लीम जमातवाद्यांच्या हाती आहेत. त्यामुळे दोन्ही भाषांमधील वृत्तपत्रीय लेखनातून जमातवादाला उत्तेजन मिळत आहे.

जातीय दंगे

जातीय तणाव वाढत गेले की त्यामधून अनेकदा स्वाभाविकपणेच जातीय दंग्यांच्या स्फोट होतो. परंतु सध्याच्या परिस्थितीत शासनावर दडपण आणून आपल्या मागण्या पुऱ्या करून घेण्याचे आणि निवडणुकीत मते मिळविण्याचे एक हमखास साधन म्हणूनही जमातवाद्यांकडून दंग्यांचा हेतूपूर्वक वापर करण्यात येत आहे. एखादी गाय कापून तिचे मांस देवळात टाकणे अथवा डुकराचे अवयव कापून मशिदीत टाकणे हा दंगा सुरु करण्याचा खात्रीचा उपाय होय. एकदा दंग्याला सुरुवात झाली की विरोधी जमातीच्या लोकांनीच हे कृत्य केले असले

पाहिजे असे गृहित धरण्यात येते. गुन्हेगाराला शोधून काढण्याचे प्रयत्न होत नाहीत. दंगा सुरु झाला की विरोधी जमातीच्या दुष्कृत्याच्या अफवा पसरविल्या जातात. लोकांच्या भावना उत्तेजित केल्या गेल्याने या अफवांची शहानिशा करण्याची कोणाची मनस्थिती नसते. दोन्ही जमातींच्या लोकांमध्ये समझोता करू पाहाणारे लोक जमातद्रोही मानले जातात आणि असुरक्षिततेच्या भावनेतून समान्य लोक जमातवाद्यांच्या आश्रयाला जातात.

धार्मिक स्थळांवरून तंटे उकरून काढण्याचे नवे धोरण जमातवाद्यांनी आता अवलंबिले आहे. शेकडो वर्षांच्या मुस्लीम राजवटीत काही हिंदू देवळांच्या ठिकाणी काही मशिदी उभारल्या गेल्या असण्याची शक्यता आहे. अशी मंदिरे 'मुक्त' करण्याची भाषा जमातवादी बोलत आहेत. प्रत्यक्षात काही ठिकाणी पडक्या देवळांचे दगड मशिदींसाठी वापरले गेले असतील. काही ठिकाणी संबंध जातीने किंवा उपजातीने धर्मांतर केले असल्याने आपल्या मंदिरांच्या त्यांनी मशिदी बनविल्या असतील. प्रत्यक्षात प्रत्येक ठिकाणी काय घडले याचा इतिहास आज उपलब्ध नाही. पण गेली कित्येक वर्षे काही स्थळे मुसलमानांची प्रार्थनामंदिरे म्हणून वापरली जात असतील तर त्यांच्या वहिवाटीचा हक्क आपण मान्य केला पाहिजे. हिंदूंनी त्यांच्या भावनांची कदर केली पाहिजे. लॉर्ड कॉर्नवालीस यांनी कुळांना वंचित करून जमीनदारांना बहाल केलेला मालकी हक्क आजच्या समाजात उलथापालथ नको म्हणून आपण मान्य केला. उत्तरेत राम-जन्मभूमी व बाबरी मशीद प्रकरणी जो वाद निर्माण झाला आहे त्याने तेथील सामाजिक वातावरण अत्यंत दूषित झालेले आहे. आता तर मुसलमानांच्या ताब्यात असलेली अशी तीनशे स्थळे मुक्त करण्यासाठी चळवळ करण्याची घोषणा काही जमातवादी संघटनांनी केलेली आहे. हे दंगे करण्यासाठी केलेले उघड आवाहन होय. उत्तर प्रदेशाचे राज्य शासन आणि केंद्रशासन ही दोन्हीही या बाबतीत काही खंबीर भूमिका घेत नसल्याने राम-जन्मभूमी बाबरीमशिद वाद चिघळत चाललेला आहे. शासनाने या प्रश्नाची गंभीर दखल घेऊन हा प्रश्न काही तत्त्वांना अनुसरून समझोत्याने सोडविला नाही तर देशभर आगीचा डोंब उसळण्यास वेळ लागणार नाही.

मुसलमानांच्या काही मशिदी व दर्गे सध्या पुरावस्तुसंशोधन खात्याकडे आहेत. रोजच्या प्रार्थनेसाठी त्या आपल्या ताब्यात देण्यात याव्यात अशी मुस्लीम जमातवाद्यांची मागणी आहे. या सर्व वास्तु त्यांचे ऐतिहासिक महत्त्व ध्यानात घेऊन जतन करण्यासाठी शासनाने आपल्या ताब्यात घेतल्या आहेत. तेव्हा

धार्मिक विधीसाठी त्या परत करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. हिंदू जमातवाद्यांच्या मागणी प्रमाणे मुस्लीम जमावाद्यांच्या अशा मागण्याही मुळातच खुडून टाकणे आवश्यक आहे.

दंग्यांमधील क्रूरताही वाढत चालली आहे. पूर्वी सुरामारीचे अनेक प्रकार घडत. आता लोकांना जिवंत जाळल्याच्या बातम्या ऐकू येतात. पूर्वी मुस्लीम व हिंदू वस्त्यांच्या सीमा रेषेवर दंगे घडून येत. आता हिंदू मध्यम वर्गीय वस्तीत राहाणाऱ्या मुसलमान कुटुंबावर किंवा मुस्लीम वस्तीतील एकटच्या हिंदू कुटुंबावर हल्ला करून दोन्ही जमातींची पूर्ण फारकत करण्याचे प्रयत्न चालू आहेत. परंतु या जातीय दंग्यांचा सर्वात भयानक पैलू म्हणजे पोलीस दलाचे पक्षपाती वर्तन होय. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पोलीद दलातील मुसलमान व इतर अल्पसंख्य जमाती यांचे प्रमाण कमी होऊन हिंदूंची मोठ्या प्रमाणावर भरती झाली. ही भरती ज्या कनिष्ठ जातींमधून झाली त्यांच्यावर जमातवादाचा मोठा पगडा आहे. म्हणून बहुसंख्यांनी अल्पसंख्यांवर हल्ला केला तर पोलीस त्याकडे पुष्कळदा काणाडोळा करतात अथवा अल्पसंख्यांना संरक्षण देण्याऐवजी आपण हल्लेखोरांना सामील होतात. इंदिरा गांधी यांच्या खुनानंतर दिल्ली शहरात जो दंगा झाला त्यावेळी तेथील पोलीस दलाचे वर्तन अक्षम्य होते असा मिश्रा आयोगाने त्यांच्यावर ठपका ठेवला आहे. गेल्या महिन्यात मीरत येथे झालेल्या दंग्यांच्या काळात राज्य पोलीस दलाने संचार बंदी जारी असताना अल्पसंख्य जमातीच्या लोकांना घरातून बाहेर काढून त्यांच्यावर गोळ्या घातल्या असे जेष्ठ पत्रकारांनी नमूद केले आहे. ज्यांच्यावर शांतता व सुव्यवस्था यांचे रक्षण करण्याची जबाबदारी आहे तेच गुंडांप्रमाणे वर्तन करू लागले तर जातीय दंगे थांबविण्याची आशाच सोडून द्यावी लागेल.

सत्ताधारी पक्ष

जातीय पक्ष आपल्याकडे अनेक वर्षे अस्तित्त्वात असले तरी जातीय तणाव वाढू नयेत याची खबरदारी घेण्याची जबाबदारी आपल्यावर आहे अशी स्वातंत्र्यपूर्वकाळातील राष्ट्रीय काँग्रेसच्या नेत्यांची धारणा होती. इतकेच नव्हे तर जातीय दंगे थांबविण्यासाठी शासनाने हस्तक्षेप करावा अशी आपण अपेक्षा केल्यास परकीय सरकारची शक्ती वाढत जाते. लोकशाही ही एक जीवनपद्धती आहे असे आपण मानत असलो तरी आपापसातील तंटे सोडविण्यासाठी दंडसत्तेवर विसंबून न राहाता आपणच पुढे होऊन जातीजमातींमधील तंटे सामोपचाराने मिटविले पाहिजेत असे गांधींचे सांगणे होते. दंगे थांबविण्यासाठी

गांधीजींनी अनेकदा उपवास केले व ते त्यात यशस्वीही झाले. याचा अर्थ गांधीजींनी आपल्या आध्यात्मिक सामर्थ्याने दंगे थांबविले असा नाही. गांधींबद्दल लोकांच्या मनात अत्यंत प्रेमाची व आदराची भावना होती. त्यामुळे गांधींनी प्राणांतिक उपोषण सुरु केले की कार्यकर्ते जागे होत व दंगे थांबविण्यासाठी उपाय योजीत. गांधींना उपवासापासून परावृत्त करण्यासाठी जे लोक त्यांना भेटायला येत त्यांना आपापल्या वस्त्यांमध्ये जाऊन शांततासमित्या स्थापन करण्यास व त्यांच्यामार्फत दोन्ही जमातींच्या लोकांमध्ये समझोता घडवून आणण्यास ते प्रवृत्त करीत. अशा लोकांच्या परिश्रमाने दंगे आटोक्यात येत. गुंड दंगे घडवून आणतात हा युक्तिवाद गांधींना कधीच पटला नाही. गुंडांबद्दल सामान्य नागरिकांना जेव्हा सहानुभूती वाटते, त्यांच्या कृतीमधून सामान्य माणसांच्या दडपलेल्या भावना जेव्हा व्यक्त होतात तेव्हांच गुंडांना दुसऱ्या जमातीवर हल्ला करण्याची संधी मिळते. सामान्य माणसाच्या मनातील नैतिक प्रेरणा हीच जातीय दंग्यांविरोधी मोठी शक्ती आहे, परंतु संघटित प्रयत्नांच्या अभावी ती सतत कार्यरत राहात नाही.

गांधीं इतक्या सामर्थ्याचा राजकीय पुढारी आज उपलब्ध नाही हे खरे. पण धर्मनिरपेक्ष शासनाच्या तत्त्वावर उभारल्या गेलेल्या भारतीय संविधानाशी निष्ठा राखण्याची ज्यांनी शपथ घेतली आहे त्या राज्यकर्त्यांवर जातीय तणाव आटोक्यात राखण्याची सर्वात जास्त जबाबदारी आहे. जेथे शासन खंबीर असेल तेथे दंगा टाळता येऊ शकतो; अथवा सुरु झाल्यास तात्काळ थांबविता येतो. काँग्रेसची विचारसरणी आजही धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाच्या व समाजवादाच्या तत्त्वावर अधिष्ठित आहे. तरी त्या दृष्टीने कार्यकर्त्यांचे शिक्षण करण्याचे कार्य आता मागे पडले आहे. अलिकडच्या काळात सत्ताधारी पक्षात जाणारे लोक आपल्या स्वतःच्या किंवा निकटवर्तियांच्या हितसंबंधांनाच अधिक महत्त्व देतात. साहजिकच त्या त्या वर्गातील व जातीतील लोकांच्या स्वाभाविक जाणिवाच त्यांच्या वक्तव्यातून व कृतीतून प्रगट होतात. काँग्रेस पक्षाची धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाची परंपरा आणि विचारसरणी यामुळे आपले हितसंबंध या पक्षाच्या हाती सुरक्षित आहेत असा त्याच्या बद्दल अल्पसंख्यांना विश्वास वाटत होता. पण त्याचा उपयोग त्यांच्या शिक्षणासाठी व त्यांच्यामध्ये आवश्यक त्या सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी करण्याऐवजी या पक्षाच्या नेत्यांनी मुस्लीम जमातवाद्यांनाच हाताशी धरले. आता पक्षाची लोकप्रियता ओसरू लागल्यावर हिंदूंचा अनुनय करण्यासाठी हिंदू जमातवादाकडे कोणाडोळा करण्याचे किंवा

3292
24/4/85
25/4/85

काही ठिकाणी त्याला उत्तेजन देण्याचे सत्ताधारी पक्षाचे धोरण आहे.

जवाहरलाल नेहरुंच्या निधनानंतर काँग्रेस संघटनेचाही हळूहळू ऱ्हास होत गेला संघटनेतील लोकशाही नष्ट होऊन केंद्रीय नेत्यांच्या हातात सत्तेचे केंद्रीकरण झाले. राज्यपातळीवरील नेते कार्यकर्त्यांनी निवडण्याऐवजी पक्षश्रेष्ठींकडून नेमले जाऊ लागले. अशा नेत्यांना शह देण्यासाठी पक्षातील विरोधी गट पुष्कळदा जमातवादी शक्तींना पाठिंबा देतात. महाराष्ट्रातील अनेक जमातवादी संघटना सत्ताधारी पक्षातील हिंदू व मुस्लीम पुढाऱ्यांच्या छुप्या पाठिंब्यानेच आता पसरत चाललेल्या आहेत. गुजरात आणि उत्तरप्रदेश या राज्यात वारंवार होणाऱ्या दंग्यांना दुबळी राज्यशासने आणि पक्षांतर्गत दुफळीच कारणीभूत आहे हे सर्वांना माहीत आहे. शासनाने खंबीर भूमिका घेतल्यास कुठल्याही जमातीच्या धार्मिक मिरवणुका निर्विघ्नपणे पार पडतात हे आता सिद्ध झाले आहे. शासनाकडे या प्रश्नाबाबत राजकीय इच्छाशक्तीचा अभाव असेल तर केवळ नागरिकांच्या प्रयत्नाने जातीय दंग्यांना आळा घालणे आज तरी शक्य दिसत नाही.

डाव्या शक्ती

राष्ट्रीय काँग्रेसव्यतिरिक्त समाजवादी आणि साम्यवादी हे दोन पक्ष धर्मनिरपेक्ष राष्ट्रवाद आणि समाजवाद या तत्त्वांचा पुरस्कार करणारे होते. महाराष्ट्रातील समाजवादी नेतृत्व एकेकाळी जमातवादाच्याविरुद्ध कंबर कसून उभे रहिले होते. दंगलग्रस्त भागातून फेऱ्या काढून शांतता स्थापन करण्यात ते पुढाकार घेत. समाजवादी पक्षाचा अंत झाल्यावर धर्मनिरपेक्ष सामाजिक जीवनाचा आग्रह धरणारी ही शक्ती नष्ट झाली आहे. त्याच्या जागी जो जनता पक्ष उभा राहिला. त्याने आपली सुसंगत अशी विचारसरणी लोकांपुढे अद्याप मांडलेली नाही. राजकीय व्यवहाराचें गणित मांडूनच त्याचे निर्णय घेतले जातात.

डावे व उजवे असे दोन्ही साम्यवादी पक्ष एकत्र येऊन जमातवादाविरुद्ध आता ठाम भूमिका घेत आहेत ही एक समाधानाची गोष्ट आहे. आतापर्यंत निवडणुकीतील तात्पुरत्या फायद्यासाठी जमातवादी पक्षांशी हात मिळवणी करण्याचेच त्यांचे धोरण होते. त्यामुळे काही राज्यात सत्तारूढ होऊनही आपली धर्मनिरपेक्ष विचारसरणी जनमानसात रूजविण्यात त्यांना यश आले नाही. वास्तविक पाहाता जमातवाद हाच समाजवादाचा खरा शत्रू आहे. भारतातील सत्ताधारी वर्गाला परकीय साम्राज्यशाही विरुद्ध झगडा करून राजकीय सत्ता काबीज करण्यासाठी सामान्य लोकांच्या पाठिंब्याची गरज वाटत होती. म्हणून धर्मनिरपेक्ष उदारमतावादी राष्ट्रवांदाचा पुरस्कार करणाऱ्या राष्ट्रीय काँग्रेसला

त्यांनी साह्य केले. परंतु सामान्य माणसांच्या जीवनातील आर्थिक व सामाजिक प्रश्न उदारमतवाद सोडवू शकत नाही. समाजवादाची भाषा बोलण्यात येत असली तरी आपले अधिकार सोडण्याची वरिष्ठ वर्गाची तयारी नाही. अशा काळात प्रत्यक्षात समाजवादी धोरणांना शह देण्यासाठी जातिवादाचा व जमातवादाचा वापर केला जातो. डाव्या पक्षांनी याची पुरेशी दखल घेतलेली नाही. आर्थिक बदल झाल्यानंतर सामाजिक व सांस्कृतिक बदल आपोआप घडून येतील असे गृहीत धरून केवळ आर्थिक प्रश्नांवरच त्यांनी आपले लक्ष केंद्रीत केले. धर्म, जाती, पुरुषप्रधान कुटुंबसंस्था इत्यादींनी समाज जीवनात निर्माण केलेल्या प्रश्नांची त्यांनी दखल घेतली नाही. त्या दृष्टीने कार्यकर्त्यांचे शिक्षण केले नाही. त्यामुळेच जमातवाद्यांना मोकळे रान मिळाले.

समाजवादाच्या तत्त्वांवर मनोमन श्रद्धा ठेवून सामाजिक व आर्थिक न्यायासाठी झगडा करणारे ध्येयवादी तरुणांचे अनेक छोटे गट महाराष्ट्रात कार्यरत आहेत. पण त्यांची शक्ती विखुरलेली आहे. केवळ स्वतःच्या बळावर दंग्यांमध्ये हस्तक्षेप करण्याची त्यांची ताकद नाही सामाजिक व सांस्कृतिक वातावरणात बदल घडवून आणणे त्यांना जमणार नाही. या सर्व संघटनांमध्ये समाजपरिवर्तनाचे मार्ग आणि तात्कालिक धोरणे याबाबत मतभेद आहेत. परंतु जमातवादाशी मुकाबला करण्यासाठी डावे पक्ष खडे राहिले तर या प्रश्नावर या सर्व संघटना एकत्र येऊ शकतील. समाजवाद हे काही केवळ शेतकरी कामगारांना थोडे अधिक उत्पन्न मिळवून देण्याचे साधन नाही. समाजजीवनाच्या सर्व क्षेत्रांची समानता व न्याय या तत्त्वांवर पुनर्रचना करू पाहाणारी ती एक भौतिक-नैतिक चळवळ आहे. लोकांच्या मनावरील धर्माचे परंपरागत संस्कार हेच जमातवाद्यांचे भांडवल आहे. मात्र त्याच कारणास्तव आर्थिक विकास, सामाजिक सुधारणा, कुटुंबव्यवस्था, पर्यावरण, शिक्षण अशा अनेक क्षेत्रात त्यांना सुसंगत लोकाभिमुख भूमिका घेता येत नाही. हिंदू, मुसलमान, शीख, ज्यू, पारशी, ख्रिस्ती यांचा धर्म वेगळा असला तरी त्यांचे आर्थिक राजकीय व सांस्कृतिक हितसंबंध सारखेच असतात. म्हणून या सर्व प्रश्नांवर स्पष्ट समाजवादी भूमिका घेणे आणि ती पुढे रेटण्याच्या दृष्टीने सर्व धर्मातील शोषितांना एकत्र आणून त्यांच्या वर्गीय संघटना बांधणे हाच जमातवादाला खऱ्या अर्थाने हद्दपार करण्याचा खात्रीचा मार्ग होय.

REFBK-0025563

संदर्भ

१. पहा–India–The Roots of Crisis–Satish Saberwal, OXford Universit Press–1986–P. 75
२. रा. चि. ढेरे–मुसलमान मराठी संतकवी.

नलिनी पंडित यांची इतर पुस्तके

- महाराष्ट्रातील राष्ट्रवादाचा विकास
- जातिवाद आणि वर्गवाद (१९६५)
- स्वातंत्र्योत्तर काळातील दलितांचा प्रश्न (१९७५) साधना प्रकाशन
- गांधी (१९८३) ग्रंथावली

प्रा. दा. ध. कोसंबी प्रतिष्ठान : अन्य प्रकाशने

- प्राचीन भारतीय समाजव्यवस्थेतील शूद्रांचे स्थान
  लेखक : डॉ. रामशरण शर्मा.
  निवेदक : जयंत गडकरी.
- प्राचीन भारतीय समाजसंस्कृती संवर्धन
  लेखक : प्रा. दा. ध. कोसंबी
  निवेदक : जयंत गडकरी.
- प्रा. दामोदर धर्मानंद कोसंबी प्रणित इतिहास विचार मीमांसा
  लेखक : प्रा. कु. ल. महाले